ठाणें
नाटक
१८८३५

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
लेखक शं. मो. रानडे
सन १८८६
संग्रहालय क्रमांक ६६६६
पुस्तकाचें नांव दौलतराव

प्रसिद्ध झालेलें.

३५

नाटक

म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. क्र. ३५८

९८
सं क्र.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापून प्रसिद्ध झालेलें.

# दौलतराव नाटक.

हें पुस्तक

## शंकर मोरो रानडे बी० ए०

(रतिमन्मथ, चंडकौशिक, अतिपीडचरित, अनुतापशमन, प्रेमगुटिका, वीरोत्तंस, अधिकारदानविवेचना इत्यादि नाटकांचे कर्ते)

यांनीं

मूळ इंग्लिशग्रंथाधारें केलें.

तें

'इंदुप्रकाश' व 'नेटिव्ह ओपिनियन' छापखाने, मुंबई,

व

'आर्यभूषण' छापखाना, पुणें,

येथें

छापिलें.

आवृत्ति २.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यांचे आहेत.)

शके १८०५

सन १८८३।८४ इ०.

म. ग्रं.
विषय
वा. क.

# उपोद्घात ( दौलतराव नाटक )

हें नाटक मूळ इंग्रजींत **जान ब्राऊन** नामक कवीनें "**बार्बारोसा**" नामकं नाटक रचिलें आहे त्याच्या आधारानें महाराष्ट्र भाषेंत तयार केलें आहे. या नाटकांत वर्णिलेला प्रकार मूळ **आफ्रिकें**तील **आल्जीर्स** देशांत घडून आला आहे, परंतु तो प्रकार बऱ्याच अंशानें या देशांत घडूं शकणाऱ्या गोष्टींशीं जमतो, यास्तव मूळच्या पात्रांचीं नांवें बदलून हा सर्व प्रकार याच देशांत घडून आला असें दाखविणें अधिक सोईचें व वाचकांसही विशेष प्रिय होईल असें वाटून ह्या नाटकास हें प्रस्तुतचें स्वरूप देण्यांत आलें आहे. ह्यावरून प्रस्तुत नाटकांत वर्णन केलेली कथा वस्तुतः इतिहासबद्ध नाहीं हें तर उघडच होत आहे, तथापि हें नाटक महाराष्ट्र भाषेंत तयार होत असतां ज्या विशेष काळावर व स्थळावर कटाक्ष ठेविला आहे त्यांबद्दल कांहीं थोडा मजकूर लिहिणें अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. प्रस्तुतच्या नाटकांत **दौलतराव** हा सर्व **कोंकण**पट्टीचा राजा असें कल्पिलें आहे, व त्याच्या राज्याचें राजधानी शहर समुद्रकांठीं **सुवर्णपुर** ह्मणून होतें असें मानिलें आहे. **सुवर्णपुर** ह्मणजे प्रस्तुत ज्यास आपण **सुवर्णदुर्ग** ह्मणतों त्याच्याच आसपास असणारें एक शहर होय. **दौलतरावानें** **काटक** लोकांवर स्वारी केली ह्मणून पुस्तकांत सांगितलें आहे **काटक** लोक **सह्याद्री**च्या दऱ्याखोऱ्यांतून डोंगरांच्या गुहांतून वगैरे राहिलेले अद्यापिही सांपडतात. तसेंच **दौलतराव** ज्या राज्याचा आपण मालक आहों असें ह्मणत असे त्याचा खरा मालक **यशवंतराव** हा **दक्षिणेंत कर्नाटक**च्या **मुसलमानी** राज्यांत मदत मागण्याकरितां गेला होता अशी बातमी आल्याचें लिहिलें आहे, ह्यावरून ह्या नाटकांत वर्णिलेली कथा **कर्नाटकांत मुसलमानी** अंमल बसल्यानंतर घडून आली असावी असें साहजिक अनुमान निघण्याजोगें आहे. शिवाय **दौलतरावानें** आपणास अनेक प्रसंगीं **कोंकण** प्रांताचा सार्वभौम राजा असें ह्मटलें आहे; परंतु जर कधींकाळीं **सर्व कोंकण**पट्टीवर सर्वत्र एकछत्री राज्य होतें असें कल्पिलें, तर ती एकछात्रिता या प्रांतांत **पोर्तुगीज** लोकांचा प्रवेश झाला तेव्हांनें [illegible] ली हें इतिहाससिद्ध आहे. ह्यास्तव "अं- **नाटक** प्रांतांत **मुसलमानी** अंमल बसल्या- **पोर्तुगीज** लोकांचा या देशांत प्रवेश ... ह्या दोन गोष्टींच्या दरम्यान या नाटकांत वर्णिलेली कथा घडली असावी असें सिद्ध ... आतां या दोन गोष्टी केव्हां कशा घडल्या ... इतिहासज्ञांस अवगत आहेच, ह्यास्तव ... प्रस्तुत स्थळीं उल्लेख करणें अवश्य ... तसेंच ह्या गोष्टींचा विशेष उल्लेख न ... चें दुसरें एक कारण आहे तें असें कीं ... ह्या नाटकांत वर्णिलेली कथा ह्या देशांत ... ल्यापैकीं नाहीं, ह्यास्तव वर दिग्दर्शित केलेल्या कालनिर्णयापेक्षां अधिक सूक्ष्म रीतीनें कालनिर्णय करीत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. सा-

धारणदृष्ट्या पहातां, प्रस्तुत नाटकांत वर्णिलेल्या आचारविचारांचें यथावत् ज्ञान होण्यास वर सांगितलेला स्थूलकालनिर्णयच त्रस होणार आहे. नाटकांत **यशवंतरावाची** माता **राजसबाई** ही **कमळगडच्या धनगराची** कन्या होती असें ह्मटलें आहे; परंतु प्रस्तुतच्या होळकरसरकारच्या राज्याच्या मूळाकडे लक्ष दिलें असतां, हा वर्णिलेला प्रकार विसंगत वाटणार नाहीं, एवढेंच नव्हे, तर **दौलतराव** व **यशवंतराव** हे उभयतांही **धनगर** जातींतच उत्पन्न झाले होते असें सर्वांच्या सहज लक्षांत येईल. **कोंकण** प्रांतांत ताडांचीं व माडांचीं झाडें फार, ह्यामुळें तेथील लोकांत दारू पिण्याचा प्रकार फार, ही गोष्ट सर्वांस अनुभवसिद्ध आहे. ही दारू ह्मणजे आलीकडील **ब्रांडी**मातेच्या तोडीचीच होती असें मानणें जरूर नाहीं. तथापि ताडीचे वगैरे रस गाळून त्यांपासून तयार केलेलें त्रेंच मादक अशा साधारण प्रकारच्या मद्याच्या तोडीची ती मानिलें असतां त्रस होणार आहे. सर्वत्र कलालांच्या वगैरे दुकानांतून ...ले, त्राटल्या इत्यादि नजरेस पडतात ... नाटक ज्या कालास अनुलक्षून रचिलें ...त्या कालीं कांचेच्या पेल्यांच्या ऐवजीं ...त्रांचीच योजना होत असे असें ध्वनित आहे. आतां श्रीमंत असतील ते रु... प्याले घेतील व गरीब असतील ते ह... ा धातुपात्रांचा उपयोग करितील एव... ...तें. असो. ह्या प्रांतांत हल्लींप्र...क्त मार्गाचा प्रसार होता असेंही सू... ...करून मद्यपानापासून मनुष्याची जी पशुवत् अवस्था होते तिचेंही प्रसंगोपात्त अल्प निरूपण केलें आहे. तशीच आणखी-ही एक पूर्वीची चाल या ग्रंथांत सुचविण्यांत आली आहे, ती ही कीं, ह्या देशांत राजकुळांतून वगैरे पाट किंवा पुनर्विवाह होत असत. असो.

येथपर्यंत या नाटकांत वर्णन केलेल्या काळास, स्थळास, व रीतिभातींस अनुसरून लेख आटपला. आतां खुद्द कथेच्या स्वरूपाबद्दल लिहूं. मूळ नाटकांत ह्या कथेचा शेवट गोड झाला आहे, ह्मणजे **'बार्बारोसा (दौलतराव)'** व तदनुयायी एवढेच मात्र मेले असून **'सेलिम (यशवंतराव)' 'आथमन् (मालोजी)' 'सादी (हिंमतराव)' 'झफिरा (राजसबाई)', 'आयूरीनी (गजराबाई)'** वगैरे पात्रें सर्व जिवंत राहिलीं आहेत, व **सेलिम** हा राज्यासनावर बसून पुढें त्याचा आणि **आयूरीनीचा** विवाह होणार आहे इतकें सुचविलें आहे; परंतु प्रस्तुत नाटकांत अगदीं विसदृश प्रकाराचें अनुसरण केलें आहे. ह्या नाटकांत वर सांगितलेल्या पात्रांपैकीं **आथमन् (मालोजी)** व **सादी (हिंमतराव)** ही पात्रें मात्र जगूं दिलीं आहेत, व बाकीचीं प्रधानत्वेंकरून वर्तणारीं सर्व पात्रें मृत्युमुखांत पडल्याचें सांगितलें आहे. नाटकग्रंथ वाचीत असतां वाचकांस व प्रेक्षकांस **यशवंतराव, राजसबाई** व **गजराबाई** या पात्रांबद्दल विशेष चटका ला... गून अखेर ह्या सर्वांचें कल्याण व्हावें असेंच सर्वांस वाटतें, व तसें वाटणें कांहीं अंशीं साहजिकही आहे, ह्या दृष्टीनें पहातां **सकृद्दर्शनीं** ह्या नाटकांतील कथा लोकांस कदाचित् रु... चणार नाहीं असें होण्याचा संभव आहे. परंतु वाचक किंवा प्रेक्षक जर अंमळ ह्या गोष्टीबद्दल सूक्ष्म दृष्टीनें विचार करून पाहतील तर त्यांस या नाटकांत वर्णिलेला प्रकार अगदीं स्वाभाविक वाटेल.

या जगांत ज्याप्रमाणें कांहीं गोष्टी आपणास घडाव्या असें वाटत असतें त्याप्रमाणें त्या नेहमी घडतातच असें होत नाहीं, यामुळें असत्याचा नाश व सद्गुणाचा नेहमी जय होतो असें आपल्या प्रत्ययास येत नाहीं, तथापि "सद्गुण हेंच सद्गुणाचें बक्षीस" ही जी साधूक्ति आहे तिजकडे लक्ष दिलें असतां इहलोकींचा आपला क्षणिक संबंध तुटल्यावर नंतर आपल्या सद्गुणांच्या न्यूनाधिक्यमानानें सद्गुणांबद्दल बक्षीस मिळावयाचें रहात नाहीं, या सर्वलोकगृहीत तत्त्वांतील सत्यतेनेंच सर्वकाळीं सर्व लोकांच्या मनाचें समाधान आजपर्यंत होत आलें आहे व अद्यापिहि होत आहे. तेव्हां पारलौकिक सुखाकडे दृष्टि फेंकिली असतां या जगांतच आपणास सद्गुणाबद्दलचें बक्षीस मिळालें नाहीं म्हणून तेवढ्यानेंच विचारवान् पुरुष कदापि खिन्न होत नाहींत, व या जगांत आपणावर जरी पर्वतप्राय संकटें कोसळलीं, व त्यांयोगें आपले प्राणही नष्ट झाले किंवा होऊं लागले, तरी त्यांचा परमेश्वराच्या न्यायीपणावर पूर्णपणें हवाला असतोच असतो. वास्तव आपणास जरी **यशवंतराव, राजसबाई व गजराबाई** इत्यादिकांचें ऐहिक कल्याण व्हावें असें फार फार वाटत असूनही तें आपल्या प्रत्यक्ष निदर्शनास आलें नाहीं, तरी एवढ्याबद्दलच वाचकांनीं किंवा प्रेक्षकांनीं दृश खिन्न होण्याचें कारण नाहीं. हा सर्व पारलौकिक विचार एकीकडे ठेवून केवळ ऐहिक लोकव्यवहाराकडेच नजर देतांही सद्गुणाचें व दुर्गुणाचें फळ मिळावयाचें त्याप्रमाणें यांचें त्यास मिळालेंच आहे असें अंमळ सूक्ष्म विचारांतीं सर्वांच्या नजरेस आल्यावांचून रावयाचें नाहीं. या नाटकांतील नायक **दौलतराव**, त्याच्या अनन्वित दुष्कर्मांप्रमाणें त्यास जें फळ मिळणें वास्तविकदृष्ट्या इष्ट आहे तें फळ त्याला मरावयाचे अगोदरच मिळालेंच आहे. कारण **दौलतरावानें** जिवंत असतां ज्या अनन्वित पातकांचें, कीं ज्यांच्यापुढें पंचमहापातकेंही आपली मान वांकविण्यास रहावयाचीं नाहींत त्यांचें, आचरण केलें, त्या पातकांचें फळ त्याच्या अंतर्यामाचें निरंतरची व्यग्रता व शांतिरहितता ह्या दोन गोष्टींमध्येंच प्रगट झालें आहे. व यासाठीं अशा प्रकारचा मनुष्य प्रत्यक्ष मरून जाण्यापेक्षां जीवंत राहूनच जर प्रत्यक्ष अंतरात्म्याच्या संबंधानें निरंतर या जगांत यमयातनांचा अनुभव घेत असतांना आपल्या दृष्टीस पडतो आहे, तर त्यांतच दुष्कर्माचा अपजय व तद्विरोधानें सद्गुणाचा जय झाला असें म्हणण्यास बिलकुल प्रत्यवाय नाहीं. **यशवंतरावाच्या** पित्याचा दुष्ट **दौलतरावानें** घात केल्यावर **यशवंतरावास** अरण्यवासादिक अघोर संकटें भोगावीं लागलीं, तथापि ज्या वेळीं तो परत येऊन आपल्या मातुश्रीस भेटला व त्यानें तिच्या जिवाचें समाधान केलें, त्यावेळीं त्याचा "अंतरात्मा जसा कांहीं आनंदसमुद्रांत गटंगळ्याच" खाऊं लागला, व त्या वेळीं त्यानें सद्गुणाच्या महिम्याविषयीं जो स्वोद्गार प्रकट केला त्यावरूनच प्रत्यक्ष दुःखावस्थेंतही सद्गुणाचें फळ मिळतें असें सिद्ध होत नाहीं काय? "सद्गु-
"णाचा महिमा कांहीं विलक्षण आहे! सद्गु-
"णापासून प्राप्त होणाऱ्या आनंदास पार-
"पारावार नाहीं! फार काय सांगावें? एकादे
"वेळीं दुःख प्राप्त झालें तरी तें देखील आ-
"ल्हादकारक होतें! व मनुष्याचा अंतरात्मा
"कितीही शोकावेशांत बुडाला असला तरी
"एकादे वेळीं तरी त्यास ब्रह्मानंदाचा अनुभ-
"व आल्यावांचून रहात नाहीं!" हा य-

शवंतरावाची स्वोक्ति ( अंक ३ प्र. ३ पृ. ४१ पहा ) आहे; तसेंच ( अंक ३ प्र. ५ पृ. ६० यामध्यें ) राजसबाईवर दौलतराव जुलूम करूं लागणार अशा संकटसमयीं तिला यशवंतराव जीवंत असल्याचें समजलें त्यावेळीं तिनें " देवा ! नारायणा ! धन्य आहेस ! " असें ह्मटलें आहे; व पुढें ज्यावेळीं तिनें दौलतरावाची अखेरची निराशा केली, त्यावेळीं " आजपर्यंत आम्हीं " उभयतांनीं ज्या निश्चयानें दिवस काढिले, " तोच आमचा निश्चय निरंतर चालेल ! " अशी तिची उक्ति (पृ. ६१ पहा) आहे; तसेंच ( पृ. ३४ ) यशवंतराव व आपण या उभयतांचें परस्परप्रेम निष्फळ होणार ह्मणून जरी गजराबाईला अत्यंत दुःख वाटतें आहे, तरी तें यशवंतरावाच्या " शांत वृत्तीचें अनुकरण करून मुकाट्यानें सहन करण्यास " ह्मटण्याचा तिचा निश्चय आहे, व यशवंतरावास तिच्या " पित्याच्या आचरणामुळें..... " अनिवार क्लेश व संकटें भोगावीं लागलीं हें " सर्व खरें आहे, तथापि परमेश्वर करो आ" णि प्रत्यक्ष प्राणघातापेक्षां सौम्य अशा उ" पायाची योजना करून आपल्या दुःखाचें " परिमार्जन करण्याची " यशवंतरावास बुद्धि देवो अशी ( पृ. ३९ ) तिची प्रार्थना आहे; ह्या सर्व गोष्टींवरून धीर पुरुषांच्या चित्ताची सार्वकालीन निर्विकारिता व तज्जन्य ब्रह्मानंदसुखावाप्ति हीं किती बरें वर्णनीय आहेत ! व अशा तऱ्हेच्या ब्रह्मानंदसुखापुढें प्रत्यक्ष लौकिकप्रकारानें वाव्हलावाव्हलींचें लग्न प्रादि होऊन त्यांपासून होणारें सुख हें किती अल्प आहे ह्याची कल्पना कोणासही सहज करितां येईल. तेव्हां ह्या दृष्टीनें पहातां यशवंतराव व गजराबाई हीं उभयतां जीवंत राहून त्यांचा विवाहसंबंध घडून आला नाहीं ह्यामुळें यत्किंचितही निराशा मानण्याचें कारण नाहीं. परंतु हा सर्व अध्यात्मिक विचार झाला, आतां केवळ लौकिकदृष्टीनेंच विचार करून पाहूं लागलें असतांही वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या इच्छेनुरूप या नाटककथेचा अंत होणें कितपत साहजिक आहे ह्याबद्दल यत्किंचित् विचार करणें इष्ट वाटतें.

ह्या नाटकांत राजसबाई व गजराबाई हीं दोन स्त्रीपात्रें प्रधान आहेत; त्यांपैकीं राजसबाई यशवंतरावाची आई, हिला दौलतरावाच्या त्रासांतून आपण मुक्त होऊन आपला पुत्र गादीवर बसावा असें साहजिक रीतीनें वाटणार आहे, व ह्या दृष्टीनें पहातां या नाटककथेचा शेवट वाचकांच्या इच्छेनुरूप होण्यास कांहीं प्रत्यवाय नसावा. परंतु हा विचार गजराबाईच्या संबंधानें चालण्यासारखा नाहीं. गजराबाईचें प्रेम यशवंतरावावर आहे ह्यास्तव राजसबाईप्रमाणेंच तिलाही यशवंतरावाचें कल्याण व्हावें असें वाटणें अगदीं साहजिक आहे, व त्याप्रमाणें तिला वाटलेंही आहे; परंतु राजसबाई ज्याप्रमाणें दौलतरावाचा द्वेष करिते त्याप्रमाणें आपणही द्वेष करणें गजराबाईचे हातून होणें शक्य नाहीं. ह्यास्तव यशवंतरावास राज्यप्राप्ति होऊन आपला त्याच्याशीं विवाह व्हावा हें तिला अत्यंत इष्ट होतें, तथापि तिला " प्रत्यक्ष पित्याच्या प्राणघाताहून सौम्य अशा उपायानें " च जर ही गोष्ट साध्य होण्यासारखी असती तर ती पाहिजे होती, एऱ्हवीं प्रत्यक्ष आपला प्राणनाश झाला तरी चिंता नाहीं, परंतु पित्याचा व त्याबरोबर आपला हृदयवल्लभ यशवंतराव ह्याचाही प्राण वांचवावयाचा, असा तिचा संकल्प होता. परंतु हा संकल्प सिद्धी

जाण्यास यशवंतरावाकडून जबरदस्त अडचण होती. दौलतरावानें यशवंतरावास व त्याच्या मातापितरांस जीं दुःखें दिलीं त्या मानानें पाहतां यशवंतरावाच्याच हातानें दौलतराव मेल्याशिवाय पूर्वीच्या दुःखांबद्दलचा त्यानें सूड पुरता उगविलासें होत नाहीं, ह्यास्तव तशा प्रकारचा सूड घेणें तर अवश्य, आणखी तो प्रकार गजराबाईस तर मुळींच संमत होत नाहीं, तेव्हां जरी कदाचित् एकट्या दौलतरावासच मारून बाकीच्या सर्वांस जगूं दिलें असतें, तरी देखील गजराबाईच्या जिवास सुखसमाधान मिळण्याचा संशयच होता; व तिच्या जिवास सुखसमाधान मिळण्याचाच जर संशय, तर राजसबाई व यशवंतराव यांच्या जिवास सुखसमाधान तें कोठून होणार ? एतावता वाचक ज्या उद्देशानें राजसबाई, गजराबाई व यशवंतराव हीं जीवंत रहावीं असें इच्छितात तो उद्देश पूर्णपणें सिद्धीस जाणेंच दूरापास्त आहे. व हा विचार मनांत आणूनच आह्मीं प्रस्तुत नाटककथेचा शेवट सर्व प्रधान पात्रांच्या मृत्युद्वाराच केला आहे. अशा तऱ्हेचा शेवट करण्याचा आमचा दुसराही आणखी एक उद्देश आहे. इंग्लिश भाषेंत ज्याप्रमाणें "ट्राजेडी" अथवा करूणरसपर्यवसायी नाटकें आहेत त्याप्रमाणें संस्कृतांत किंवा महाराष्ट्र भाषेंत नाहींत. आपल्या भाषेंत नाटकादिकांचा शेवट पाहिला ह्मणजे नेहमी सुखपर्यवसायीच असतो. परंतु ज्या कोणास इंग्लिश भाषेंतील करूणरसपर्यवसायी नाटकांचा यत्किंचितही आस्वाद मिळाला असेल, त्यांस त्या नाटकांचें वाचन किंवा प्रेक्षण समाप्त झाल्यानंतरही पुष्कळ वेळ जो हृदयावर परिणाम उर्वरित असतो तो परिणाम हर्षपर्यवसायी नाटकांच्या वाचनापासून किंवा प्रेक्षणापासून होत नाहीं, हें अवगत असेलच. ह्यास्तव एकादा सदुपदेश हर्षपर्यवसायी नाटकांपासून जितका वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या हृदयावर बिंबेल त्यापेक्षां शतपटीनें तो करूणरसपर्यवसायी नाटकापासून बिंबण्याचा संभव आहे. व ह्या उद्देशानेंही आह्मीं प्रस्तुतच्या नाटकग्रंथास सांप्रतचें स्वरूप दिलें आहे. अस्तु.

प्रस्तुतचें नाटक मूळ ज्या इंग्लिश नाटकाच्या आधारें रचिल्याचें मागें सांगितलें आहे, त्यांतील कथान्ताच्या प्रकाराहून आमच्या पुस्तकांतील कथान्त फार विसदृश आहे हें आतांपर्यंत लिहिलेल्या हकीकतीवरून वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल. तथापि ह्या पुस्तकाची मूळ इंग्लिश नाटकाहून विसदृशता नुसती कथान्तापुरतीच आहे असें कोणीं समजूं नये. प्रस्तुत नाटकास मूळ इंग्रजी नाटक फक्त आधारापुरतेंच घेतलें आहे.व आरंभीं आरंभीं मात्र रचना बहुतेक मुळाबरहुकूम आहे. परंतु जसजसा नाटककथेचा विस्तार होत गेला, तसतसे मुळाहून विसदृश रचनाप्रकार होत गेले, ह्यामुळें कित्येक ठिकाणीं प्रवेशांचे प्रवेशही प्रस्तुत पुस्तकांत अगदींच निराळे व नवे करून घालावे लागले. एकंदरींत हें पुस्तक करीत असतां आमचा उद्देश भाषांतर ह्मणून करण्याचा नसून, जेणेंकरून हें पुस्तक महाराष्ट्र जनांच्या रूचीस अभिमत होऊन, त्यापासून जो उपयोग करून घेणें इष्ट आहे तो त्यांस करून घेतां यावा, अशा उद्देशानेंच हें पुस्तक तयार केलें आहे. यास्तव मूळाहून प्रस्तुत नाटकाची विसदृशता प्रवेशरचनेंतच आहे असें नसून पात्रांचे आचारविचार व भाषणपद्धति यांतही आहे असें वाचकांच्या सहज लक्षांत येईल. आतां

हीं विसदृशता कोणच्या ठिकाणीं कसकशी व कितीकिती आहे हें, आमचे इंग्लिशज्ञ वाचक जर हें व मूळचें अशीं पुस्तकें परस्परांशीं ताडून पहातील, तर त्यांच्या सहज लक्षांत येईल. तथापि आमच्या महाराष्ट्र भाषा मात्र जाणणाऱ्या वाचकांस समजण्याकरितां तिचें यत्किंचित् स्वरूप येथें लिहिणें अवश्य वाटतें. साधारणतः विसदृश स्थळें हीं सर्व ग्रंथभर पसरलीं आहेत, ह्यास्तव त्या सर्वांचा उल्लेख येथें न करितां प्रस्तुत पुस्तकांत मूळांत नसून-ही अगदीं नवीनच करून घातलेले प्रकार मात्र वाचकांस कळविले असतां बस होणार आहे. नवीन प्रकार करून घातले ते येणेंप्रमाणें:—दौलतरावाची प्रतापसिंहाच्या घरीं येण्याच्या पूर्वींची हकीकत (पृ. १-२); गजराबाईचें प्रथमचें आत्मगत भाषण (पृ.९) व तिनें पर्वतेश्वराच्या जंगलांतील चोरट्यां-बद्दलची सांगितलेली हकीकत (पृ.११-१२); राजसबाईचें आत्मगत भाषण (पृ. १३) व तिनें आपणास वश व्हावें ह्मणून दौलतरावानें केलेली तिची विनवणी पद (पृ. १७-१८); यशवंतरावास मारल्याबद्दल येसबानें सांगितलेली खोटी हकीकत (पृ. २३); यशवंतराव व गजराबाई यांच्या परस्पर प्रेमाचीं वगैरे भाषणें (पृ. ३० पासून ३४); यशवंतरावानें सात वर्षे वियोग झाल्यानंतर आपल्या मातुश्रीस प्रथमच पाहिलें त्या वेळचे त्याचे दुःखोद्गार (पृ. ३७); अंक ४ प्र. १ यांतील गजराबाईचें आत्मगत भाषण (पृ. ४६); मेजवानींत मद्यपानाचा प्रकार व दौलतरावाची पशुवत् अवस्था व तिजसंबंधानें गजराबाईचा दुःखोद्गार वगैरे (पृ. ४७पासून ४९); यशवंतराव राजसबाईच्या महालाच्या बाहेरल्या अंगास निजल्याचा प्रकार (पृ. ६२-६३); दौलतरावाचें पहिलें अनुतापयुक्त भाषण (पृ. ६३); दौलतरावाचें उपाध्यायापाशीं भाषण झाल्याचा प्रकार (पृ. ६५-६६); राजसबाईचें शेवटलें आत्मगत भाषण व दौलतरावाची तिनें आपणास वश व्हावें ह्मणून पुनरपि विनवणी पद वगैरे (पृ. ६७-६८); व बहादरसिंगाच्या मृत्यूच्या प्रकारापासून नाटकसमाप्ति होईपर्यंत सर्व भाग (पृ. ७१ पासून ८०). असो.

येथपर्यंत या नाटकाच्या उपोद्घातादाखल जो मजकूर लिहिणें आह्मांस इष्ट वाटलें तो लिहिला. आतां खुद्द वाचकांस विनंतीदाखल थोड्या चार ओळी लिहून हा लेख आटपतों.

प्रस्तुत आह्मीं जो उद्देश मनांत धरून हें नाटकादि ग्रंथ करण्याचा उद्योग आरंभिला आहे तो उद्देश या पुस्तकाच्या पहिल्या अंकांत लिहिलेल्या उपोद्घातांत व प्रत्येक अंकाच्या मलपृष्ठावर देण्यांत आलाच आहे; व ह्या पुस्तकांत जे नाटकादिकांचे ग्रंथ आह्मांकडून छापून प्रसिद्ध करण्यांत येतील ते निरंतर त्या उद्देशास अनुसरूनच असतील. आजपर्यंत 'नेटिव ओपिनियन', 'सुबोध पत्रिका' व 'विविधज्ञानविस्तार' शिवाय करून आमच्या पुस्तकावर दुसऱ्या कोठेंही अभिप्राय छापून प्रकट झाल्याचें आमच्या पाहण्यांत नाहीं. परंतु या पुस्तकांत छापत असलेलीं चार प्रकरणें आजपर्यंत अपुरतींच असत ह्यामुळें, साधारणतः पुस्तक करण्याचे उद्देश व पुस्तकांतील भाषासरणि, ह्यांशिवाय इतर रीतीनें पुस्तकपरीक्षा यथावत् होण्यास सवड नव्हती; ह्याकरितां कदाचित् ह्या पुस्तकाबद्दल अभिप्राय फारसे प्रगट झाले नसतील असें आह्मांस वाटतें. सांप्रत आह्मीं आरंभिलेल्या चार प्रकरणांपैकीं एक प्रकरण 'दौलतराव

नाटक ' हें समाप्त झालें आहे, ह्यास्तव त्यांतील गुणावगुणांबद्दल अनुकूल किंवा विरुद्ध अभिप्र.य छापून प्रसिद्ध होण्यास आतां कोणताही प्रत्यवाय राहिला नाहीं. ह्यास्तव सर्व प्रसिद्ध वर्तमानपत्रकर्ते, व इतर वाचकजन यांनीं आपणास वाटतील त्या प्रकारचे अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्राय मेहेरबानीनें छापून प्रसिद्ध करावे, किंवा वाटल्यास ते खुद्द आह्मांकडेही लिहून पाठवावे, अशी आमची त्यांस सविनय विनंती आहे. आमचें पुस्तक पूर्णदशेस आलें आहे असें आह्मीं बिलकूल समजत नाहीं, व आमच्या कृतींत सहस्रश: दोष सुज्ञ वाचकांच्या लक्षांत सहज येण्यासारखे असतील हेंही आह्मीं प्रांजळ बुद्धीनें कबूल करितों; ह्यास्तव आमच्या पुस्तकाबद्दल किंवा पुस्तकांतील कोणच्याही भागाबद्दल आपले अभिप्राय जर कोणीही आम्हांकडे मेहेरबानीनें लिहून कळवितील, तर सवडीप्रमाणें, वाचकांची आह्मांवर इतराजी न व्हावी यासाठीं निराळ्या खर्चानें, ते आह्मीं छापून आमचे पुस्तकांत वेळोवेळीं प्रसिद्ध करीत जाऊं, व त्यांमध्यें आम्हांस घेण्यासारखे जे कांहीं विचार किंवा सूचना असतील त्या सर्वांचें आह्मीं परमादरपूर्वक ग्रहण करूं. विशेषत: जे नाटकग्रंथ आह्मीं करण्याचें अंगावर घेतले आहे, ते सर्व ग्रंथ रंगभूमीवर प्रयोगरूपें अभिनीत व्हावे अशी आमची पूर्ण इच्छा आहे, ह्यासाठीं नाटकग्रंथांत प्रयोगाचे संबंधानें जर कांहीं अडचणी येण्यासारख्या वाचकांच्या लक्षांत आल्या, तर त्या त्यांनीं खुशाल आह्मांस कळवाव्या ह्मणजे त्या यथाशक्ति सुधारण्यास, व पुनरपि इतर नाटकांतून तशा अडचणी न याव्या एतद्विषयीं यत्न करण्यास, आह्मांकडून बिलकूल आळस होणार नाहीं.

# दौलतराव नाटक.

## अंक १.

**प्रवेश १.–राजवाड्यांतील एक खोली.**

(मालोजी आणि एक हुजऱ्या दोघे येतात.)

**मालोजी**–काय ह्मणतोस, कोणी अनोळखी मनुष्य मी कोठें आहें ह्मणून विचारीत आहे?

**हुजऱ्या**–होय महाराज, त्याचे मनांत आपली गांठ घ्यावयाची आहे. तो बाहेर उभा आहे.

**मा०**–त्यानें आपलें नांव, गांव, किंवा मी अमुक असें कांहीं सांगितलें?

**हु०**–तें कांहीं तो सांगेना; परंतु मी तुमचा स्नेहीच आहे, इतकें मात्र ह्मणाला.

**मा०**–तूं त्याला कोठेंसा पाहिलास?

**हु०**–त्या तिथें. (बोटानें दाखवितो.) अशी नुकती संध्याकाळ उलटून गेली होती त्या वेळीं समुद्राच्या कांठच्या त्या मोडक्याशा घरांत तो मला दिसला.

**मा०**–याचा काय बरें अर्थ असावा? अरे जा, त्या गृहस्थास मजकडे घेऊन ये. (हुजऱ्या जातो.) हा कोण असावा बरें? कदाचित् कोणी चांगला संभावित गृहस्थ पूर्वी चांगल्या स्थितींत असून हल्लीं वाईट दिवस आले ह्मणून घरादाराचा त्याग करून, या आमच्या कोंकणांत रहावयास तर आला नसेल ना? (हिंमतराव आंत येतो त्यास पाहून आश्चर्यानें) काय? **हिंमतराव!** आणि या ठिकाणीं? ओहोहो! **हिंमतराव!** या, असे या! (त्याचा हात धरावयास जातो.)

**हिंमतराव**–खबरदार माझ्या अंगास स्पर्श कराल तर! धिक्कार असो तुह्मांला न् त्या तुमच्या बेअब्र पन– न मिळविलेल्या झगझगीत शेल्याला! असला शेला अंगावर घेण्यापेक्षां प्रामाणिकपणानें राहून माझ्या सारखी विपत्ति भोगिलेलीही बरी!

**मालोजी**–हिंमतराव! तुमच्या बोलण्याचा रोख मी समजलों; परंतु त्याबद्दल मला विनाकारण दोष नका देऊं! मी असा दिसतों ह्मणून तुह्मी मला वाईट समजत असाल; परंतु ईश्वरसाक्ष तुह्मांस सांगतों हें सारें बाहेरचें सोंग आहे! वस्तुतः आंतून आपणांप्रमाणें आपल्या **यशवंतरावा**च्याच पक्षाचा मी आहें!

**हिंमत०**–हें जर खरें, तर मग धडधडीत या–या–चांडाळाच्या–विश्वासघातकी अधमाच्या–वाऱ्यास उभे काय ह्मणून राहतां? अहो, हा चांडाळ नरपशु आपल्या देशांत असतां पितृहत्या, मातृहत्या व बंधुहत्या, तसेंच जारण, मारण इत्यादि अघोर पातकें करावयास चुकला नाहीं; व त्यामुळें त्याच्या कनिष्ठ बंधूनें त्याजविरुद्ध शस्त्र धरून त्यास राज्यावरून हांकून लाविलें, त्या वेळीं आपले प्राण मुठींत धरून आमच्या थोरल्या महाराजांस शरण आला; व आमच्या महाराजांस त्याचीं हीं अघोर कर्मे ठाऊक नसल्यामुळें त्यांनीं हा आपला लंगोटचा मित्र समजून त्यास एकदम आपल्या पाठीशीं घातलें; व मागाहून ज्या वेळीं त्याच्या दुष्कर्माचा डंका पिटवीत प्रत्यक्ष त्याचा बंधु आपल्या महाराजांकडे येऊन त्यानें महाराजांस सर्व गोष्टी कळविल्या, व या मातृपितृघाती अनन्वित पातकें आचरणाऱ्या दुष्टाला माझ्या स्वाधीन

करा ह्मणून विनंती केली, त्या वेळीं महाराजांनीं "एकवेळ यास आश्रय दिला तो दिला, प्राण गेले तरी मी यास तुमच्या ह्मणून स्वाधीन करणार नाहीं" असें सांगून व "इतःपर मात्र याचे हातून तुह्मांस त्रास होऊं देणार नाहीं" ह्मणून त्यास अभिवचन देऊन वाटेस लाविलें, व कशाचीही तिळप्राय परवा न करितां या दुष्ट अधमाचें रक्षण केलें, या सर्व गोष्टी तुह्मीं विसरलां काय ? आमच्या महाराजांचे हे या दुष्टावरील उपकार जन्मोजन्मींही फिटावयाचे नाहींत, असें असतां हा कृतघ्न दुष्ट त्या उपकारांस कितपतसा स्मरला ? या अधमानें आमच्या महाराजांची पत्नी **राजसबाई** इच्याविषयीं अभिलाषबुद्धि धारण करून प्रत्यक्ष आमच्या महाराजांचे प्राण घेतले, व पतिमरणानें अतिदुःखित होऊन आपल्या **राजसबाई** सती जाण्याच्या तयारींत असतां या दुष्टानें तीस विघ्न करून आपल्या अनुयायांकडून तीस बळेंच कारागृहीं पहाऱ्यांत ठेविलें; तसेंच या गोष्टीचा सूड उगविण्याकरितां आमच्या **यशवंतरावांनीं**—आमच्या बाळमहाराजांनीं—बंड केलें, त्या वेळीं या निर्दय राक्षसरूपी **दौलतरावानें** त्यांचा पराभव करून बिचाऱ्या निरपराध प्रजा—त्यांची एकसारखी सात दिवसपर्यंत कत्तल चालविली. रयतेचीं शस्त्रें हिसकावून घेऊन तीवर नानाप्रकारचे जुलूम केले, व अद्यापिही करीत आहे; तसेंच आमचे बाळमहाराज त्या दुष्टाचे हातून निसटून जाऊन परराज्यांत गेले असतां त्यांच्या प्राणघाताविषयीं विचार मनांत आणून हजारदा निरनिराळे वेष देऊन मारेकरी पाठविले; तसेंच आमच्या **राजसबाईस** अत्यंत क्लेशांत ठेवून त्या पतिव्रतेच्या पवित्र देहास विटाळविण्याचे सहस्रशः त्यानें प्रयत्न केले व अद्यापिही करीत आहे. या सर्व गोष्टी मुकाट्यानें गिळून जाऊन तुह्मीं निर्लज्जपणें या अधमाधमाची—या क्रूर मानवराक्षसाची—सेवा पत्करून राहिलां आहां ! तेव्हां तुह्मीही **दौलतरावाप्रमाणेंच** दुष्ट, क्रूर व अधमाधम आहां असें ह्मणावयास कांहीं हरकत आहे काय ?

मा०—**हिंमतराव** ! तुह्मीं ह्मणतां या सर्व गोष्टी मला कबूल आहेत, परंतु तुह्मीं उगीच संतापलां आहां तसा मी कधीं संतापावयाचा नाहीं. परंतु समजा, तुह्मीं आतां रागावून बोललां तसें आपणही बोलण्याचें जर मी मनांत आणीन, तर मला नाहीं का तुमची निंदा करतां येणार ? या दुष्ट **दौलतरावानें** तुमच्या प्रत्यक्ष डोळ्यांदेखत तुमचे लक्षशः शूर देशबांधव यमसदनास पाठविले, या गोष्टीची तिळमात्रही लज्जा न बाळगून भागूबाईप्रमाणें शेंपूट झांकून पोबारा काढिला, ह्या कर्मीं तुह्मीं नाहीं का देशाशीं विश्वासघात केला ? ह्याबद्दल तुह्मांसच जर मीं अधमाधम ह्मटलें तर नाहीं का चालणार ? परंतु मी तुमच्याप्रमाणें असा अधमपणा पत्करला आहे काय ? तुह्मीं सर्वांनीं बारा वाटा धरल्या, परंतु ती गोष्ट मी केली नाहीं ती काय उगीच ? तिचें बीज कांहींच नाहीं ? तुह्मींच पहा कीं, तुह्मां सर्वांच्या मागून मीही जर तसाच पळून गेलों असतों, तर आपल्यामागें त्या बिचाऱ्या **राजसबाईची** काय स्थिति झाली असती ? तिचा या दुष्ट **दौलतरावानें** किती छळ केला असता ? तेव्हां हरतऱ्हेनें तिचा बचाव त्या दुष्टाचे हातून करावयाचा ह्मणून

मी प्रत्यक्ष शत्रूच्याच येथें रहाण्याचा विचार केला यांत मी वावगी कोणती गोष्ट केली? खरोखर पुसाल तर, **हिंमतराव** ! मी येथें राहिलों तो **राजसबाई**करितांच !

हिं०—हें पण खरें ना ?

मा०—ह्मणजे? अजूनही तुह्मांस माझें ह्मणणें खरें वाटत नाहीं ! ईश्वरसाक्ष मी सांगतों यांत काडीमात्र खोटें नाहीं. मी येथें राहिलों तो याकरितांच, व कुतऱ्यापेक्षांही नीचपणा पत्करून या अधम **दौलतरावा**ची मी चाकरी करीत आहें ती एवढ्यासाठींच ! परमेश्वर केव्हां सुदिन दाखवील तो दाखवो ! मला तर आमच्या हतभाग्य देशाचें नष्टचर्य संपून बिचारे आमचे बाळमहाराज या देशाचे स्वामी केव्हां होतील हीच रात्रंदिवस चिंता लागली आहे! कांहीं सुचत नाहीं ! परंतु करावें काय? मी आपल्याकडून **दौलतरावा**च्या नरडीचा घोंट घेण्याची संधि केव्हां येईल ह्मणून एकसारखी वाट पहात आहें.

हिं०—छे बोवा ! तुमचें ह्मणणं अजून नाहीं मला खरें वाटत ! माझी थट्टा नका करूं! तुह्मी ह्मणतां हें खरेंच ?

मा०—आतां तर तुमच्यापुढें शर्थ झाली! अहो. मी प्रत्यक्ष परमेश्वराचीना शपथ वाहिली !

हिं०—हो. त्या सगळ्या गोष्टी खऱ्या. परंतु तुह्मी मला असें सांगा, ही इतकी चोरी कशाकरितां ? तुह्मीं त्यास उघडपणें कां सांगत नाहीं ?

मा०—त काय ?

हिं०—काय ह्मणजे ! इतकेंच ! त्यास धडधडीत सांगावें कीं, तूं महादुष्ट आहेस, व मी तुला शत्रूप्रमाणें लेखितों.

मा०—वा: ! खाशी युक्ति ! अहो, माझ्या एकट्याच्यानें या प्रबळ **दौलतरावा**विरुद्ध वर्तन करून कसें बरें चालेल ? उगीच मी आपल्या प्राणांस मात्र मुकेन आणि आपल्या **यशवंतराव** महाराजांस किंवा **राजसबाई** मातोश्रींस त्यापासून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं तो नाहींच !

हिं०—**मालोजी** ! तुमचें ह्मणणें एवढा वेळ मी खरें मानिलें नाहीं याची माफी करा. आतां बरीक तुह्मी प्रामाणिक आहां असें मला वाटूं लागलें आहे, व तुमच्या मुखचर्येवरूनच तुह्मी अनृत भाषण करीत नाहीं अशी माझी खातरी होत आहे. तें असो. बोललों याचा राग मानूं नका. इत:पर तुमच्या मसलतीविरुद्ध मी कदापि जाणार नाहीं. **मालोजी**! खरेंच सांगा, आपण असे स्वस्थ बसून राहिलों आहों हें चांगलें का? कांहीं उद्योग तर केला पाहिजे कीं नाहीं? तुह्मींच मला सांगा, आपल्या हातून कांहींच होण्याजोगें नाहीं काय? प्राणांवर येऊन बेतली तरी चिंता नाहीं, पण आपणास साहस केल्यावांचून यश कसें बरें मिळेल ? अहो, हा दुष्ट **दौतलतराव** बिचाऱ्या प्रजेवर प्रतिदिवशीं कोटिश: जुलूम करित आहे हें तुह्मींच ना पाहतां? अहो, आजच सकाळीं पहा ते बिचारे पांच सहा निरपराधी गृहस्थ त्याच्या तडाक्यांत सांपडले, व त्यांवर आमच्या जुन्या महाराजांस ठार मारल्याचा खोटाच आरोप आणून ह्या दुष्टानें त्यांचे अंगावर शहरा येण्यासारखे हाल करून सरतेशेवटीं बिचाऱ्यांस यमसदनास पाठविलें ! हाय ! हाय ! गे माझे देशजननी ! हायहाय! काय ही तुझी अनिवार दु:खावस्था! धिक्कार असो आह्मांस ! असले षंढ पुत्र आह्मीं तुझ्या उदरांत उपजावे काय ?

( डोळ्यांतून अश्रु ढाळितो. व कांहीं वेळ स्तब्ध राहून मोठा उसासा टाकितो. ) असो ! परमेश्वराची इच्छा ! बरें मालोजीराव! आमच्या राजसबाईचें हल्लीं कसें काय आहे? अरेरे ! विचारीचें स्मरण झालें कीं, काळीज फुटून जातें !

**मा०—हिंमतराव!** काय सांगूं ? आमच्या मातोश्रीसाहेब जिवंत आहेत इतकेंच काय तें; परंतु त्यांचे जे हाल होत आहेत, व त्यांस ज्या अपेष्टा काढाव्या लागत आहेत, त्यांचें वर्णनही करितां येणें कठीण. जो राजवाडा पूर्वीचे आमचे महाराज गादीवर असतांना केवळ प्रतिकैलासच वाटत असे, त्या ठिकाणीं **राजसबाई**स एकटी रहावयाची पाळी आली आहे ! हाय! हाय! आज सतत सात वर्षें तिनें कशी कष्टांत काढिलीं असतील तीं तिचीं तिलाच ठाऊक! राजवाड्यांत तर नेहमीं या दुष्टाचें भय आहेच; एकुलता एक पुत्र तोही कोठें विदेशी झाला आहे त्याचा पत्ता नाहीं; तिची प्रिय प्रजा—तिचे हाल कुत्राही खाणार नाहीं. अशी तिची चोहोंकडून अतिशय दुःखद स्थिति झाली आहे. तिच्या प्राणप्रिय पतीचा अंत करणारा हा दुष्ट **दौलतराव** यानें **काटक** लोकांवर स्वारी केली होती, तींत त्याचा जय झाला; तेव्हां पासून तर, तिनें आपणास वश व्हावें म्हणून, त्यानें तिची एकसारखी पाठपुरविली आहे. तूं माझी पट्टराणी होशील तर मी तुझ्या पुत्रास माझ्या मागून गादीचा मालक करीन, अशा अनेक प्रकारच्या गोष्टी सांगून तो तिला वश करूं पहात आहे; परंतु ती पतिव्रता माउली या दुष्टाच्या वाग्जालांत अद्यापि सांपडली नाहीं; व **दौलतराव** आपल्या **यशवंतरावांचा** इतका द्वेष करितो याचें तरी बीज हेंच. नुकतेच वाटतें आठ दिवस झाले, **दौलतरावास** आमचे बाळमहाराज अमुक ठिकाणीं आहेत म्हणून कांहींसा सुगावा मात्र लागला, त्याबरोबर त्यानें त्यांस मारण्याकरितां दोन मारेकरी पाठविले. ते कदाचित् एव्हांना तेथें पोंचून त्यांनीं आपलें दुष्ट कृत्य पारही पाडिलें असेल !

**हिं०—मालोजी.** धिक्कार असो तुम्हांला! तुम्ही आपणास मोठे प्रामाणिक म्हणवितां ते असेच काय? अहो, धडधडीत या दुष्टानें आमच्या बाळमहाराजांस मारावयाकरितां मारेकरी पाठविले, हें तुम्हांस माहित असतां तुमच्यानें ही गोष्ट मुकाट्यानें पाहवली कशी? तुमच्या हातून कांहीं नाहीं काम होत तर आणा तुमची तरवार इकडे! या माझ्या हातांत! आणि ज्या ठिकाणीं तो दुष्ट असेल त्या ठिकाणीं चला मला घेऊन! म्हणजे पहा त्या दुष्टाला कसा हात दाखवितों—त्याचे शिपाई प्यादे त्याजसभोंवती असले तरी त्याची—

**मा०—हिंमतराव,** अंमळ शांत व्हा, व जरासें हळू बोला. तुम्ही एवढ्यानें बोलत राहिलां तर वाड्यांत एकदम गांधळ होऊन त्यापासून इतर कांहीं नका तर होणार नाहींच, परंतु तुम्हांवर व मजवर मात्र गच्छंतीची पाळी येईल! यापलीकडे कांहीं गोष्ट होणें नाहीं! याकरितां तुम्ही आतां असें करा, आपल्या कैलासवासी महाराजांच्या पक्षाचे जवढे म्हणून लोक तुम्हांस ठाऊक असतील त्यांच्या घरीं जा. सर्वांची एकवेळ भेट घ्या. नंतर सर्वांचा विचार पडेल त्याप्रमाणें आपण काय गोष्टी करणें त्या करूं.

**हिं०**—ठीक आहे. मी जातों. पण **मालोजी-राव!** या कृतघ्न **दौलतरावाच्या** हातून आपल्या महाराजांचा अंत झाला ही गोष्ट विसरूं नका! ज्या महाराजांच्या मरणाची वार्ता ऐकून सर्व प्रजा खळखळां रडली, ते महाराज राजवाड्यांतील देवघरांत या दुष्टानें निजविले ही गोष्ट पक्की लक्षांत ठेवून याचा पूर्णपणे सूड उगवावयाचाच, या गोष्टीचें मात्र विस्मरण होऊं देऊं नका.

**मा०**—तुह्मीं मजविषयीं यत्किंचितूही शंका मनांत नका आणूं! तर आतां जलदी करून आपल्या सर्व स्नेह्यांस भेटा. या शहरच्या पश्चिमवेशीजवळ **मानाजीराव फांकडे** राहतात, त्यांजकडे जा. ह्या **मानाजीरावांनीं** आपल्या पक्षास मिळावे ह्मणून **दौलतरावानें** होते तितके प्रयत्न केले; परंतु ते सर्व व्यर्थ! असो. आमच्या **यशवंतराव** महाराजांची हकीकत नेहमी अगोदर त्यांस कळते यासाठीं ते सुरक्षित आहेत किंवा कसें—देव करो आणि आमचे बाळमहाराज चिरायु होवोत—हें तुह्मांस **मानाजीरावांकडून** कदाचित् कळेल. तें कळलें ह्मणजे त्याप्रमाणें विचार करावयास ठीक पडेल.

**हिं०**—ठीक आहे—मी जातों तर. कोठें पश्चिमवेशीजवळ तुह्मीं ह्मटलें, नव्हे?

**मा०**—होय तेथेंच! **सिद्धेश्वराचे** देवळापुढें आंत बोळ जातो त्या रस्त्यानें नीट जा, ह्मणजे तुह्मीं लवकर जाऊन पोंचाल. (डंका ऐकूं येतो.) हूँः करा जलदी! याउपर येथें राहिलेले जर कोणाच्या दृष्टीस पडलां, तर न जाणो प्राणांवरही बेतेल.

(डंका मोठ्यानें ऐकूं येतो.)

हूँः चला निसटा आतां! **दौलतराव** शिकारीहून परत आला.

**हिं०**—कुळक्षय होवो त्या दुष्टाचा! बरें असो. मी जातों. **मालोजीराव! राजसबाई, यशवंतराव,** व ही तुमची हतभाग्य देशमाता, यांना कोणतीं दुःखें सोसावीं लागत आहेत त्यांचें विस्मरण नका बरें पडूं देऊं!

(निघून जातो.)

**मा०**—विस्मरण! यांचें जर मला विस्मरण होईल, तर या पापाबद्दल नरककुंडापेक्षांही अघोर शासनच मला योग्य होईल! असो. मा तिहींवर माझी अनंत प्रीति आहे! परंतु काय करूं? सध्यां हात चालत नाहीं तोंपर्यंत **दौलतरावाशीं** वरपांगीं प्रेमभावानें वागणें सोडितां येत नाहीं! **हरहर!**

(निघून जातो.)

---

## प्रवेश २.

**स्थळः—राजवाड्यांतील एक महाल.**

( **दौलतराव** आणि वाड्यांतील रखवालदार येतात.

**दौलत०**—(आपणाशीं) आज रानांतील शिकार तर फार उत्कृष्ट साधली यांत संशय नाहीं. परंतु अशीच राजवाड्यांतही जर सांपडेल तर उपयोग आहे! नाहीं तर सर्व व्यर्थ! (रखवालदारास) कायरे, **मालोजी** कोठें आहे? त्यास यावयास इतका वेळसा लागला?

(इतक्यांत मालोजी येतो.)

**मालो०**—महाराज, हा आपल्या चरणांचा दास आपल्या सेवेंत हजर आहे.

**दौल०—मालोजी!** ते सकाळचे पांच जण हरामखोर सुळावर चढले एकदाचे?

**मालो०**—होय. महाराज.

**दौल०—मालोजी!** त्यांच्या नाकास मिरच्यांची

धुरी द्यावयास सांगितली होती, तसेंच पाटी-वर कोरड्याचा मार देऊन पाटीचें चांगलें रक्त निघाल्यावर चार घटिकांपर्यंत हात पाय बांधून त्यांस भिंतींत पुरून ठेवावयास सांगितलें होतें, त्याप्रमाणें सर्व गोष्टी झाल्या?

**मा०**—झाल्या, महाराज!

**दौ०**—बरें, पण त्यापासून कांहीं उपयोग?

**गा०**—तेवढें मात्र विचारूं नका! त्यांच्या सारखे कठिणहृदयी लोक आपण यापूर्वी कधीं पाहिले नाहींत! आह्मीं त्यांचा इतका छळ केला, पण त्यांनीं शेवटपर्यंत आपलें ह्मणणें कांहीं सोडिलें नाहीं. सरते शेवटीं त्यांना सुळावर चढवावयाचें, तेव्हां आतां तरी आपला गुन्हा कबूल करा ह्मणजे महाराज तुह्मांस देहांत शिक्षा करणार नाहींत ह्मणून अभिवचनही दिलें, परंतु सर्व पालथ्या भांड्यावर पाणी! त्यांनीं ह्मणून गोष्ट कबूल केली नाहीं! हा प्रकार पहावयास लोकांची पण खूप गर्दी जमली होती, व ते सर्व लोक ह्यांची स्थिति पाहून खळखळां रडले!

**दौल०**—आः! दुष्टांनो! प्रत्यक्ष माझ्या प्रिय मित्राचा ज्यांनीं निर्दयपणें वध केला, त्यांच्याकरितां तुह्मीं रडलां काय? आग लागो तुमच्या रडण्यास! तें असो. पण **मालोजी**! तुह्मीं आज उदाससे दिसतां? अहो, मीं **काटक** लोकांला जिंकिलें त्याजबद्दल पंधरा दिवसपर्यंत दिवाळीसारखा चोंहीकडे सण करावयाचा असा माझा सर्वांस हुकूम झाला असून राजवाड्यांत चोंहीकडे आनंदीं आनंद भरून राहिला आहे, असें असतां तुह्मींच मात्र उदास दिसतां ह्याचें काय कारण?

**मा०**—तसा कांहीं प्रकार नाहीं. महाराज! कालच्या जागरणानें पित्तक्षोभ होऊन आज माझें किंचित् कपाळ दुखतें आहे. ह्मणून आपणास तसें वाटतें! वस्तुतः आपला निरंतर सर्वत्र जय व्हावा यातच मला आनंद आहे, तो मुद्रेवरून किंवा तोंडानें बोलूनच दाखवायला पाहिजे असें नाहीं. महाराज! मी उदास दिसतों याची माफी असावी.

**दौल०**—तें असो. **मालोजीराव**! मी हल्लीं जो या **कोंकण** प्रांतांत राज्य करीत आहें, तो फक्त या देशाचे पूर्वीचे आपले महाराज कैलासवासी झाले, त्यामुळें विनाकारण बेबंदशाईछाई न व्हावी एतदर्थच करीत आहें हें तुह्मांस ठाऊक आहेच! वस्तुतः मला या राज्याची बिलकुल जरूर नसून जरी **यशवंतराव** आज येऊन राज्य करूं ह्मणेल तरी तें त्याच्या स्वाधीन करावयास मी राजी आहें, असें असतां **यशवंतराव** माझा इतका द्वेष करीत आहे हें आश्चर्य नव्हे काय? प्रत्यक्ष त्याच्या घुठीस मिळत असलेल्या राज्याचें त्याच्यासाठींच मी रक्षण करीत असतां, तो खुशाल बाहेर देशीं राहून उलट मजशीं युद्धाच्या तयारीस लागला आहे हें कसें?

(इतक्यांत बहादरशिंग आंत येतो.)

**दौ०**—(त्यास पाहून) कां **बहादरशिंग**! काय खबर!

**बहा०**—(मिशीस पीळ भरून) महाराज! खबर काय विचारावी? आपणास आनंदीं आनंद होईल, व तसा इतर सर्वांसही होईल अशी कांहीं खबर मला आतांच कळली आहे.

**दौ०**—(घाईनें) ती काय बरें? लवकर लवकर सांगा पाहूं!

**बहा०**—महाराज! **यशवंतराव** मेला!

**मा०**—काय? **यशवंतराव** मेला!

**दौ०**–(मालोजीस) कां? याचें तुह्मांस एवढें आश्चर्यसें वाटलें?

**मा०**–(हात जोडून) महाराज, मी आश्चर्य वाटून बोललों नाहीं. माझा इतकेंच ह्मणण्याचा उद्देश होता कीं, आपला जे जे विनाकारण द्वेष करितील त्यांचा असाच अंत व्हावा!

**दौ०**–समजलों. बरें, **बहादरशिंग**! **यशवंतरावाच्या** मरणाबद्दल कांहीं कमजास्त हकीकत कळली आहे?

**बहा०**–महाराज! बातमी तर अशी लागते कीं, **यशवंतराव कर्नाटकच्या मुसलमान** राजाकडे आपणावर हल्ला करण्याकरितां मदत मागण्यास गेला होता.

**दौ० व मालोजी**–काय? **मुसलमान** राजाकडे गेला होता ह्मणतां?

**बहा०**–होय, असें खरें, परंतु तेथें कांहीं त्याची डाळ शिजली नाहीं. पण इतकें मात्र झालें कीं, **यशवंतराव** तेथें असतां त्या राजाच्या पदरच्या **पठाण** लोकांशीं तो कांहीं कारणावरून भांडला, तेव्हां त्याजवर दोन **पठाण** लोक तुटून पडले, त्यांपैकीं एक तर **यशवंतरावाच्या** हातून मेलाच, परंतु दुसऱ्यानें मात्र त्यापासून निसटून जाऊन त्यास न कळत ठार मारिलें.

**दौल०**–किती तरी कृतघ्नपणा हा! **मालोजी**, पाहिलेंना मीं किती वेळ ममतेनें त्यास आपणाजवळ बोलाविलें! परंतु त्याच्या हृदयास ह्मणून कांहीं त्याची दिक्कत नाहींच वाटली! असो मर्जी त्याची! त्याला जसा कांहीं मी कोणी विषारी सर्पच आहें सें वाटे! त्याला कुठें नुकतें मिसूं फुटूं लागलें होतें तेव्हां मीं त्याला पाहिलें होतें, त्याच्यावर हा कालपर्यंत त्याचें मला दर्शन ह्मणून नाहीं! बरें. **मालोजी**! या गोष्टीला अजमासें किती वर्षें झालीं असतील बरें?

**मालो०**–त्याचे वडील वारले त्या वेळीं त्याचें तेरा वर्षांचें वय होतें, त्याला आतां सात वर्षें झालीं असतील.

**दौल०**–तें असो. **मालोजी**! तुमच्या इमानाची परीक्षा पाहण्याची वेळ आतां आली आहे! तुमच्यावर **राजसबाईचा** मोठा विश्वास आहे हें मी पक्कें जाणतों, आणि ह्मणूनच या नाजुक कामीं तुमचीच योजना करित आहें. **मालोजी**! तुह्मांस काय सांगूं! या **राजसबाईकरितां** कीं नाहीं माझा जीव तिळतिळ तुटतो. परंतु काय करूं! ती माझें ह्मणणें एवढें सुद्धां ऐकत नाहीं यामुळें माझा नाइलाज आहे! कसें तरी करा आणि ती सुंदरी मला वश होईल असें करा! हें पहा, माझें तिजवर किती प्रेम बसलें आहे हें तुह्मीं प्रत्यक्ष पहातच आहां! यासाठीं तुह्मीं हा सर्व प्रकार चांगला तिला निवेदन करा आणि हरएक प्रयत्नानें ती मला वश होईल असें करावयास चुकूं नका. जर तुह्मांस यश आलें, तर, फार काय सांगूं? तुह्मीं मागूं शकाल त्याच्या शतपटही हा **दौलतराव** तुह्मांस द्यावयास सिद्ध आहे!

**मालो०**–महाराज, स्वामिकार्यांत माझ्याकडून अंतर कदापि व्हावयाचें नाहीं!

**दौल०**–ठीक आहे. **मालोजी**! तर मग आतां त्वरा केली पाहिजे. **यशवंतराव** मेल्याची बातमी तिला एव्हांना कळलीच असेल. आतांपर्यंत तिला **यशवंतराव** बाहेर आहे तो आपली सुटका करील ह्मणून आशा होती ती आतां नाहींशी झाली. तेव्हां

तिला वश करण्याची खटपट करण्याची वेळ हीच ! चला ! चला तुम्ही पुढें व्हा. मीही हा तुमच्या मागोमाग आलोंच.

**मालो०**—आज्ञा.

( निघून जातो. )

**दौ०—बहादुरशिंग!** वाहवा! केवढें माझें भाग्य! आजपर्यंत मला या **यशवंतरावा**पासूनच काय तें भय वाटत होतें परंतु आतां मात्र माझ्या चित्तास स्थिर वाटूं लागलें. आपण **यशवंतरावास** मारण्यास मारेकरी पाठविले हें मोठें धाडस तर खरेंच, परंतु परमेश्वराचे दयेनें आपणास यश आलें.

**बहा०**—महाराज ! यशाची गोष्ट असो. परंतु आपणास हें धाडस केल्याशिवाय गतिच नव्हती. कारण त्या थेरड्या सापास आपण चिरडल्यावर हें धाकटें पिलूं जगूं दिलें असतें, तर त्यापासून आपणास सदा सर्वकाळ भीति होतीच होती. तेव्हां झाली ती गोष्ट वाजवीच झाली !

**दौ०**—असें खरें ! आतां पहा या साऱ्या **कोंकण**पट्टीचा मालक काय तो मी ! परंतु **बहादुरशिंग**, आपण **यशवंतरावास** मारण्यास **अमरसिंग** पाठविला तो अद्यापि परत आला नाहीं याबद्दल मला मोठी चटपट लागून राहिली आहे! कदाचित् **अमरशिंग** मेला तर नसेलना ! **यशवंतरावा**वर दोन **पठाणांनीं** हल्ला केला असेंच तुम्ही ह्मणालां नव्हे ?

**बहा०**—हो. बातमी तरी निदान अशी आहे.

**दौल०**—आणखी त्या **पठाणां**पैकीं एकजण पडला, होयना ?

**बहा०**—होय. तो **यशवंतरावाचेच** हातून पडला, आणि, त्याच्या सोबत्यानें मात्र **यशवंतरावास** ठार मारलें.

**दौल०—बहादुरशिंग ! अमरशिंग** मेला असावा असेंच माझी मनोदेवता मला सांगत आहे. त्याच्या बरोबर त्याचा एक विश्वासुक चाकर गेला होता त्याचे जवळ मी आपली मुद्रेची आंगठी दिली होती, आणि त्याबरोबर निरोपही पाठविला होता कीं, जर कांहीं कारणांनीं तुह्मी अजारी पडलां, किंवा शत्रूच्या हातीं सांपडून वंदींत गेलां, किंवा दुर्दैवानें एकदा भलताच प्रसंग तुह्मांवर गुदरून तुह्मांस लौकर परत येतां आलें नाहीं, तर निदान ही आंगठी तरी मजकडे परत पाठवा, ह्मणजे **यशवंतराव** मेला अशी माझी खातरी होईल.

**बहा०**—ही बातमी नुकतीच आली आहे. तेव्हां कदाचित् **अमरशिंगाचा** विश्वासू नोकर लौकरच येण्याची वाट अद्यापि नाहीं असें नाहीं.

**दौल०**—होय तेंही खरेंच ! असो. पण **बहादुरशिंग** ! तुह्मी एक गोष्ट करा **राजसबाईस** तिचा पति मरण पावल्यामुळें जें दुःख झालें होतें तें ती आतां सर्व विसरून जाऊन तिनें आतां मजशीं पुनः विवाह करण्याचें कबूल केलें आहे ह्मणून तुह्मीं चोंहोंकडे बातमी पिकवा. कारण तिच्या खुशीनें ह्मणा, किंवा तिच्यावर बळजोरी करून ह्मणा, मी तिला वश तर करून घेणारच! आणि तीही गोष्ट फार दिवसांनीं नव्हे तर आजच्या आज रात्रीं सिद्धीस न्यावयाची ! ह्मणजे **कातक** लोकांस जिंकल्यामुळें हल्लीं चोंहोंकडे उत्सव चालू आहे त्यांतच आणखी हाही उत्सव होईल- तर चला आतां, आणि राजवाड्यासभोंवतीं

रखवालदारांचा पण पूर्ण बंदोबस्त असूं द्या!

**बहा०**—फार उत्तम आहे. (जातो.)

**दौल०**—आतां सर्व गोष्टी ठीक जमल्या! तर चलावें आतां राणीकडे. माझें हृदय तर उल्हासानें भरलें आहे! व हें काम हटकून सिद्धीस जाणार असें वाटून मी आतां आहें त्यापेक्षांही अधिक तरुण झालों आहें असें मला वाटत आहे. आतां सर्व **कोंकण** प्रदेशावर स्वामित्व माझें! व आतां मला जी पोरें बाळें होतील तींच या भूमीचीं मालक होतील. या माझ्या मनोरथतरूच्या बीजास **यशवंतरावाच्या** रक्ताचें पाणी घातलें आहे, तेव्हां या झाडाचा आतां विस्तार होण्यास अवकाश नाहीं!

(निघून जातो.)

## प्रवेश ३.

**स्थलः—राजसबाईच्या महालाच्या बाहेरील दिवाणखाना.**

(गजराबाई येते.)

**गज०**—देवा **नारायणा**! कोण ही या बिचाऱ्या **राजसबाईची दुःखावस्था**! धन्य धन्य ती मावली! तिनेंच ह्मणून आज सात वर्षेपर्यंत इतकीं दुःखें सोसून दिवस काढले! इतरांच्या हातून ही गोष्ट झाली नसती. आमचे बाबा तर तिच्या जसे कांहीं हात धुवून पाठीसच लागले आहेत! त्या बिचारीला त्यांच्या त्रासामुळें आपला प्राणही नकोसा झाला आहे, तरी त्यांचा ह्मणून आग्रह कांहीं सुटत नाहीं. जरा फावलें कीं बाबा **राजसबाईच्या** मंदिरांत जातात आणि तिला विचारूं नये तसल्या भलत्या सलत्या गोष्टी विचारतात, परंतु ती ह्मणून त्यांच्या ह्मणण्याकडे इतकें सुद्धां लक्ष पुरवीत नाहीं. बाबा कांहीं बोलले तरी तिचें एकसारखें रडणें चाललें असतें. तिची ती स्थिति पाहून मला देखील अतोनात रडूं येतें, परंतु काय करूं! एक दोन वेळां बाबांनीं तिच्याजवळ मला रडतांना पाहिलें, तेव्हांपासून त्यांनीं मी **राजसबाईकडे** जाऊं नये ह्मणून सक्त ताकीद केली आहे; तथापि मी त्याची फारशी पर्वा न करितां फावेल तेव्हां माझ्या हातून होईल तितकें तिचें समाधान करीत असतेंच. परंतु तिचें ह्मणून दुःख कांहीं कमी होत नाहीं. एकादे वेळीं अंमळसें तिचें समाधान होतें आहे नाहीं, इतक्यांत कांहीं तरी नवीन काळजी उभी रहातेच! शिव शिव! आतांच नुकती मी तिचें समाधान करून बाहेर पडलें, इतक्यांत त्या पलीकडल्या खोलींत **बहादुरसिंग** आणखी दुसरा कोणी एक असे दोघेजण '**राजसबाई** माझ्या बाबांशीं लग्न लावण्यास कबूल आहे ह्मणुन चंडी पिकवावयाची' अशाविषयीं कुजबुजतांना मीं ऐकिलें, तेव्हांपासून तर बाई! माझ्या उरांत एकसारखें धडधड चाललें आहे! कांहीं केल्यानें थांबत नाहीं! या **राजसबाईची** येथून कशी तरी सुटका करावी ह्मणून मी मनांत सहस्र बेत योजितें. पण अजून एकही जमत नाहीं! काय करावें? देवा! **नारायणा**! तूं तरी दया करून या बिचारीचे क्लेश लवकर दूर कर, नाहीं तर ही बिचारी थोडक्याच दिवसांत राम ह्मणे!—

(दौलतराव येतो.)

**दौल०**—कोण **गजरा**! कांग ए पोरी! तुला **राजसबाईकडे** जात जाऊं नको ह्मणूनना

मी सांगितलें होतें? कारटे! ह्या राजवाड्यांत चोहींकडे सर्व लोक आनंदांत बुडून गेले असतां, तूं त्या सदा सर्वकाळ शोक करीत बसणाऱ्या **राजसबाई**कडे काय ह्मणून जाऊन बसतेस ? कां रडतेस कां अशी ?

**गज०**—बाबा! तुह्मीं काय पाहिजे तें ह्मणा, मला तुह्मी हव्या तितक्या शिव्या द्या, परंतु तुमच्या पायांशपथ मी सांगतें, त्या **राजसबाई**ची स्थिति माझ्यानें पाहवत नाहीं.

**दौल०**—पोरी! पण अगोदर तूं तिच्याकडे जातेस काय ह्मणून ? तुला पोरीला एकदा तिकडे जाऊं नको ह्मटल्यावर फिरून जाण्याची गरज ?

**गज०**—बाबा! तें कांहीं मला सांगतां येत नाहीं. परंतु मी तुमच्या पायां पडतें. बाबा! तुह्मीं त्या **राजसबाई**स असा त्रास नका देऊं! मी आतांच ही तिच्याच महालांतून आलें—

**दौल०**—गाढव पोर नाहीं तर! कारटे!—

**गज०**—बाबा! **राजसबाई**चा आपणास एक निरोप आहे.

**दौल०**—काय? निरोप? कोणाचा? **राजसबाई**चा? बोल बोल! तिचा काय निरोप आहे ?

**गज०**—निरोप मिळून इतकाच कीं,—

**दौल०**—बस बस! तुझें पाल्हाळ बोलणें मला नको! झटदिशीं बोल काय निरोप आहे तो!

**गज०**—होय, पण बाबा! मी सांगतेंच आहें!

**दौल०**—फिरून आपलेंच! बोल लवकर!

**गज०**—**राजसबाई**नें तुह्मीं लढाईहून परत आलां ह्मणून ऐकिलें, तेव्हांपासून त्या विचारीला तुह्मीं त्रास द्यावयास याल ह्मणून एकसारखें भय वाटतें आहे. बाबा! आधींच ती बिचारी दुःखानें गांजली आहे तर तिला कृपा करून एकांतवासांत स्वस्थपणें राहूं द्या!

**दौल०**—गप बस! पोरी! तुला ह्या गोष्टींत कांहीं ज्ञान नाहीं! तूं मुकाट्यानें अस! -बरें पण तिचा निरोप ?

**गज०**—मी सांगितला हाच!

**दौल०**—काय? एकून **राजसबाई** माझें ह्मणणें ऐकत नाहीं काय? —आः दुष्टे! तूं मला वश व्हावेंस ह्मणून मी आज सात वर्षें खटपट करितों आहें त्याचें हेंच फळ? थांब दुष्टे! तुला अशी मोकळी सोडतां उपयोगी नाहीं! ही मध्यें **काटक** लोकांची लढाई निघाली नसती, तर तुला यापूर्वीं कधींच—

**गज०**—बाबा! बाबा! तुह्मीं हें काय बोलतां? बाबा! तुह्मीं माझ्याकडे पहा, आणि आपण दोघें या बिचाऱ्या हतभाग्य **राजसबाई**चें समाधान करूं या!

**दौल**—काय? तुझ्याकडे पहा? पोरी! तुझा आणि **राजसबाई**चा काय संबंध ?

**गज**—बाबा! तें कांहीं मला विचारूं नका. परंतु तुमच्या गळ्याशपथ मी सांगतें, **राजसबाई**ला हा असा त्रास जोंपर्यंत तुह्मीं द्याल, तोंपर्यंत माझ्या ह्मणून मनाला समाधान वाटावयाचें नाहीं!

**दौल०**—पोरी! चल निघ! जीभ आटप! तूं प्रत्यक्ष माझ्या पोटची असून तुला असल्या गोष्टी बोलण्यास शरम नाहीं वाटत ? दुष्टे! या शहरांत चोंहीकडे सर्व लोक आनंदोत्साहांत गुंतले असून, तूं आपल्या या वेडगळ बरळण्यानें त्यांच्या आनंदाचा

विरस करणार काय ! अग, या राणीचा पुत्र **यशवंतराव**, जो माझा अत्यंत हाडवैरी तो मेल्याची बातमी अद्यापि शहरांत पसरली नाहीं. ती एकदांची परसली ह्मणजे चोहोंकडे एकदम हल्लींपेक्षां शतपटीनें अधिक उत्साह सुरू होतील, त्या सर्वांस तूं विरजण घालणार काय ?

**गज०**—हाय हाय ! रे उदार राजपुत्रा ! हाय हाय !

( मूर्च्छित होते. )

**दौल०**—( घाईनें ) अरे ! कोणरे आहे तिकडे ? थोडें पाणी आणा पाहूं ! **गजरे** ! **गजरे** ! सावध हो सावध हो ! ( तीस वारा घालतो गजराबाई हळुहळू सावध होते. ) ( आपणाशीं ) यांत कांहीं तरी काळें बेरें आहे खचित. ( मोठ्यानें ) **गजरे**! खरेंच सांग, तुला त्या दुष्ट **यशवंतराव**ाच्या मृत्यूचें वर्तमान ऐकून इतकें कां वाईट वाटलें ? याचा अर्थ काय ?

**गज०**—( रडत रडत ) बाबा ! **यशवंतराव** तर मेलाच, तेव्हां त्याला आतां तुह्मांपासून कांहीं भय राहिलें नाहीं, याकारितां आतां मागील सर्व हकीकत सांगतें. तुह्मांस आठवत असेलच, सुमारें पांच महिन्यांपूर्वी आपण **पर्वतेश्वरा**च्या जत्रेकारितां निघालों होतों, त्यावेळीं आपले लोक अगदीं गैर सावध असतां वाटेंत मध्यरात्रीं एकाएकीं चोरट्यांनीं आपणावर छापा घातला.—

**दौल०**—होय ! मला त्याची पक्की आठवण आहे. आपणावर छापा घातला तेच **काटक** लोक ! आणि मी नुकताच ज्या प्रचंड स्वारींत विजयी होऊन आलों ती करण्याचा उद्देश तरी या चोरट्यांस शिक्षा करावी हाच !

**गज०**—तसेंच, तो छापा पडला त्या धांदलींत त्या चोरट्यांनीं मला पकडून बांधून नेलें, आणि **पर्वतेश्वरा**च्या पश्चिमेकडल्या अंगच्या एका गुहेंत अन्नपाण्याशिवाय कडून ठेविलें. पुढें दुसऱ्या दिवशीं सगळी जत्रा संपून लोक जिकडचे तिकडे जाताहेत इतक्यांत तुह्मीं माझ्या शोधाकारितां चोंहोंकडे घोडेस्वार पाठविले, परंतु त्यांस माझा कांहीं शोध न लागतां ते तसेच परतून निघून गेले. त्यानंतर त्या दुष्ट लोकांनीं मला हातपाय दोरखंडांनीं बांधलेली अशी बाहेर काढून दुसरीकडे न्यावयाचा बेत केला.

**दौल०**—पुढें ?

**गज०**—त्याप्रमाणें सर्व तयारी होऊन ते चोरटे मला घेऊन दोन तीन कोस गेले. वाटेंत ते लोक माझी हवी तशी थट्टा करीत, व तोंडानें बोलूं नये असे अभद्र शब्दही मजपुढें बोलत. तरी मी त्याकडे लक्ष न देतां एकसारखी रडतच होतें.

**दौल०**—हूँ हूँ ! त्या दुष्टांनीं एकून असा त्रास दिला अं ! बरें मग पुढें ?

**गज०**—पुढें ते लोक एका जंगलांत वस्तीस राहिले. तेथेंही त्यांनीं माझी पूर्ववत् थट्टा चालविलीच होती. दोनप्रहरच्या सुमारास तेथें एक जवळच ओढा होता त्यांत त्यांनीं मला अंग धुवूं दिल्यावर त्यांतीलच एका चोरट्यानें आठ चार दिवसांची शिळी झालेली चत्कोर दीडचत्कोर भाकरी आणि एक वाळलेला कांदा आणून माझ्यापुढें ठेविला. माझ्या मनांत कांहीं खावयाचें नव्हतें, तरी सबंध एक दीड दिवस पोटांत कांहींच अन्न गेलें नसल्यामुळें नाइलाज होऊन मी भाकरीचे एक दोन तुकडे पाण्यांत भिजवून खाल्ले. ते खात आहें इतक्यांत त्या चोरट्यांच्या टोळीचा नाईक त्या ठिकाणीं आला आणि माझी बायको हो

ह्मणून मला ह्मणूं लागला. मी कांहींच बोललें नाहीं. एकसारखी रडतच होतें. तरी त्यानें तिकडे लक्ष न देतां मला अधिक अधिकच त्रास द्यावयास आरंभ केला.

**दौल०**—( दांत ओठ खाऊन ) आः दुष्टांनो !

**गज०**—पुढें तो मजजवळ येऊन आतां माझ्या अंगास बिलगतो असें वाटून मी भयानें एकदम किंकाळी टोकली, इतक्यांत देवाची करणी त्या झाडींतून एक घोडेस्वार हातांत बंदुका तरवारी घेतलेला असा बाहेर पडला. व तो चोरटा आतां मला मिठी घालणार इतक्यांत त्या घोडेस्वारानें त्वरेनें घोड्यावरून खालीं उतरून त्याच्या कंबरेवर एक जोरानें लाथ मारून त्यास उलथून पाडिलें, व त्याचे हातून माझी सुटका केली. हा घोडेस्वार दिसण्यांत चांगला सुरेख होता हें तुह्मांस मीं सांगितलेंच आहे. बाबा! तो घोडेस्वार तुह्मी ज्याला आपला शत्रु ह्मणतां तो **यशवंतरावच** होता. त्यानें माझी सुटका केल्यावर त्याचे मी उपकार मानिले. पुढें त्यानें मी कोण व मला कोठें जावयाचें आहे ह्मणून हकीकत विचारली. त्यावेळीं मी तुमची मुलगी ह्मणून त्यांस सांगितलें. तुमचें नांव ऐकिल्याबरोबर पहिल्यानें तो चपापल्यासारखा झाला, परंतु कांहीं वेळानें शांत होऊन त्यानें ह्मटलें कीं, "जा. तुला पित्याच्या गांवीं परत नेऊन पोंचवितों. परंतु तेथें तूं गेल्यावर ज्याप्रमाणें मीं या वेळीं तुझें संरक्षण केलें त्याप्रमाणें तूंही बंदींत पडलेल्या माझ्या आईचें संरक्षण कर." त्याप्रमाणें मी कबूल केलें. पुढें हकीकत झाली ती सर्व तुह्मांस ठाऊक आहेच. त्या उदार राजपुत्रानें मला सुरक्षितपणें परत घरीं आणून पोंचविलें ! हायहाय ! अशा त्या उदार पुरुषास काळानें घेरून त्याचा घात केला तेव्हां ही गोष्ट खचित कोणी तरी अधम मनुष्यानें केली असावी !

**दौल०**—पोरी ! गप्प रहा ! मी झालों आहें भांबावल्यासारखा ! तूं सांगतेस हें खरेंच काय? तो **यशवंतराव** होता हें तुला ठाऊक असून तूं आजपर्यंत त्याला मजपासून चोरलेंस ? कारटे ! बोल बोल ! तूं सांगतेस हा प्रकार खरा आहे ह्मणतेस ?

**गज०**—होय बाबा ! ज्यानें मजवर महत् उपकार केले त्याच्याशीं मी विश्वासघात कसा करावा ? त्यानेंच होऊन मला सांगितलें कीं तुझा बाप हात धुऊन माझ्या पाठीस लागला आहे, यासाठीं मीं तुला सोडविलें ह्याबद्दल तूं चकारशब्द सुद्धां कोणापाशीं बोलूं नको.

**दौल०**—आः दुष्टे ! अगे तो प्रत्यक्ष माझा शत्रु असतांही त्याच्या हातून आपली सुटका करून घ्यावयास राजी झालीस, तुला लाज नाहीं वाटत ?

**गज०**—पण बाबा! **यशवंतरावानें** तुमचें शत्रुत्व कधींही केलें नाहीं !

**दौल०**—काय ? अजूनही **यशवंतरावाचें** नांव सोडीत नाहींस ? कारटे ! तुला बापाच्या नांवाची कांहींच चाड वाटत नाहीं अं ! पोरी ! त्या दुष्ट **यशवंतरावा**चे हातून आपली सुटका करून घेऊन आपल्या बापाच्या नांवाला कलंक लावून घेण्यापेक्षां त्या चोरट्यांच्या गुहेंतच अन्नपाण्यावांचून राहिली असतीस, किंवा एखाद्या भयाण अरण्यांत व्याघ्रादिक हिंस्र पशूंच्या हातून मेली असतीस तरी चिंता नव्हती! निर्लज्ज कृतघ्न कारटी कोठची! चल,

निघ! तोंड आपलें काळें कर! खबरदार! फिरून राजसबाईच्या महालांत जाशील किंवा तिच्याजवळ यशवंतरावाच्या मृत्यूची गोष्ट काढशील तर!—तसेंच खबरदार! राजसबाईला मी त्रास देतों याविषयीं पुनरपि माझ्यापुढें एक चकारशब्द बोलशील तर!—आः—राजसबाईचा मी उपभोग खचित घेणारच! जर ती नाकबूल करील तर तिचा या—या—हातानें—

( त्वेषानें निघून जातो. )

गजरा०—हरहर! हतभाग्य बिचारी राजसबाई! ती ह्या सर्व कोंकणपट्टीची मालकीण असतांना तिची अशी दुर्धर स्थिति व्हावीना! हरहर! राजसबाई! तुझ्याकरितां माझा जीव तिळतिळ तुटतो, परंतु काय करूं! तुझ्यावर कोणते घोर प्रसंग येऊन गुदरणार कांहीं समजत नाहीं. ( स्तब्ध रहाते, व कांहीं वेळ विचार केल्यासारखें दाखविते. ) असो. राजसबाईचें ह्मणणं फक्त आपली कशी तरी येथून सुटका होऊन आपल्या बापाच्या गांवीं जाऊन रहाण्यास सांपडावें एवढेंच आहे, कांहीं चिंता नाहीं, अद्यापि मजविषयीं कोणाच्या मनांत कांहीं संशय नाहीं, तोंपर्यंतच इची सुटका करण्याची कांहीं तरी युक्ति करितें. एकदांची हिची येथून सुटका झाल्यावर मागें बाबा रागावून माझें कांहींही करोत. त्याबद्दल मी मुळींच पर्वा करीत नाहीं! मी यामध्यें कोणचीहीं पापाची गोष्ट करितें असें मला वाटत नाहीं, यासाठीं परमेश्वर माझा सहाकारी होईल! देवा! कसेंही करून माझ्या हातून त्या बिचाऱ्या राजसबाईची सुटका होऊंदे. ती एकदांची झाली ह्मणजे बाबांच्या सर्व पापाचरणाबद्दल मला स्वतः प्रायश्चित्त भोगावें लागलें, तरी तें मी स्वसंतोषानें भोगीन!

( निघून जाते. )

# अंक २.

## प्रवेश १.—राजवाड्यांतील राजसबाईचा महाल.

( राजसबाई एकटी बसली आहे. )

राजस०—परमेश्वरा! काय ही माझी दुर्धर स्थिति! देवा! नारायणा! काय हा मजवर गहजब! प्राणपतींचा तशा प्रकारें अंत झाला त्या दुःखांत मी चूर आहें, तों माझ्या प्रियपुत्राचीही तीच अवस्था झाली! परमेश्वरा! तूं पूर्ण न्यायी असतां तुझ्या राज्यांत हा असा अन्याय व्हावाना? त्या दुष्ट घातकी दौलतरावानें माझ्या बिचाऱ्या निरपराध प्राणपतींचा आणि कोमल बालकाचा निर्दयपणें घात केला, आणि हल्लीं माझ्या पातिव्रत्याचा भंग करण्याचा त्याचा सदोदित यत्न चालत आहे, या गोष्टी तुझ्यानें मुकाट्यानें पहावतातना!!! देवा! कौरवसभेंत द्रौपदीमातेची दुष्टांनीं विटंबना केली त्यावेळीं तिचा धांवा ऐकून तूं त्या साध्वीची लज्जा रक्षण केलीस, त्याप्रमाणें मज अबलेची इतकी विटंबना होत असतां व या संकटांतून मला सोडीव ह्मणून मी तुझा निरंतर धांवा करीत असतां, माझी लज्जा रक्षण करण्याचें तुला संकट वाटलें ना! देवा! भक्तांची दीनवाणी श्रवण करून तुझें अंतःकरण द्रवतें आणि तूं त्यांचें रक्षण करितोस अशी तुझी सनकसनंदनादिक महामुनि ख्याति वर्णन करीत असतात, तिचा अनुभव मज हतभाग्येला कां बरें येत नाहीं? त्या दुष्टानें प्रत्यक्ष तुझ्या देव्हाऱ्यासमोर माझ्या प्रिय

प्राणपतींचा घात करून मी त्यांचे बरोबर सती जात असतां मध्येंच विघ्नही करून मला कारागृहीं ठेविलें, आणि प्रत्यहा माझा छळ करीत आहे, ह्यांत माझी विटंबना होत नाहीं असें तुला वाटतें काय ? देवा ! प्रत्यहीं हा दुष्ट मजकडे येतो, आणि कुलस्त्रियांनीं ऐकूंही नये अशी बडबड करून मला अनिवार ताप उत्पन्न करितो, ह्याची तुला कांहींच कींव येत नाहीं ? माझ्या निरपराध बाळकाचा मारेकऱ्यां-कडून या दुष्टानें घात केला याजबद्दल तु-झ्या ऱ्हदयात कांहींच द्रव येत नाहीं ? असो, तुझ्याकडे तरी काय दोष आहे ? मीच चांडाळीण ! माझीं पूर्व जन्मींचीं कर्मेंच तशीं अघोर असतील, ह्मणूनच तूं माझ्या दुःखाची उपेक्षा करीत असशील ! असो. तूं पूर्णन्यायी आहेस ! तूं ठेवशील तसें आह्मां मानवांस रहाणें प्राप्त आहे ! परंतु देवा ! आतां माझी उपेक्षा नको करूं ! पहा ! मला हा माझा जीवही नकोसा झाला आहे, याकरितां दया करून एक-वार माझा अंत तरी कर ! देवा !—

( इतक्यांत मालोजी येतो त्यास न ओळखून. )

हा पहा दुष्ट माझा पुनरपि छळ करण्या-करितां येत आहे. देवा ! याचे हातून मला सोडीव ! देवा ! देवा ! देवा !

( मूर्छित होते. )

**मालो०**—( आपणाशीं ) धिक्कार असो या सेवेला ! हा अधमपणा पत्करून मी दिवस कंठित आहें, तो केव्हां सरेल तो सरो. जो हेतु मनांत धरून मी या दुष्टाची सेवा पत्करिली, तो आज सर्वथा विफळ होण्याची वेळ आली आहे ! या दुष्टाची पापवासना तृप्त करण्यासाठीं या **राजसबाई**चें मन वळ-वावें ह्मणून मला इकडे पाठविलें आहे! देवा! या मावलीनें त्या दुष्टास वश व्हावें हे शब्द माझ्यानें बोलवतील तरी कसे !

( स्तब्ध उभा राहतो, व कांहीं वेळ विचार करून. )

असो. कांहीं चिंता नाहीं. बोलतोंच. हे शब्द बोलणें ह्मणजे कसें जिवावर येतें. परंतु बोलल्याशिवाय परिणाम ना-हीं ! प्रसंगाकडे लक्ष दिलें पाहिजे ! ( पुढें येतो इतक्यांत राजसबाई मूर्छित पडली आहेसें पाहून ) अरे हें काय ?—आईसाहेब! सावध व्हा सावध व्हा ! ( तीस वारा घालितो. )

**राजस०**—( हळू हळू सावध होऊन ) अरे दुष्टा! तूं अद्यापिही माझा छळ करणें सोडीत नाहींस? दुष्टा ! हो पलीकडे ! खबरदार माझ्या अंगास स्पर्श करिशील तर !—

**मालो०**—आईसाहेब ! आपण मला ओळखिलें नाहीं ! आईसाहेब ! मी **मालोजी** आहें **दौलतराव** नव्हे !

**राजस०**—कोण ! **मालोजी** ! दुष्टा ! तूं खोटें बोलतोस !

**मालोजी०**—नाहीं आईसाहेब ! मजकडे नीट पहा ! मी आपलाच इमानी चाकर **मालो-जी** आहें.

**राज०**—( त्यास ओळखून ) **मालोजी** ! माफ क-रा ! मी तुह्मांस ओळखिलें नाहीं ! मला वाटलें तो दुष्ट माझा छळ करण्याकरितां आला आहे ! असो. **मालोजी** ! आपण काल बोलत होतां ती गोष्ट झाली हो ! माझा बाळ मला सोडून गेला हो !

( शोक करिते. )

**मालो०**—( डोळ्यांत पाणी आणून आपणाशीं ) काय ! एकून हिला **यशवंतरावाच्या** मृत्यू-ची हकीकत कळली अं! आः—दुष्टा निर्दया!

राज०-(रडत रडत) **मालोजी**! आतां माझा बाळ मला भेटेल काहो! बाळा! बाळा! अरे, प्राणपतींच्या मागें तूंच काय तो माझ्या जिवास आधार होतास, तो तूंही मला सोडून गेलास ना!-देवा **वैकुंठाधीशा**! दैत्यांचा संहार करणारी ती गदा दुष्ट **दौलतरावाच्या** मस्तकावर कां घालीत नाहींस! देवा! याच दुष्टानें-

**मालो०**-आईसाहेब! आतां शोक करून काय उपयोग? प्राप्तकालास अनुसरून धैर्याचें अवलंबन करणेंच आपणासारख्यांना उचित होय. आपणावर आकाशच कोसळलें ही गोष्ट खरी, तथापि आपण जर असा शोक करूं लागलां तर आह्मांसारख्या आपल्या गरीब दासांनीं काय बरें करावें? आईसाहेब! मी आपणांस ह्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टी सांगाव्या अशी माझी योग्यता नाहीं, तथापि सांगतों. आपण धैर्य धरून आज सतत सात वर्षें जशीं काढिलीं तसे आणखीही कांहीं दिवस काढावे. देव सुदिन दाखवील तर अद्यापिही आपण या सर्व संकटांतून मुक्त व्हाल!-

**राजस०-मालोजी**! तुह्मीं ह्मणतां या सर्व गोष्टी खऱ्या, परंतु माझा बाळही मला सोडून परलोकास गेला, आतां मला सुदिन तो कसचा येणार! आणि देव तरी माझी या संकटांतून सुटका कशी करणार! एक-तो माझ्या आयुष्याचाच अंत करील, तरच मात्र माझी सुटका होईल! एरवीं नाहीं!

**मालोजी**-आई साहेब! आपण माझें ह्मणणें समजलां नाहीं! आपणावर अघोर प्रसंग येऊन गुदरले, व आपणास आमचे थोरले महाराज व बाळमहाराज दोघेही अंतरले, या सर्व गोष्टी खऱ्या; तथापि आह्मी प्रजा ह्मणजे आपलीं लेंकरेंच आहों, यास्तव आह्मां गरीबांकडे पाहून, व आह्मांस हल्लीं जीं अनिवार संकटें भोगावीं लागत आहेत त्यांकडे लक्ष देऊन, पुनरपि आपल्या प्रजांचें समाधान करणें आणि त्यांस सुख देणें ह्या गोष्टी आपणांकडेच आहेत. प्रस्तुत आपणांवर काळचक्र फिरलें आहे ही गोष्ट खरी, तथापि देव करील तर अद्यापिही या दीन अनाथ प्रजांचें समाधान आपण कराल! आई साहेब! **दौलतरावराजा**-

**राज०-मालोजी**! तुह्मीं शुद्धीवर आहां काय? **राजा** कोणास ह्मणतां? राजा कोण?

**मालो०**-आईसाहेब! **दौलतरावानें** आपणास **राजा** हा किताब घेतला आहे!

**राज०**-सत्यानास होवो त्या मेल्याचा! आग लागो त्याला न् त्याच्या धाडसाला! काय? **मालोजी**! त्या नीचानें राजा हा किताब घेतला आहे काय? हाय हाय? दुष्टा! नीचा! कृतघ्ना! अरे दोन निरपराध प्राण्यांस विश्वासघातानें ठार मारून आपण राजा! राजा! ह्मणून डांगोरा पिटवून घेतांस यांत पुरुषार्थ तो कोणचा? मेल्या! तुझा सत्यानास होईल! आणि इतकीं सर्व दुष्कर्में करून जो मोठपणा तूं आपल्या अंगीं मिरवूं पहात आहेस त्यापासून तुला कदापि सुख होणार नाहीं! मेल्या! हल्लीं तूं ज्याप्रमाणें मज अबलेची स्थिति केली आहेस, त्याप्रमाणेंच तूं एवढा पुरुषासारखा पुरुष असूनही तुझी स्थिति होईल! आणि सरते शेवटीं मेल्या! यम-

लोकांत आगीच्या खाईंत तुला पडावें लागेल! मेल्या—पण **मालोजी**! काय हो! माझ्या प्रिय प्रजांची या दुष्टानें अशी स्थिति केली आहे. तींतून त्या केंव्हां मुक्त होतील त्या होवोत, परंतु आतां प्राणपति आणि माझा **यशवंतराव** यांच्यामागें मज दुबळीला आधार काय तो तुमचाच आहे! तर मला खरेंच सांगा! **मालोजी**! तुमच्या पायां पडतें—

**मालो०**—छे छे! आईसाहेब—हें काय? मी आपलें लेंकरूं आहें. आपण सांगाल त्याप्रमाणें वागण्यास तयार आहें!

**राज०**—मालोजी! मला कीं नाहीं, इतःपर या राजवाड्यांत रहाण्यापेक्षां प्रत्यक्ष नरकवासही बरा असें वाटूं लागलें आहे. याकरितां तुह्मांस विचारितें, माझी येथून सुटका होण्यास तुह्मांस कांहींच उपाय सुचत नाहीं? एकदाची जर माझी येथून सुटका होईल, तर मी खुशाल अनवाणी अन्नपाण्याशिवायही आपल्या बापाच्या घरापर्यंत चालत जाईन! तर सांगा—**मालोजी**!

**मालो०**—येथून सुटका होऊन जाण्याची अशा व्यर्थ आहे! त्या दुष्टास तुह्मी त्याचा द्वेष करितां हें पक्कं माहीत आहे, व यासाठीं त्यानें आपल्या महालासभोंवतीं रात्रंदिवस सक्त पहारा ठेविला आहे! ह्मणून मी आपणास एवढीच विनंती करितों कीं, आपण विनाकारण त्यास चिडवूं नका. आपण त्याच्याशीं निष्ठुर भाषण कराल तर हल्लीं आहे त्यापेक्षांही तो आपणास अधिक त्रास देईल! यासाठीं त्याच्याशीं सौम्य रीतीनें बोला, व तो कांहीं बोलला तरी नुस्तें त्यास हो हो करीत चला. ह्मणजे अशा युक्तीनें कदाचित् सुटका झाली तर होईल!

**राजस०**—काय! ज्या नीचानें माझ्या प्राणप्रियाचा आणि बालकाचा निर्दयपणें वध केला त्याच्याशीं मी सौम्य रीतीनें बोलूं काय? आणि त्याच्याशीं गोडीगुलाबीनें वागून आपली सुटका करून घेऊं काय? **मालोजी**! तुह्मांस खचित सांगतें, या गोष्टी करण्यापेक्षां मरावयाचें पडलें तरी त्याबद्दल मला कांहीं वाईट वाटावयाचें नाहीं! हायहाय, हे प्राणपती! हायहायरे माझ्या लाडक्या बाळा! चला मीही तुह्मांमागून आलेंच!—

**मालो०**—आईसाहेब! असा जर आपला निश्चय आहे तर आपण **दौलतरावास** भेटावयाच्या नाहीं असें मला वाटतें!

**राज०**—होय. मी त्या दुष्टाचें तोंड काळें कागोरें कसें तें पहावयाची नाहीं. परंतु जर कदाचित् पहावयाची वेळ आलीच, तर त्यास मी अशा शिव्या देईन न् त्याच्या बेचाळीस पिढ्यांचा पण असा उद्धार करीन, कीं कधीं देखिली होती कीं नव्हती!

**मालो०**—आईसाहेब! काय ह्मणतां आपण? त्या दुष्टाच्या पापाचरणाबद्दल त्याचा सूड घेण्याचें सोडून त्यास आपण नुसत्या बायकांसारख्या शिव्याच देत बसणार!

**राज०**—काय? काय ह्मणतां, **मालोजी**? सूड—सूड! **मालोजी**! सूड कसा घ्यावा हें मला सांगा तर पाहूं! मज अबलेच्या हातून होण्यासारखी अशी कांहीं गोष्ट असली तर मला सांगा, ह्मणजे मी ती करावयास कबूल आहें!

**माळो०**—दुसरी तिसरी कांहीं गोष्ट नाहीं. तोंड देखलें गोड गोड बोलून कशी तरी त्याजपासून परवानगी घेऊन आपल्या वडिलांकडे जा, आणि त्यांस आजपर्यंत या दुष्टाचे हातून जीं दुःखें सोसावीं लागलीं आहेत तीं कळवा, ह्मणजे ते कांहीं तरी तजवीज करून या राजश्रींचा चांगला समाचार घेतील ह्यांत संशय नाहीं !

**राज०**—होयहोय ! खचित **मालोजी** ! शाबास ! तुमची मसलत मला मान्य आहे, आणि सर्व अंतर्याम पहा कसें या दुष्टाचा सूड केव्हां घ्यावयास सांपडेल ह्मणून अगदीं संतप्त होऊन गेलें आहे ! **मालोजी** ! धन्य धन्य तुमची ! आतां दौलतराव आला ह्मणजे त्याच्याशीं मी विशेष नम्रतेनें वागेन, ह्मणजे त्याचा डौल उतरल्यासारखा होईल ! या युक्तीनें स्वतंत्र होऊन मी आपल्या बापाकडे निघून जाईन, आणि तेथें गेल्यावर त्यास आपलीं दुःखें साद्यंत निवेदन करीन. ह्मणजे त्याचा क्रोधाग्नि प्रदीप्त होऊन तो आपल्या सर्व सैन्यासहवर्तमान या दुष्टा अधमावर एकदम येऊन हल्ला करील ! व या प्रसंगीं जे जे ह्मणून योद्धे बाबा बरोबर घेऊन येईल, ते सर्व माझ्या आजपर्यंत भोगलेल्या अनंत दुःखांबद्दल सूड घेण्याचकारितां काय जणुं आपल्या तरवारीच्या पात्यांस विष सारवूनच येतील ! अहाहा !

**मालोजी**—आई साहेब ! धन्य धन्य मातोश्री ! असा जर आपला उल्हास कांहीं दिवसपर्यंत टिकेल तर खचित सांगतों, आह्मां दीन प्रजांचें नशीब उघडावयास फार दिवस लागणार नाहींत! परंतु आई साहेब! आपणास एक गोष्ट सांगावयाची आहे ती हीच कीं, आपणास स्वातंत्र्य जर पाहिजे असेल, तर आपल्या बाळ महाराजांच्या मृत्यूबद्दल चकारशब्द सुद्धां काढूं नका. व जसें कांहीं ते जिवंत आहेत असेंच तुह्मीं समजतां आहां असेंच दाखवा ! तसें जर न कराल आणि त्यांच्या मृत्यूची गोष्ट काढाल, तर तुमचा राग तुह्मांसही आवरावयाचा नाहीं अशी स्थिति होईल ! ह्मणून आपणास ही विनंती आहे.

**राज०**—**मालोजी** ! तुमचें ह्मणणें मी समजलें. हाय हायरे माझ्या लाडक्या! आतां तूं कोठचा माझ्या दृष्टीस पडणार ! असो. भगवंताची मर्जी! बाळा ! तुझा त्या दुष्टानें विश्वासघातानें वध केला त्याबद्दल सूड उगविण्यासाठींच मात्र मी त्या दुष्टाशीं गोड बोलण्याचें पत्करितें आहें! हाय हाय! धिक्कार असो त्या गोड बोलण्यास!

**मालो०**—आईसाहेब ! हळू ! तो दुष्ट येण्याची वेळ झाली !—बरें मी विनंती केली त्याप्रमाणें वागण्याचें टरलें ना ?

**राज०**—होय टरलें. तुह्मीं त्याबद्दल बिलकुल धास्ती बाळगूं नका !

**मालोजी**—ठीक आहे. येतों तर मी आतां.

**राज०**—यावें. (मालोजी मुजरा करून निघून जातो.)

( दौलतराव येतो. )

**दौल०**—( गात गात राजसबाईपुढें येतो. )

**पद.**

तें मन निष्ठुर कां केलें, पूर्ण दयेनें जें भरलें. ध्रु.
पूर्णपौर्णिमाविधुसुंदर हा,
प्राणप्रिये, तव मुखचंद्र अहा !
नयनां देतो आल्हाद महा !

पाहुनियां शृंगारसागरीं, मन सुंदरि मम मग्नचि झालें. १.
अंगावरती नसति दागिने,
त्यालिस मळकीं हीं तूं वसनें,
तरि तूं शोभसि अधिकचि तेणें.
जाणों असशी प्रियसखि तूं हे, शेवाळ्यानें कमळ वेष्टिलें. २.
अस्ताव्यस्तचि हे तव वेणी,
लोळतसे प्रियसखये धरणी,
तीच्या संहरणाची करणी
करावयाला द्रुपदसुतेच्या, भीम तसा मि अलों या वेळे. ३.
कुंकुमतिलक नसे तव भाळीं,
ओठरक्तिमा सर्व निमाली,
तरि दिसशी तूं शुभ्र गुलाबकळी,
तीचा सुगंध सेवायाला, भ्रमरापरि मन चंचल झालें. ४
किति तरि प्रियसखि तुज मी विनवूं,
किति तरि तव पदिं मस्तक झिजवूं,
हो वश मज अशि नको गडे फसवूं,
मी तव किंकर, स्वामिणि मम तूं, त्वत्पदिं मस्तक पुनरपि लोळे. ५.
सर्व शत्रु म्यां प्रिये जिंकिले,
या देशींचें राज्य मिळविलें,
तव संगाच्या आशे धरिलें,
दे मज चुंबन आलिंगन अजि, तन मन धनही तुज अर्पियलें. ६.

(पदाचा अभिनय करीत तिच्या पायां पडतो. ती त्यास उत्तर न देतां दुसरीकडे पहात राहाते.)

**दौलत०**—(ती कांहींच बोलत नाहींसें पाहून) प्राणप्रिये! हें काय बरें असें? आपल्या सेवकजनांचा कोणी असा अव्हेर करितो काय? प्रिये! बोल बोल! मी नुकताच युद्धांत विजयी होऊन आलों आहें व आतां सर्व **कोंकण**पट्टीचा मालक मी झालों, या उल्हासानें माझें संपूर्ण अंतःकरण भरून गेलें आहे. तर कृपा करून एक वेळ मजकडे प्रेमदृष्टीनें पहा. अंतःकरणांत प्रेमबुद्धि धारण करून मला एकवेळ आलिंगन दे, तसेंच तुझ्या प्रेमरसाचा आस्वाद तुझ्या अधरमधुसेवनाच्या रूपानें एकवेळ या दासास घडूं दे, ह्मणजे मी एवढी लढाई मारून विजयी होऊन आलों या गोष्टीचें सार्थक होईल. नाहीं तर सर्व व्यर्थ आहे! प्रिये! हें काय बरें? एकवेळ या दासावर प्रेमाची—

**राज०**—(शांतपणें) **दौलतराव**! मी तुह्मांस यापूर्वीं अनेक वेळां सांगितलेंच आहे. त्यापेक्षां मला कांहीं निराळें तुह्मांस सांगतां येत नाहीं! माझे प्रिय प्राणपति काळमुखीं पडले. त्याबरोबर, वीर युद्धांत विजयी होऊन आला असतां त्याचें अभिनंदन करावयाचें, ही हौस नाहींशी झाली ती झालीच. ती ह्मणून आतां परत यावयाची नाहीं! आतां तुह्मीं प्रेमाची गोष्ट काढिली, तिच्याबद्दलही माझ्यानें दुसरा जबाब देववत नाहीं! प्राणपतींच्या रक्षेबरोबर एक पुत्रप्रेम खेरीजकरून बाकी सर्व प्रेमाची रक्षा होऊन गेली! यासाठीं तुह्मांस सांगतें, तुह्मीं माझा नाद सोडून दुसऱ्या एकाद्या सुंदरीच्या प्रेमाचा अभिलाष धराल त्यांतच तुमचें कल्याण होणार आहे! त्या सुंदरीचें प्रेम तुह्मांवर बसेल, तर तुह्मीं आपलें सर्व आयुष्य सुखांत काढाल! यासाठीं पुनरपि एकवार सांगतें तुह्मीं दुसरीकडे नादीं लागा! माझ्या ह्मणून अंतःकरणांत प्रेमरसाचा लेशही उरला नाहीं, तेव्हां माझ्या प्रेमाची तुह्मीं आशा सोडा!

**दौल०**—प्रिये! तूं माझी थट्टा करितेस! प्रेम

कधीं अंतःकरणांतून नाहींसें होत असतें काय? तें तर उलटें अंतःकरणाचें जीवन आहे. यासाठीं प्रेमाचा वास अंतःकरणांत निरंतर असावयाचाच! आतां त्या प्रेमाचे विषय निरनिराळ्या वेळीं निरनिराळे असूं शकतील; यासाठीं एक विषय नाहींसा झाला कीं दुसऱ्यावर प्रेम जडावें इतकेंच काय तें!

**राज०**—तुमच्या ब्रह्मज्ञानाच्या गोष्टींपासून माझ्या अंतःकरणास यत्किंचित्‌ही बोध होण्याची आशाच तुह्मीं सोडा. हा समोर खांब आहे, त्याची आणि माझी स्थिति कांहीं भिन्न नाहीं! उभयतांस बोध होण्याचा संभव सारखाच! तथापि माझी तुह्मांस एक विनंती आहे, ती हीच कीं जर तुमचें मजवर खरोखरीच प्रेम असेल, तर तें प्रेम माझ्या अनुभवास आणून द्या! माझें दुसरें तिसरें कांहीं मागणें नाहीं. एकवेळ कृपा करून मला **कमलगडास** माझ्या बापाकडे पोंचवा ह्मणजे मी त्या ठिकाणीं सुखानें राम ह्मणेन!

**दौल०**—**राजसबाई**! मी तुला आपली पट्टराणी करण्यास कबूल असतां माझा अव्हेर करून त्या **कमलगड**च्या धनगराच्या घरीं तूं जाऊन रहाणार काय? **राजसबाई**! परमेश्वरसाक्ष तुला सांगतों, एक वेळ तूं माझी भोगेच्छा तृप्त कर ह्मणजे तुला कांहीं कमी नाहीं! या **दौलतरावाचें** तन, मन, धन सर्व तुझें आहे. हें एवढें सर्व अफाट राज्य याची मालकीणही तूंच! एक वेळ तूं माझी झालीस ह्मणजे मीं पादाक्रांत करून टाकिलेले मोठमोठे राजे व शूर योद्धे हे सर्व तुझ्या चरणाचे निरंतरचे दास होऊन राहतील! विचार कर, तूं माझी झाल्यावर तुझ्या सुखापुढें प्रत्यक्ष **वैकुंठाधीश नारायणाच्या लक्ष्मीचेंही** सुख कांहींच नाहीं असें तुझ्या अनुभवास येईल! प्रिये! तुला काय सांगूं? मजकडे नीट डोळे उघडून एकवेळ पहा तर खरी, ह्मणजे माझें सामर्थ्य व दरारा हीं किती आहेत तीं तुला समजतील! व तुझें अंतःकरण मजकडे खचित वळेल!

**राज०**—**दौलतराव**! सामर्थ्य आणि दरारा हीं सर्व बाहेरचीं सोंगें आहेत, त्यांपासून विचारी मनुष्यास कधींही मोठेपणा वाटावयाचा नाहीं! मनुष्य चांगलें सुखावस्थेंत असतांही त्यास या गोष्टींचा तिटकारा येईल. मग माझी तर गोष्टच विचारावयास नको! ज्याप्रमाणें एकाद्या देवळांतील देवता उपटून टाकावी, त्याप्रमाणें माझ्या मनाची आज कैक वर्षे स्थिति झाली आहे. त्यामधून सुख आणि शांति या देवता ज्या एकवेळ भ्रष्ट झाल्या त्या झाल्याच! त्यांची ह्मणून पुनरपि या अंतःकरणांत संस्थापना व्हावयाची नाहीं, यासाठीं तुह्मीं सामर्थ्य आणि दरारा यांच्या किती जरी गोष्टी सांगितल्या, तरी त्यांची पालथ्या घागरीवर पाणी यापेक्षां कांहीं निराळी स्थिति व्हावयाची नाहीं! **दौलतराव**! माझ्या हृदयमंदिरांत आतां एका शोकावांचून दुसरें कांहीं राहिलें नाहीं! तर मजवर एवढी दया करा! मला आतां या जगांत कांहीं फार वेळ रहावयाचें नाहीं. याकरितां माझी ही शेवटली विनंती मान्य करून मला माझ्या बापाच्या घरीं सुखानें राम ह्मणूं द्या!

**दौल०**—तुझी विनंती व्यर्थ आहे—

**राज०**—**दौलतराव**! मी तुमच्या पायां पडतें.

**दौल०**—हा दुष्टे ! कृतघ्ने ! धिक्कार असो तुझ्या कृतघ्नपणास ! आज सतत सात वर्षें तुझ्यावर मीं प्रेम केलें, त्याचें हेंच फळ काय? तुझा नवरा मेल्यावर जर मी या राज्यावर बसलों नसतों, तर शत्रूनीं कधींच यापूर्वीं या नगरीचा आणि या अफाट राज्याचा विध्वंस करून टाकला असता ! दुष्टे ! तुझ्याकरितां मीं सर्व शत्रूंचा पाडाव करून या राज्यांत सर्वत्रांच्या, आणि प्रत्यक्ष तुझ्या, अंतःकरणांत सुख समाधान उत्पन्न केलें. त्याचे उपकार कांहींच नाहींत? वस्तुतः मला या राज्याची मुळींच जरूर नाहीं. एकवेळ तूं माझी हो कीं लागलीच **यशवंतरावास** परत बोलवून माझ्यामागें सर्व राज्य त्याच्या हवालीं करितों.

**राज०**—( आपणाशीं ) देवा ! देवा ! इतका वेळपर्यंत ह्या दुष्टाचें भाषण मीं ऐकून घेतलें! परंतु आतां नाहीं राहवत!( उघडपणें ) दुष्टा! चांडाळा! मेल्या! तुझा सत्यानास होवो! आणि ज्याप्रमाणें तूं आज माझी दैना केली आहेस त्याप्रमाणें तुझी होऊन मेल्या ! तुझा कुलक्षय होवो !

**दौ०**—वारे वा: ! प्रिये ! एवढा वेळपर्यंत तूं नीट बोलत असून तुला आतांच इतका कां बरें झटका आला ?

**राज०**—दुष्टा ! निर्दया ! घातक्या! आपल्याच मनाला विचार ! दुष्टा ! तुला सर्व प्रकार माहीत असून माझ्यापुढें बोलावयास लाज नाहीं वाटत ? दुष्टा ! प्रत्यक्ष माझ्या बाळाचा घात तूं केला असून जसें कांहीं आपणास कांहींच ठाऊक नाहीं असें दाखवितांना मेल्या ! तुझें काळीज कोठें गेलें ? बोल ! बोल ! दुष्टा ! माझ्या बाळाचा घात तूं नाहीं केलास?

**दौ०**—( आश्चर्य वाटल्यासें दाखवून ) ह्मणजे ? याचा काय बरें अर्थ ? काय ह्मणतेस ? तुझ्या पुत्राचा घात मीं केला ? वाः ! फार चांगली गोष्ट ! बोल ! बोल ! ही खोटी बातमी तुला कोण्या दुष्टानें सांगितली ? बोल ! बोल ! ह्मणजे त्या दुष्टाची या क्षणीं जिव्हा च्छेदन करितों ! परंतु तें असो. तूं ऐकलेली बातमी अगदींच खोटी ! **राजसबाई** ! तुला ईश्वरसाक्ष सांगतों, तुझा पुत्र अद्यापि जिवंत आहे !

**राज०**—दुष्टा ! प्रत्यक्ष आपण त्याचा घात केला असून ईश्वराची साक्ष देतोस, तुला शरम नाहीं वाटत ? निर्लज्जा ! प्रत्यक्ष परमेश्वराची शपथ घेऊन खोटें बोलतोस ? मेल्या ! तुझें काळीज कोठें गेलें ? तुला या पापाबद्दल मेल्यावर आणि जिवंत असतांही अघोर यमयातना भोगाव्या लागतील त्याचें कांहींच वाटत नाहीं ?

**दौ०**—आतां तर बोवा ! तुझ्यापुढें शर्थ झाली ! **राजसबाई** ! ईश्वर राहिला एकीकडे ! परंतु तुला खचित सांगतों, माझ्या गळ्याशपथ, तुझा पुत्र अद्यापि जिवंत आहे, व जर तूं एकवेळ माझी इच्छा पूर्ण करिशील, तर पहा ! क्षणमात्र विलंब न लावितां मी तुला माझी पट्टराणी करीन, व माझ्या मागें या अफाट राज्याचा मालक तुझाच पुत्र होईल !

**राज०**—मूर्खा ! धिक्कार असो तुला ! माझे प्रिय प्राणपति व माझा पुत्र यांचा अंत करणारा तूंच आहेस ! यास्तव तुझ्या सहवर्तमान या गादीची मालकीण होण्यापेक्षां प्रत्यक्ष प्राण गेले तरी त्यांची मी नाहीं पर्वा करित !

मूर्खा ! तुझ्या सहवासांत राहण्यापेक्षां मला सर्व जन्म जरी तुरुंगवासांत अतिशय भयंकर हाल अपेष्टा सोशीत काढावा लागला, किंवा अरण्यांत राहून सिंहव्याघ्रादिकांच्या तडाक्यांत सांपडावें लागलें, किंवा अन्नपाण्याशिवाय या पृथ्वीवर भटकत रहावयाचें पडलें, तरी तें मी मोठ्या आनंदानें कबूल करीन, परंतु असल्या अघोर पाप आचरणाऱ्या चांडाळाच्या अपवित्र स्पर्शानें मी आपला देह कदापि विटाळून घेणार नाहीं !

**दौ०**—तुला आजपर्यंत मी शहाणी समजत होतों. परंतु आतां तुजसारखी शतमूर्ख कोणी नाहीं असें मला वाटूं लागलें आहे ! मूर्खे ! तुला कळत नाहीं काय ? या वाड्याचा मालक मी आहें; जरी मीं यावेळीं तुजवर बलात्कार केला, व तूं मजपासून सुटण्यासाठीं मोठ्यानें शंखध्वनि केलीस, तरी तुझ्या ह्मणून मदतीस येण्याची प्राज्ञा एकाचीही नाहीं ! यासाठीं तुला सांगतों, तूं बऱ्या बोलानें माझें ह्मणणें कबूल कर, नाहीं तर पहा ! याक्षणीं तुझा बलात्कारानें उपभोग घेण्यास कदापि चुकणार नाहीं नीट विचार कर !

**राज०**—दुष्टा! तूं मला भय घालून भ्रष्ट करणार काय ? दुष्टा ! पाहूंच दे तर मला तुझी छाती! ये तर मेल्या पुढें खरा, कीं लागलीच तुझ्या नरडीचा घोट घेतें कीं नाहीं पहा ! दुष्टा ! अधमा ! तुला वाटत असेल कीं हें तुझें दुष्ट वर्तन कोणी पाहत नाहीं, परंतु तुला सांगतें सर्वसाक्षी **नारायणा**चे डोळे कांहीं मिटले नाहींत ! तो तुझ्या सर्व दुराचरणांबद्दल तुला अघोर शासन करावयास कधीं चुकणार नाहीं !

**दौल०**—( धिक्कारानें ) असे **नारायण** टेवितों आह्मीं गाशांत गुंडाळून ! तें असो. पण बोल, तूं बऱ्या बोलानें माझें ऐकणार कीं नाहीं, कां करूं बलात्कार ! बोल !

**राज०**—मेल्या ! तूं मजवर बलात्कार करणार काय ! ये दुष्टा ! कर बलात्कार कसा करतोस तो पहातें ! अधमा ! तुला खात्रीनें सांगतें, अगोदर या कुडींतला प्राण निघून जाईल, आणि मग या देहाच्या नखाग्रास तुजसारख्या अमंगळ दुष्टाचा विटाळ झाला तर होईल ! तोंपर्यंत होणार नाहीं ! घे मेल्या ! काय करणें असेल तें करून !

**दौल०**—( आपणाशीं ) छेः ! आज तर कांहीं लाग साधण्याचें चिन्ह नाहीं ! असो ! तूर्त हिला अशीच राहूं द्यावी ! याचा विचार मागें पुढें करितां येईल ! ( उघडपणें ) **राजसबाई** ! आजपर्यंत तुझें बोलणें मीं ऐकिलें, परंतु इतःपर मात्र ती गोष्ट होणार नाहीं हें पक्कें ध्यानांत ठेव ! सर्व गोष्टी तुझ्या मनाप्रमाणें व्हाव्या ह्मणून मीं आजपर्यंत दम खाल्ला. असो. याबद्दलचा नीटपणें विचार करावयास मी तुला आणखी मध्यरात्रीपर्यंत मुदत देतों, तोंपर्यंत काय विचार करावयाचा असेल तो कर !

**राज०**—मेल्या ! काळतोंड्या ! तोंड काळें कर एकदाचें ! फिरून मला दाखवावयास येऊं नको!

( दौलतराव जातो व पडदा पडतो. )

## प्रवेश २.—दौलतरावाचा महाल.

( दौलतराव सचित बसला आहे. )

**दौल०**—( आपणाशीं ) काय करावें ? **राजसबाई**ला **यशवंतरावा**च्या मृत्यूची हकीकत कळल्यामुळें आजची शिकार साधली नाहीं ! असो. कांहीं चिंता नाहीं, पाहून घेतां येईल ! परंतु हिला ही बातमी कोणीं बरें सांगितली?

हें काम **मालोजींचें** तर नसेल ? असेलही कदाचित् ! कारण त्याजवर तिचा विश्वास आहे ! असो. याबद्दल चौकशी केली पाहिजे. **मालोजी** ! जर हें नीच काम तुह्मीं केलें असें सिद्ध होईल, तर संभाळा, या **दौलत-रावाशीं** गांठ आहे ! एका क्षणांत तुमच्या नरडीचा घोंट घेईन !

( बहादरशिंग येतो. )

**दौल०**–**बहादरशिंग** ! या ! तुह्मीं वेळेवर आलां ! पहा ! आज शिकार तर हातून गेली! काय करावें ! कांहीं सुचत नाहीं ! ती मूर्ख **राजसबाई**–

**बहा०**–काय अद्यापि वश झाली नाहीं ?

**दौल०**--नाहीं ! तिला **यशवंतरावाच्या** मृत्यूची खबर कळल्यामुळें सगळा बेत फिसकटला! कायहो, पण,.**बहादरशिंग** ! तिला ही हकीकत कोणी बरें सांगितली असेल? **मालोजीनें** तर नसेल ?

**बहा०**–नाहीं. मला ज्यावेळीं ही खबर त्या दूतानें येऊन सांगितली, त्यावेळीं **राजस-बाईच्या** जवळची कुळंबीण जवळ होती. तेव्हां कदाचित् तिनें ही खबर ऐकून आपल्या धनिणीस सांगितली असेल असें मला वाटतें.

**दौल०**–हां ? तिनें सांगितलें असेल काय ? थांब रांडे ! याबद्दल तुला फांशींच चढवितों. असो. पण **बहादरशिंग** ! काय चमत्कार पहा ! मी आपल्याकडून तिला पुष्कळ उपदेश केला, होतें तितकें सांगून पाहिलें, सरते शेवटीं बलात्कार करीन ह्मणून दहशतही घालून पाहिली, परंतु तिनें ह्मणून आपला हट्ट सोडिला नाहीं! मी इतका बलाढ्य, परंतु ती मला एवढी सुद्धां भ्याली नाहीं, व मध्यें मध्यें तर हिच्या अंगांत कोणी वीरानेंच जसा कांहीं संचार केला आहे, अशा प्रकारें मजशीं बोलत होती !

**बहा०**–बोलूं द्या ! बोलली तर बोलली ! आपोआप कांहीं वेळानें येईल बेतावर ! परंतु महाराज ! मी आपणास एक बातमी सांगावयास आलों आहें ती ऐकून आपणास आनंद होईल यांत संशय नाहीं !

**दौल०**–काय ? मला आनंद होईल ह्मणतां ? बोला ! बोला ! कोणची बातमी ? बोला झट झट !

**बहा०**–महाराज ! ज्या वीरानें **यशवंतरावाचा** वध केला, तो वीर बाहेर आपल्या आज्ञेची वाट पहात आहे.

**दौल०**–कोण ? **अमरशिंग** ?

**बहा०**–**अमरशिंग** नव्हे ! तो तर महाराज, **यशवंतरावाच्या** हातून मेलाच ! परंतु त्याच्या बरोबर त्याचा जो विश्वासुक चाकर गेला होता त्यानें **यशवंतरावाचा** घात केला ! तो बाहेर उभा आहे.

**दौल०**–तो चाकर मोठा शूर आहे ! शाबास त्याची ! असो. पण त्याजवळ खुणेची मुद्रा आहे ?

**बहा०**–होय.

**दौल०**–मग कांहीं चिंता नाहीं ! **यशवंतराव** मेला खचित ! येऊं द्या त्याला आंत !–परंतु कायहो, तो चाकर तुमच्या ओळखीचा आहे. नाहीं ?

**बहा०**–नाहीं. परंतु त्याचें नांव मला ठाऊक आहे. त्याला **येसबा** ह्मणतात ! महाराज ! पण त्यानें पठाणाचा पोशाख केला आहे ! व त्यानें आपलें नांव **दुल्लेखान** ह्मणून मला सांगावयास सांगितलें आहे.

**दौल०**–तें ठीकच आहे. बरें त्याला आंत घे-

ऊन या! ( बहादरशिंग जातो. )ही गोष्ट फार चांगली झाली! मुद्रा गुप्तपणें परत आल्यामुळें आतां माझा कोणास संशय येणार नाहीं!

( बहादरशिंग येसबास घेऊन परत येतो. )

**येस०**—सलाम कर्तो जी! ( दौलतरावास सलाम करितो. ) सरकार! ही मुद्रा! **यस्वंतराव** आपला दुस्मान मेल्याची निशानी! ही ध्येवी सरकार! (मुद्रा दौलतरावाच्या हवाली करतो.)

**दौल०**—तुझें नांव काय? **येसबा** होयना?

**येस०**—जी सरकार! ( फिरून सलाम करितो. )

**दौल०**—तुझा धनी कोण? **अमरशिंग**?

**ये०**—जी सरकार. ( फिरून सलाम करितो. )

**दौल०**—**यशवंतराव** मेल्याची सर्व हकीकत सांग पाहूं.

**ये०**—जी म्हाराज! सरकारचा होकम झालान् आमच धनी मसनी बिगिद्यान् होकारल आन् सर्म्दा पन अवशी तैयारी करूनशी असी निगालो तो बगा त्ये दक्शिनेमंदी **मुसलमानाच** राज व्हाये, तत ग्येलो. अशी तल्लास करतां करतां बगा गावला **येस्वंतराव**, त्येला पायलं, आन् मीन् **अमरशिंगानं** आप्सांत खोटं भांडन काडूनशी **अमरशिंगानं** मला वडवल्यान्. म्यां खोटीच वरड केली रे म्येलों म्येलों म्हनून! त्येवक्ती **येस्वंतराव** पडला मंदी, न् लागला आमां दोघास्नी सोडवाया, तवा मी सरलो मांगन् त्येची न् **अमरशिंगा**ची जुपली लडाई! त्येवक्ती **अमरशिंग** पडला न् बगा **येस्वंतराव** यऊं लागला म्हप बोलाया, इक्त्या मंदी म्यां हिसकावली **अमरशिंगा**ची तरवार आन् **येस्वंतराव** माझा हात धराया येतोया इक्त्यामंदी त्येच्या पोटांत भोसाकलीन् काय तर्वार! त्येबरोबर येकदा क्येलान् अगाई! आन् म्हटल्याती राम न् काय! पातों तो **अमरशिंग** व्हता जिता, मी जवळ ग्येलोन् त्येला लागलो उटवाया, तवां बगा आमच धनी म्हनाल 'अर, मी तर मरनार, पन येक कर, ही ध्ये अंगुठी अन् जा सरकारपायाप आन् त्येना ही देउनशी बोल समदा मजकूर! माज कायबी व्हईल.' इक्त बोलल न् परान सोडला! मग म्या दिली त्येल मुटमाती अन् ह्ये **पठानी** स्वांग घ्येऊनशी तडक आलो सरकाराप! ( सलाम करितो. )

**दौल०**—शाबास! **येसबा**! शाबास! तूं विश्वासुकपणानें माझ्या शत्रूचा घात केलास, यामुळें माझ्या चित्तास परम आल्हाद होत आहे. व याबद्दल तुला योग्य बक्षीस मिळेल! परंतु तुला एक काम मजकरितां अवश्य केलें पाहिजे. काम म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. **राजसबाई**ला **यशवंतराव** मेल्याची हकीकत कळली आहे. व यावरून त्याचा वध मीं केला असावा असा तिच्या मनानें संशय घेतला आहे. यासाठीं तूं एवढेंच कर, तिच्याकडे जा आणि तूं आपल्या डोळ्यांनीं त्याला आपोआप मरतांना पाहिलेंस म्हणून सांग. आणखी असेंही सांग कीं, ज्यावेळीं **यशवंतराव** मेला त्यावेळीं तो आपल्या आईची आठवण काढून पुष्कळ रडला आणि सरते शेवटीं त्यानें 'आपल्या आईनें आतां **दौलतरावा**च्या इच्छेस मान देऊन त्याशीं विवाह करावा, आणि त्या योगानें **कोंकण** प्रांतीच्या आपल्या प्रजांस शांति व सुख हीं द्यावीं!' एवढा उद्गार मुखावाटे काढून नंतर देह ठेविला. ( इतक्यात मालोजी आंत येतो त्यास पाहून) या! **मालोजी**! या तुम्ही! हा वीर पुरुष पहा! यानें आपल्या बाहुवीर्यानें मजवर तर काय, परंतु

या आमच्या अफाट राज्यांतील सर्व प्रजेवर मोठा उपकार केला आहे, त्याचें वर्णनही करणें कठिण आहे! यासाठीं हा जें बक्षीस मागेल, तें यास मी देणार. परंतु तें असो. तुह्मी यास अगोदर **राजसबाई**कडे नेऊन भेटवा. कारण तिचा पुत्र जो नुकताच मरण पावला, त्यानें स्वत: होऊन **राजस-बाईस** सांगण्याकरितां याजपाशीं निरोप सांगितला आहे. तो ऐकिला कीं ती माझी झालीच ह्मणून समजा.( बहादरशिंगाकडे पाहून) चला! **बहादरशिंग** ! चला ! मेजवानी-ला उशीर होत आहे ! आतां मजसारखा सुखी आहे कोण ? चला आज यथेच्छ सुरापान करून मीं **राजसबाई**शीं विवाह लावणार !

( दौलतराव व बहादरशिंग जातात. )

**येसवा**—( मालोजीस ) कां ह्ये सर्व्यै राजवाड्या-मंदी समद्यान्ला हरुष झालाया, आन् आज म्येजवानी बी चाललिया, आन् तुमीच असं दुख वाटल्यावानी कांजी करतां ? तुमी म्येजवानीला न्हाइ जात ? ह्येचं काय बरं कारन ?

**मालो०**—तुझें नांव मला माहीत नाहीं, परंतु तूं **राजसबाई**साहेबांकडे जाऊन कोणची दुष्टपणाची कामगिरी बजावणार हें मला सांगूं शकशील ?

**येस०**—व्हय! त्येमंदी हाये काय ! तुमाला मी कोन ह्यं ठावं न्हाई? बगा असच माज्या तोंडाकडं बगा, आन् माज्या डोळ्यांवरन आन् चेऱ्यावरन मला खून चढलाया कां न्हाई ह्यं नीट न्ह्येळूनशी बगा !

**मालो०**—होय ! तुझ्या मुद्रेवरून तूं उग्र पुरुष असावास असें अनुमान होतें खचित! बोल! बोल ! तूं कोण आहेस ?

**येस०**—मी ? मी कोन ? तुमच्या **येस्वंतरावा**ला मारलं तो मी !

**मालो०**—( आश्चर्यानें ) काय ? **यशवंतरावास** तूं मारिलेंस ?

**येस०**—कां विचारतांस तुह्मी असं ? मी काइ इखारी साप न्हाई! मी येक **येस्वंतरावा**ला मारलं ह्मणून तुमाला भिन्याचं का कारन ! माझा द्वेश फकत येक राजकुळाचा ह्मप दुसऱ्या कुनाला इक्ता बी न्हाइ तरास होयाचा ! अर ! तुमाला अजूनबी आच्चीर वाटतं न् तुमी अजूनबी ह्मप बिचकतां ?

**मालो०**—आश्चर्य? हो—छे ! नाहीं नाहीं ! झाली गोष्ट ती ठीकच झाली ! त्यानें **दौल-तरावा**शीं वैर केलें त्याबद्दल हीच शिक्षा त्यास योग्य होती !

**येस०**—कां त्येनं नुसत्या येकट्या **दौलतरावा**-शींच न्हव समद्या, ह्ये **कोंकनातल्या** पन लोकांशीं वैर क्येलं ? व्हय, असं च न्हव काय ?–अर ! तुमी थांबतास ? तुमाला इकल्यामंदी असं काय झालंजी ?

**मालोजी**—दुष्टा ! नशिबा ! घे करून तुला माझें काय करणें असेल तें ! आजपर्यंत मी आपलें रूप झांकून होतों, पण आतां नाहीं माझ्यान रहावत ! काय ? प्रत्यक्ष ज्या दुष्टानें माझ्या प्राणापेक्षांही प्रिय अशा त्या राजपुत्राचा घात केला तो दुष्ट मजपुढें प्रत्यक्ष उभा असतां मी स्वस्थ रहावें काय! धिक्कार असो मला ! दुष्टा! अधमा ! जा जाऊन सांग त्या कृतघ्न क्रूर **दौलतरावा**ला कीं आजपासून मीं तुझा त्याग केला ! मी आ-जपर्यंत आपल्या प्राणांस प्रिय मानीत होतों, परंतु आतां त्यांचा मला तिटकारा आला! तुला पाहिजे तर घे माझे प्राण ! मी ते

मोठ्या आनंदाने देईन! जा! दुष्टा! मांगा! मजपुढें उभा नको राहूं! निघ! आपलें तोंड काळें कर!

येस०—(आश्चर्यानें) काय? येस्वंतरावावर तुमची प्रीत व्हती व्हय?

मालो०—दुष्टा! माझी एकट्याचीचशी काय, परंतु या दुनियेंतील एकूनएक मनुष्याची त्याजवर प्रीति होती असें ह्मटलें असतांही चालेल!—अहा—ा! तो तर मेलाच, परंतु त्याचे गुण तुला काय सांगूं? त्याच्यासारखा धर्मात्मा सज्जन असा प्राणी तोच! त्या प्राण्यास दुष्कर्माचा ह्मणून एवढासुद्धां डाग नव्हता! दुष्टा! अशा त्या सत्पुरुषाचा तूं घात केलास त्यावेळीं तुझे हात गळून कसे नाहीं पडले! ज्या अधमाधमाचें वचन ऐकून तूं त्या सत्पुरुषाचा घात करावयास प्रवृत्त झालास, त्या अधमाधमाची जिव्हा तात्काळ कशी नाहीं झडली! हाय हाय! रे उदार राजपुत्रा! हाय हाय!

(मूर्छित होऊन पडतो.)

येस०—भल्या माणसा! सावध हो! सावध हो! (मालोजी कांहीं वेळानें सावध होतो.) मालोजी! तुह्मीं इस्वासूक माणूस हां आन् तुमची येस्वंतरावावर भक्ति व्हती, ह्मनून तुमच्या कानांत येक गोष्ट सांगतों. ह्यो दौलतराव लईच दुष्ट हाये, त्येच्याशीं म्यां ह्यो खिणतलक कपट करूनशी त्येला फसावलं! तुमचा येस्वंतराव जिता हाये!

मालो०—काय? यशवंतराव जिवंत आहे ह्मणतोस?

येस०—नुसता जिता हाये इत्तंच न्हव, तर ह्या येळला ह्या सुवर्णपुरीमंदीबी हाये!

मालो०—छत्! भलतेच! तूं कांहीं तरी सांगून मला फसवूं पहात आहेस!

यस०—तुमाला माझं ह्मननं खोटं वाटत असल तर व्होवं तर त्येलाच ये वाड्यामंदी आनूनशी तुमांला दावूं का?

मालो०—बाबा! तेवढी मात्र गोष्ट करूं नको! आमचे बाळमहाराज जिवंत आहेत ह्मणून सांगितलेंस एवढ्यानेंच मी खुष आहें. बिचाऱ्यास या वाड्यांत आणणे ह्मणजे बिचाऱ्या दीन गाईला व्याघ्राच्या जाळींत आणून सोडण्यासारखें आहे! यासाठीं बाहेर राहूनच ते शंभर वर्षें जगोत एवढीच माझी देवापाशीं प्रार्थना आहे! आमचें बिचाऱ्यांचें कांहीं झालें ह्मणून चिंता नाहीं, परंतु ते भगवंताच्या दयेनें चिरायु होवोत!

येस०—त्येची तुमाला यवढी पंचाइत करन नग! मी त्येला असा येस पालटूनशी आनीन, कीं त्येला कुनीबी वळकणार न्हाई! कुनाचबी डोळं अवशी घारीवानी असल तरी त्येलाबी वळकन्याची मुस्कील पडल! त्ये समदं न्हायलं! लई कशाला, परतवश तुमच्या पुढंच आनूनशी त्येला उभं क्येलं, तर तुमीबी न्हाइ त्येला वळकनार!

मालो०—तेवढें मात्र बोलूं नको. आमचे बाळमहाराज सप्तपाताळांतही दडून बसले असले, तरी तेथूनही त्यांस मी ओळखून काढीन! त्यांची ती मनोहर शूर मूर्ति अद्यापि या अंतःकरणांत जागृत वास करित आहे! यासाठींच तुला सांगतों तूं त्यांला ह्या ठिकाणीं आणण्याच्या भरीस पडूं नको.

येस०—तुमी ह्मंगतां त्ये समदं खरं, पन इचार करा, येस्वंतराव हितून ग्येल्याला आज सात वरसं झालीं. त्येंची सारीं वरसं वनवास भोगन्यांत ग्येलीं, तवां यस्वंतराव तुमाला जसा आठवतो तसाच आतां कशा-

वरून असल! अन् ह्य पहा तुमी खेला पायलं ये वक्तीं तो चांगला जवान गडी व्हता, तो जवानी आतां येऊी असल, सवांपक्शी तो आतां मोटावी झाला असल, म्हनून म्हंगतों तो आतां तुमाला वळकतां वी न्हाई येयाचा!

**मालोजी**—तूं म्हणतोस त्या सगळ्या गोष्टी झाल्या असल्या, किंवा त्यांचें दर्शन घडल्याला मला सातांचे ठिकाणीं शंभर वर्षें झालीं असलीं, तरी आमच्या **बालमहाराजांची** ती वीरश्रीची ऐट व मुद्रा, व त्यांच्या नेत्रांतील शौर्याची ती चमक, व इतकें असूनही त्याच्या मूर्तीची ती मनोरमता, ह्या गोष्टी ज्या अंतःकरणांत ठसल्या आहेत त्या कदापि ह्मणून जावयाच्या नाहींत! त्यांवरूनच मी **बालमहाराज** कोणच्याही स्थितींत असले तरी त्यांस ओळखीन! परंतु ह्या सगळ्या खाणाखुणांशिवाय आणखी ही त्यांची एक खूण मला ठाऊक आहे. ती हीच कीं मागें ते येथून जावयाचे अगोदर एकदा त्यांच्या मातोश्रींवर एक भयंकर वाघ चालून आला होता तो त्यांनीं ठार मारिला. त्या झटपटींत त्यांच्या मस्तकास वाघानें नखानें ओरबाडलें होतें, ती खूण तर कदापिही बुजावयाची नाहीं!

**येस०**—कसां म्हंगतां? **येस्वंतरावाला** वागानं वरबाडलं व्हतं!

**मालो०**—होय, त्यांच्या मस्तकावर वाघानें अशा या ठिकाणीं ओरबाडलें होतें, ती खूण—

**येस०**—या खुनसारखीच व्हती न्हव? (आपलें पागोटें खालीं काढून दाखवितो.)

**मालो०**—(आश्चर्यानें) अरे! मी झोपेंत तर नाहींना? काय! आमचे **बालमहाराज**—महाराज! आपल्या या चरणांच्या दर्शनानें हा दास धन्य व कृतार्थ झाला!

(त्याच्या पायां पडतो.)

**यशवंतराव**—मालोजी! तुह्मी फार विश्वासूक आहां यासाठीं तुह्मांस कांहीं बक्षीस द्यावें असें मनांत आहे. (त्यास आलिंगन देतो.)

**मालो०**—अहाहा! आज हा केवढा सुदिन उगवला!—परंतु महाराज!—

**यश०**—मालोजी! तुह्मीं असे थरथर कां कांपतां? माझा हात बळकट धरून ही केविलवाणी मुद्रा कशाकरितां? काय! मी खरोखरीच **यशवंतराव** आहे किंवा नाहीं याचा तुह्मांस संशय वाटतो!

**मालो०**—(नम्रतेनें) नाहीं! सरकार! आपणास पाहून आपल्या कैलासवासी तीर्थरूपांची मला आठवण झाली! दुसरें कांहीं नाहीं!—तें असो. परंतु महाराज! आज्ञा होईल तर एक विनंती करीन. महाराज! या दुष्ट **दौलतरावानें** आपला घात करण्याकरितां दोन मारेकरी पाठविले होते, त्यांचे हातून आपली सुटका कशी झाली!

**यश०**—त्यांपैकीं एकजण तर पहिल्या सपाट्याबरोबरच तोडला. दुसरा मात्र माझ्याशीं कांहीं वेळ लढला, परंतु सरतेशेवटीं त्याचीही तरवार मीं हिसकावून घेऊन त्यास यमसदनास पाठविलें. त्याच्या बोटांत या जुलमी **दौलतरावाची** खुणेची आंगठी होती ती त्यानें प्राण जाण्याचे अगोदर माझ्या स्वाधीन केली, आणि मला बोलला:—"मी तर आतां मरतोंच. मी प्रत्यक्ष आपल्या प्रभूवरच शस्त्र धरिलें, तेव्हां मजसारखा अधम पातकी या जगांतही कोणी नसेल. या पातकाचें क्षालन कसें होईल तें होवो. परंतु आतां मी एवढेंच करितों कीं, ही आंगठी

तुह्मांस देतों. हा तुह्मीं दौलतरावास परत नेऊन द्या, ह्मणजे तुह्मीं मेलां अशाविषयीं त्याची खातरी होईल, व अशा युक्तानें कोणासही न समजतां तुह्मांस खुशाल सुवर्णपुरींत फिरावयास सांपडेल !" इतकें बोलून त्यानें प्राण सोडिला.

**मालो०**—तें सगळें बरोबर जमलें, परंतु तुमची येथें कोणाचीही ओळख नसतां वाड्यांत प्रवेश कसा झाला ?

**यश०**—यशवंतरावाचा घात करण्यास अमरसिंगास पाठविलें होतें त्याचा मी चाकर व यशवंतरावास मीं मारिलें, अशी गप्प एक झोंकली. शिवाय मीं वेश घेतला आहे पठाणाचा, तेव्हां दरवाज्यावर वरदी पोंचविणारा कोणी उभा होता, त्यास मीं हा वेश घेतला आहे, परंतु वस्तुतः मी अमरसिंगाचा चाकर आहें ह्मणून सांगितलें, व त्यानेंही विशेष पुस्तपास न करितां माझी आंत वरदी पोंचविली. पुढें आंत गेल्यावर ती आंगठी परत दिली, तेव्हां माझ्या बोलण्यांत कांहीं लबाडी आहे असा कोणास अंदेशाही यावयाचें कारण राहिलें नाहीं, आणि शिवाय मी देशांतली कुडबाऊ भाषा बोलत होतों, त्यामुळें सर्व गोष्टी नीट जमल्या.

**मालो०**—अशी गोष्ट जर आहे तर मग आपण यावयाचे पूर्वी आपण मेलां ह्मणून खबर आली होती हें कसें ?

**यश०**—वाः; ती कंडी तर मुळीं मींच पिकविली. अशाकरितां कीं, एकदाही कंडी चोंहीकडे पिकली ह्मणजे मी कोण काय याबद्दल कोणीं फारशी पुस्तपास करूं नये ! असो. बेताप्रमाणें सर्व गोष्टी तर जमल्या. मला एका गोष्टीचा मात्र संशय होता, तो हाच कीं कदाचित् अमरसिंगाचा चाकर दौलतरावाच्या ओळखीचा असेल. परंतु तसा कांहीं प्रकार दृष्टीस पडला नाहीं; आणि तशांतून दृष्टीस पडलाच असता तर कांहीं कमताशी प्रकार सांगावा लागला असता! असो. आतां त्याची काळजी करावयास नको. परंतु, मालोजी ! तुह्मांस एक गोष्ट विचारावयाची आहे—अरेरे! नुसती ती गोष्ट विचारावयाचें मनांत आणिल्याबरोबर अंगावर शहारे येतात !—मालोजी ! माझ्या आईची हल्लीं स्थिति कशी काय आहे ? ती पूर्वी सद्गुणी होती तशीच अद्यापि पण आहेना?

**मालो०**—महाराज ! हें काय विचारावें ? तो दुष्ट आपल्या मातोश्रींनीं वश व्हावें ह्मणून कोटिशः प्रयत्न करितो! एकादे वेळीं मी बळजोरी करीन किंवा जीव घेईन ह्मणून भयही घालितो, परंतु सर्व व्यर्थ ! महाराज! आपण जावयाचे अगोदर आईसाहेब जशा सद्गुणी होत्या तशाच अद्यापिही आहेत !

**यश०**—परमेश्वर तिचें कल्याण करो, आणि तिला सद्गुणापासून भ्रष्ट होऊं न देतां त्याबद्दलचें बक्षीस माझ्या हातून तिला मिळेल असें करो एवढेंच त्याजपाशीं माझें सदा सर्वकाळ हात जोडून मागणें आहे ?—तें असो. पण मालोजी ! माझी आणि आईची केव्हां बरें गांठ पडेल ?

**मालो०**—महाराज ! आपण येथें आहां यामुळें एकादा अनर्थपातही घडेल याचें मला भय वाटतें आहे !

**यश०**—काय ? भय ? तें कां बरें ? भयाचें काय बरें कारण ? छे! मालोजी! तुह्मीं चुकतां ! ज्यानें कधींच कांहीं पाप केलें

नाहीं त्यानें काय ह्मणून भ्यावें बरें? पापी मनुष्यानें मात्र भ्यावें !

मालो०—तें कांहीं असो, परंतु महाराज ! आपण येथें असतां कांहीं तरी अनर्थापात घडणार असें माझी मनोदेवताच मला सांगते ! यासाठीं महाराज ! आपण या वाड्यातून पार पडून जावें अशी, माझी आपणांस विनंती आहे !

यश०—(आवेशानें) जाईन ! परंतु मला एक गोष्ट कर्तव्य आहे, जी ऐकल्याबरोबर प्रत्येक जुलमी मनुष्याची पण छाती फाटून जाईल, ती केल्यावांचून मी कधीं येथून बाहेर जावयाचा नाहीं.

मालो०—(आश्चर्यानें) महाराज ! मी आपला भावार्थ समजलों नाहीं !

यश०—मालोजी ! या ठिकाणीं राहून, ज्या दुष्टानें विनाकारण माझ्या पित्याचा कपटानें घात केला, व माझ्या सद्गुणी मातेस क्लेशांत पाडून या राज्यांतील माझ्या प्रिय प्रजावर कोटिशः जुलूम केले, त्या दुष्टाचा सूड पुरता उगवीन तेव्हांच या राजवाड्याच्या बाहेर माझें पाऊल पडेल ! तोंपर्यंत नाहीं !

मालो०—तें सर्व खरें. परंतु महाराज ! आपणास कोणाची मदत नाहीं. तर आपल्या एकल्याच्या हातून ही गोष्ट कशी घडूं शकेल ? महाराज ! ह्या ठिकाणीं आपणाविषयीं जरा एवढा संशय आला, कीं लागलीच या दुष्ट दौलतरावाचे शतशः सैनिक आपल्या अंगावर तुटून पडतील !

यश०—तें सर्व मी समजतों, आणि ह्मणूनच तर हा घातकी पठाणाचा पोशाक घेऊन मी राजवाड्यांत आलों ! मालोजी ! तुह्मास खात्रीनें सांगतों. आजची ही रात्र उजाडावयाचे अगोदर ही—ही—पहा—ही तरवार त्या दुष्टाच्या उदरांत भोंसकून त्याचा जीव घेतों ! (तरवार दाखवितो.)

मालो०—महाराज ! परमेश्वर तुमचें संरक्षण करो ! परंतु महाराज ! आपण असें उतावीळ होऊं नये, व जी गोष्ट करणें ती दूरवर विचार करून करावी !

यश०—मालोजी ! तुह्मी असें समजूं नका, कीं, मी केवळ नुसता सूड उगविण्याच्या भरांत मागचा पुढचा विचार न करितां तसाच एकटा इकडे आलों ! मी इकडे येण्याचे अगोदर आपल्या पक्षाचे **हिंमतराव, मानाजीराव फांकडे** वगैरे सगळ्या मंडळीस भेटलों आणि मग इकडे आलों !

मालो०—वाहवा ! असें आहे तर कांहीं चिंता नाहीं ! महाराज ! तिकडली कशी काय हकीकत आहे ? आपल्या पक्षास किती लोक अनुकूळ आहेत ? आपण सर्वांनीं मिळून बेत एकंदर कसा काय ठरविला आहे?

यश०—मालोजी ! सांगतों ऐका ! आपल्या पक्षास या शहरांतील सर्व लोक अनुकूळ आहेत ! त्यांपैकीं सुमारें दोनशें निवडक असामी आज रात्रीं या वाड्यावर चोहोंकडून हल्ला करतील ! राजवाड्यांत हल्लीं चोहोंकडे तर उत्सवाची गर्दी चालली आहे, यामुळें सर्व लोक यथेच्छ खाण्यांत आणि दारू पिण्यांत मग्न झाले आहेत, तेव्हां ऐन मध्यरात्रीच्या सुमारास जिकडे तिकडे राजवाड्यांत सामसूम झालें कीं, आपल्या जिवाची परवा न करितां जिकडे तिकडे तोडातोड एकदम सुरू होईल ! व तोंपर्यंत मी राजवाड्यातच राहून ते सर्व लोक आंत येण्याची वाट पाहत राहीन ! तो दुष्ट कदाचित् माझ्या आईस त्रास देऊं लागेल, तर त्याचा समाचार मी एकटाच घेईन !

मालो०—परमेश्वर आपले संरक्षण करो! परंतु महाराज! ही बातमी ऐकून माझें काळीज तर थरथर कांपूं लागलें आहे! पण महाराज! ही गोष्ट केव्हां करावयाचें ठरलें आहे आपण ह्मटलें?

यश०—ऐन मध्यरात्रीं ही गोष्ट करावयाचें ठरलें आहे! मी इकडे आलों त्यावेळीं मानाजीराव फांकड्यांच्या घरीं सर्व मंडळी गुप्तपणें जमली होती. मध्यरात्र व्हावयाचे अगोदर सर्वांच्या आणा शपथा होऊन हिंमतराव सर्व लोकांस घेऊन बाहेर पडेल! तें असो. मालोजी! चला आतां मला आईकडे घेऊन चला!

मालो०—महाराज! मला वाटतें आपण आईसाहेबांस एव्हांशीं भेटावयाचें करूं नये. आपण कोण आहां हें जर त्यांस कळलें, तर त्या आनंदाच्या भरांत किंवा आपल्या सुरक्षितपणाबद्दल त्यांस भय वाटेल तर त्या घाबरतील महाराज! खचित आपण अमुक आहां हें बाहेर लोकांस कळेल, व तसें झालें तर मोठाच अनर्थपात होईल यांत संशय नाहीं! यासाठीं महाराज! माझी आपणास अशी विनंती आहे कीं, त्या दुष्टाचा प्राणनाश झाल्याशिवाय आपण आपल्या मातोश्रीस भेटण्याचें करूं नये.

यश०—तें कांहीं व्हावयाचें नाहीं! मला तिची गांठ तर घेतलीच पाहिजे! माझें मनच मला तिजकडे जाण्याविषयीं ओढीत आहे. कोणी सांगावें, कदाचित् तिची व माझी हीच शेवटली भेट होईल. त्याचा काय नेम सांगावा?

मालो०—असें आहे, तर महाराज! मी सांगतों एवढी तरी एक गोष्ट आपण करावी. ती ही कीं आपण अमुक हे त्यांस मुळींच कळवूं नये! असें केल्यानें सर्व परिणाम नीट होईल! आपण पठाणी वेष धारण केला आहे खरा, परंतु आपण वास्तविक यशवंतरावांचेच कोणी स्नेही आहां असेंच त्यांस भासवा, व त्यांनीं हल्लीं आहेत त्याप्रमाणेंच सद्गुणी रहावें ह्मणून त्यांस सांगण्यास, व यशवंतराव अद्यापि जिवंत आहेत ही बातमी कळविण्यास, आपणास त्यांजकडे पाठविलें आहे असेंच त्यांस वाटवा!

यश०—ठीक आहे! कांहीं चिंता नाहीं! तुमच्या सांगण्याप्रमाणेंच मी वागेन. याविषयीं तुह्मीं आपल्या मनांत किमपिही धास्ती बाळगूं नका. बरें चला आतां! मला आई कोठें आहे तिकडे चला घेऊन!

मालो०—चलावें महाराज! सर्वशक्तिमान व परम न्यायी ईश्वर आपलें संरक्षण करून आपण ज्या सत्कार्यासाठीं आज येथें आलां आहां त्यांत आपणांस यश देवो, व पूर्वीं आपले परम पूज्य वडील या नगरींत राज्य करीत असतां ज्याप्रमाणें राज्यांतील सर्व लोक सदासर्वकाळ बिनघोर आनंदांत रहात असत त्याप्रमाणेंच आतांही एकवेळ आपण त्यांचे धनी होऊन त्यांस आनंद देऊन त्या सुखी नांदोत, एवढेंच परमेश्वरापाशीं माझें हात जोडून मागणें आहे.

यश०—अहाहा! मालोजी! तुमच्या या भाषणानें ती पितृमूर्ति माझ्या अंतःकरणांत पुनरपि एकवार जागृत होऊन आपल्या दर्शनरूप वायुवेगानें या दुष्टाच्या शासनार्थ माझा क्रोधाग्नि अधिकाधिक पेटतीत आहे! हाय! हाय! मालोजी! प्रत्यक्ष या—या राजवाड्यां—देवाच्या देव्हाऱ्यासमोर—माझे

बाबा ध्यानस्थ बसले असतां या गळकापू दुष्टानें विश्वासघातानें त्यांचा अंत केला या गोष्टीचें स्मरण होऊन माझ्या सर्वांगाचा पण कसा तिळपापड होऊन गेला आहे व याबद्दल त्या दुष्टाचा केव्हां घात करीन असें मला झालें आहे! आः—हाय हाय! बाबा! अहो बाबा! मरणानंतर आशेस गुंतून जर छायादेहानें तुमचा या तुमच्या प्रिय राज्यांत अद्यापि संचार होत असेल, तर तुमचा घात केल्याबद्दल या दुष्टाचा सूड घेण्यास तुह्मी मला सहाय व्हा! कसेंही संकट असो, कसाही बिकट प्रसंग असो, प्रत्यक्ष मूर्तिमंत यमही पुढें येऊन उभा राहिला, तरी कमी न होतां उत्तरोत्तर वाढत जाणारें तें तुमचें लोकोत्तर धैर्य व धारातीर्थीं शत्रूशीं छातीशीं भिडून लढत असतां सदा वृद्धिंगत होणारा व शत्रुसैन्याची पण गाळण करून टाकणारा तो तुमचा उत्साह मला द्या. तसेंच मजबरोबर आपल्या विश्वासुक प्रजा माझ्याकरितां आपले प्राणही द्यावयास तयार झाल्या आहेत त्यांजवर आपला छायारूप वरदहस्त ठेवा!

(दोघे निघून जातात.)

## अंक ३.

### प्र० १.—राजसबाईच्या महालाच्या बाहेरचा दिवाणखाना.

(गजराबाई येते.)

गज०—मी स्वप्नांत तर नाहींना? मला भूल तर नाहींना पडली? त्या मनोहर राजपुत्राची मूर्ति माझ्या हृदयांत जागृत वास करीत आहे, त्यामुळें तर मला हा भास नसेलना झाला? छे छे! हा खचित भास नव्हे! मला खचित वाटतें, मीं त्याला असें जातांना पाहिलें! मी त्यास पाहिल्याबरोबर ओळखलें! परंतु देवा! त्याच्या पहिल्या मूर्तींत आणि आतांच्या मूर्तींत किती फरक झाला आहे! पूर्वींचें त्याचें तें सौम्य सुहास वदन आतां कोणीकडे नाहींसें होऊन आतां नुसतें त्याजकडे पाहिलें कीं भीति वाटून हृदयाचा थरकांप व्हावा अशी कांहीं त्याची विलक्षण मुद्रा झाली आहे!

(इतक्यांत कोणी समोरून येत आहेसें पाहून)

अग बाई! हें कोण इकडे येत आहे! आं?—होय होय! हाच तो राजपुत्र माझा हृदयवल्लभ यशवंतराव! आणि हे ह्यांच्या बरोबर दुसरें कोण बरें येतें आहे? काय मालोजी?—अग बाई! पण हें काय? मालोजी आतां इतक्यांत त्याचे बरोबर होता, तो त्याला इकडे येण्याची वाट दाखवून वाटतें निघून गेला! खचित! खचित! हाच तो राजपुत्र खचित! मला वाटतें हा राजपुत्र वेश पालटून आपल्या मातोश्रीस भेटावयास येत आहे!—देवा! देवा! त्याला आपण एकटाच येथें आल्याचें कांहींच वाटत नाहीं, आणि माझे बाबा तर त्याचा घात करावयास सदा टपले आहेत! आई अंबाबाई! दया कर आणि मज दीन दासीची विनंती मान्य करून माझ्या हृदयवल्लभास कशाचीही इजा न होई असें कर! देवा! देवा!—हायरे उदार राजपुत्रा! तू आपल्या जिवाचीही परवा न करितां या व्याघ्राच्या जाळींत आला आहेस, परंतु तुझी अशी स्थिति पाहून माझ्यानें मुकाट्यानें कसें बरें राहवेल? असा सद्गुणी, असा

धर्मात्मा उदार प्राणी अशा स्थितीत पडला असतां, त्यास येथून निवून जा, नाहीं तर तुजवर अशीं संकटें गुदरतील ह्मणून न सांगणें माझ्या हातून कसें होईल ? देवा ! ह्या उदार राजपुत्राचे उपकार माझ्या हातून कसे फिटतील ?

(यशवंतराव येतो.)

**यश०**—(उसासा टाकून) हाय हाय ! आज सात वर्षे एकसारखीं वनवासांत काढून आतां मी आपल्या प्रियमातेचें दर्शन घ्यावयास निघालों असतां माझी काय ही स्थिति झाली आहे ? डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या आहेत. त्यामुळे मला धड वाट देखील दिसत नाहीं ! हे अश्रूंनो ! तुम्हीं अंमळ स्थिर व्हा! हे हृदया! अंमळ धीर धर ! हाय हाय ! त्या दुष्टानें माझ्या मातेची दुर्दशा केलेली प्रत्यक्ष पाहण्यात मनाचा माझ्या कसा धीर होईल तो होवो !

**गज०**—(पुढें येऊन) आपण कोणी परकी गृहस्थ आहां असें वाटतें ! आपण इकडे कोणीकडे फिरत आहां ?

**यश०**—(तिला पाहून आपणाशीं) हाय हाय! घात झाला ! अरे, ही इकडे कशाला आली ? (तिला टाळून दुसरीकडून जाऊं लागतो.)

**गज०**—(त्याच्या वाटत येऊन) आपण मला उत्तर दिल्याशिवायच चाललां ! आपण कोण आहां ? आपणास मीं ओळखलेंसें वाटतें ! पर्वतेश्वराच्या जंगलांतल्या चोरट्यांचे हातून माझी सुटका केली तेच आपण नव्हे काय? आपलें नांव **यशवंतराव**, नव्हे ? बोला ! बोला !

**यश०**—(घाबरून मनांत) अरे ! हिनें मला कसें बरें ओळखिलें ? (मोठ्यानें) राजकन्ये ! तूं खचित कांहीं तरी भ्रमांत आहेस ! तूं ह्मणतेस तो मी नव्हे. मी कोणी दुसराच आहें, व जर कदाचित् तुला **यशवंतराव** मेल्याची हकीकत कळली असेल तर तुला सांगतों **यशवंतरावाचा** घात करणारा तो मीच आहें.

**गज०**—महाराज ! आपण बोलतां हें कदाचित् खरें असेल, परंतु आपण बोलत असतां आपलें चित्त बावरल्यासारखें दिसतें, यामुळें आपण मला कांहीं तरी सांगून फसवीत आहां असेंच मला वाटतें ! महाराज ! बोला बोला ! आपण **यशवंतराव** नव्हे काय ? माझे प्राणदाते **यशवंतराव** ते आपणच, नव्हे? हाय हाय ! रे परमेश्वरा! काय संकट हें ! महाराज ! बोला ! बोला ! आपणाप्रमाणें माझेंही चित्त बावरूं लागलें आहे. यासाठीं तुह्मांस हात जोडितें,—तुमच्या पायां पडतें—खरेंच सांगा ! भलतेंच सांगून मला विनाकारण संशयांत नका पाडूं !—आपण कोणीही असा, परंतु माझा संशय एवढा फेडाच ! सोक्ष कीं मोक्ष तो एकदा कायतो मला कळूं द्या !—माझे प्राणदाते जिवंत असतील तर तसें सांगा ह्मणजे या **गजरेचा** एकदांचा जीव खालीं पडेल ! नाहीं तर प्राणदात्यांची जी हकीकत तीच माझीही होईल !

**यश०**—(आपणाशीं) अहाहा ! केवढा उदारपणा हा ! वाहवा वाहवा ! धन्य तुझी ! (मोठ्यानें) राजकन्ये! त्या यःकश्चित् **यशवंतरावा**करितां असें साहस करणें तुला योग्य नाहीं ! मला **यशवंतरावा**बदल सर्व हकीकत माहित आहे, परंतु त्यानें तुझ्यावर उपकार केलेले मला मुळींच स्मरत नाहींत!

आणि जरी कदाचित् तो एकादे वेळीं तुझ्या उपयोगीं पडला असला, तरी त्याबद्दल तूं इतका मनांत विचार करण्याची जरूर नाहीं. कारण तो बोलून चालून तुझ्या बापाचें वैर करणारा, तेव्हां त्याला या अपराधाबद्दल देहदंडच योग्य आहे! याकरितां तुला सांगतों तूं त्याजबद्दलचा क्षणमात्रही विचार मनांत आणीत जाऊं नको! तसेंच—

गज०—देवा! काय संकट हें? महाराज! कृपा करून आपला उपदेश अंमळ एकीकडे टेऊन मी विचारितें एवढेंच मला सांगा! आपणास यशवंतरावाबद्दल काय माहित आहे? आपण यशवंतराव नव्हे हें खचितच ना?

यश०—(गोंधळल्यासारखा होऊन) आं? काय ह्मटलेंस, राजकन्ये? मी तुझें ह्मणणें नीट समजलों नाहीं!

गज०—(तो गोंधळला हें पाहून) महाराज! आपण गोंधळलासें दिसते!—खचित! खचित! मी आपणांस ओळखिलें! आपण माझी त्या चोरट्याचे हातून सुटका केली, त्यावेळीं मी आपणास आपण कोण ह्मणून विचारिलें, त्यावेळीं मी दौलतरावाची कन्या असें समजून, आपण आतां गोंधळलां तसेंच त्यावेळींही गोंधळलां होता, व जरी या वेळीं आपण वेश पालटला आहे, तरी या वेशाच्या आड आपली तेव्हांची आणि आतांची मुद्रा खचित एक आहे असें मी ओळखिलें!—महाराज! बोला! बोला! आपणास कदाचित् असें वाटत असेल कीं ही आपल्या वैऱ्याची कन्या आहे यास्तवही आपला विश्वासघात करील, तर ही कल्पना आपण क्षणभरही मनांत आणूं नये. माझे प्राण आपण वांचविले त्याअर्थीं असा अधमपणा माझ्या हातून कधींही होणार नाहीं! पाहिजे असेल तर प्रत्यक्ष परमेश्वराचीही मी शपथ वाहीन, परंतु एवढ्यानेंही आपली खात्री होत नसेल, तर सरते शेवटीं माझी आपणास एक विनंती आहे, ती हीच कीं, आपण एकवेळ स्वमुखानें माझी संशय निवृत्ति करा, आणि मी विश्वासघात करीन ह्मणून जर आपणास भय वाटत असेल तर विलंब न लावितां माझे प्राणही घ्या, मी ते देण्यास तयार आहें.

यश०—राजकन्ये! आजपर्यंत मला वाटत होतें कीं, सुवर्णपुरी सोडून गेल्यास मला पुष्कळ वर्षे झालीं, व तेव्हांपासून ह्या वेळपर्यंत माझें एकसारखें रानोमाळ अनेक प्रसंगीं अन्नपाण्याशिवायही फिरणें चाललें होतेंच यामुळे माझी त्या वेळची ती जवानी आतां राहिली नसेल, आणि यास्तव मी वेश पालटला असतां मला कोणी ओळखूं शकणार नाहींत. परंतु तूं मला ओळखिलेंस खचित! तूं ह्मणतेस तोच यशवंतराव मी! परंतु मला एवढें सांग तूं मला कसें ओळखिलेंस? मी अमुक आहें हें तुला कसें समजलें? तसेंच आणखी एक—मी येथें आहें हें तुझ्याशिवाय आणखी कोणा कोणास कळलें आहे?

गज०—हे राजपुत्रा! स्वत: अनंग असतांही कामिजनसार्थास आपल्या प्रियजनाचें निवासस्थान दाखविणारा जो कामदेव त्यानेंच, आपण मला प्राणदान केलें त्यावेळीं, आपली व माझी ओळख करून दिली, व त्यानेंच मला आपल्या शूर मूर्तीस ह्या हृदयमंदिरांत ठेवावें ह्मणून उपदेश केला,

तेव्हांपासून आपण इतके दूर असतांही आपली मूर्ति सदोदित माझ्या नेत्रासमोर प्रत्यक्ष उभी आहे, याकरितां मी आपणास वेष पालटला असतांही ओळखिलें यांत नवल तें कोणतें? तें असो! परंतु हे राजपुत्रा! माझी आपणास एक हात जोडून विनंती आहे. ती ही कीं, आपण येथें आलां आहां याबद्दल चकारशब्दही अद्यापि कोणास कळला नाहीं तोंपर्यंतच आपण या वाड्यांतून निघून जावें! महाराज! आपण या ठिकाणीं फार वेळ रहाल तर खचित आपणास कांहीं तरी दगा होईल! आपणास मालोजीनें इकडे आणून पोंचविलें त्याचे अगोदरच मीं आपणास पाहिलें, तेव्हां आपण गैरसावधपणानें या व्याघ्राच्या जाळींत आलां आहां, यास्तव आपणास सूचना देऊन आपली येथून सुटका करावी या हेतूनें मी आपल्या मातोश्रींच्या महालाजवळ आपलीच वाट पहात होतें. महाराज! मी आपणाकरितां आपले प्राणही खर्च करण्यास कबूल आहे, परंतु आपण कृपा करून आतांच्या आतां येथून निघून जावें! आपला अद्यापि कोणास संशय आला नाहीं तोंपर्यंतच आपण येथून निघून जावें कसें! महाराज! आपण माझे प्राणदाते आहां—एवढेंच नव्हे—तर प्राणांपेक्षांही प्रिय अशा माझ्या पातिव्रत्याचे रक्षकही आपणच आहां—यासाठीं आपणावर एखादें संकट गुदरलेलें माझ्यानें पहावणार नाहीं ह्मणून सांगतें.

यश०—अहाहा! प्राणप्रिये!—नाहीं नाहीं—चुकलों—हे राजकन्ये! तुझी व माझी त्या पर्वतेश्वराच्या रानांत गांठ पडली, त्यावेळीं परस्परांच्या हृदयांत अपरिचितपूर्व असा विकार यदृच्छेनें उत्पन्न झाला, व जरी त्या प्रसंगीं आपण एकमेकांस अनुरागसूचक शब्दांनीं बोललो होतों, तरी एकवेळ पुढें जेव्हां वियोग झाला व तूं आपल्या पित्याच्या मंदिरीं परत आलीस, तेव्हां मी एकटाच अरण्यांत पुनरपि भटकत फिरूं लागलों असतां आपल्या स्थितीविषयीं विचार करूं लागलों; तेव्हां ह्या परस्परानुरागापासून कांहीं उपयोग व्हावयाचा संभव नाहीं, कारण तुझ्या पित्याच्या मनांत मजविषयीं पूर्ण द्वेषबुद्धि भरली आहे, व यास्तव तो तुझ्याशीं माझा विवाह होण्यास कधींही अनुमोदन देणार नाहीं, व मीही स्वतःला कितीही त्रास भोगावा लागला तरी भोगीन परंतु तुझ्या पित्याच्या इच्छेविरुद्ध तुजशीं विवाह करून तुला जन्मभर संकटांत घालावयास कबूल व्हावयाचा नाहीं, ही गोष्ट मनांत येऊन मी अगोदरचा सर्व प्रकार विसरून जाण्याविषयीं यत्न करूं लागलों. हे यत्न करितांना, वारंवार तुझी ही प्रशांतगंभीर मूर्ति हृदयांत प्रत्यक्ष उभी राहिलीसें वाटून माझ्या जिवास पश्चाताप झालासें होई, व तशा समयीं पुनरपि अंतःकरणाची वृत्ति बदलून एकवार तुज शुभाननेस वरावें, तुजसमागमें अरण्यांतही वास करावयाचें पडलें तरी तो पत्करून त्या ठिकाणींही प्रत्यक्ष नंदनवनांतील उपभोग घ्यावे, इत्यादि विचार मनांत येत; व ते विचार कांहीं केल्या मनांतून जात नसत. परंतु केव्हां केव्हां तर असें होई कीं, मी त्या विचाराच्या भरांत असतां एकाएकीं एखादी भयंकर किंकाळी कानीं पडल्याचा भास होऊन इकडे तिकडे पाहूं लागावें, व

त्यावेळीं या वाड्याच्या देवघरांत सुवर्णाच्या पाटावर रक्तबंबाळ होऊन पडलेली ती पितृमूर्ति, व तिच्याजवळ हातांत रक्तानें लाल झालेली तलवार घेऊन नेत्र कावरे-बावरे व आरक्तवर्ण झालेला असा तुझा पिता हीं दोन माझ्या दृष्टीसमोर दिसूं लागत, व त्यावेळीं तो भयंकर प्रकार पाहून आश्चर्य, भीति, क्रोध इत्यादि अंतःकरणाच्या निरनिराळ्या वृत्तींनीं सर्व अंतर्याम क्षुब्ध होऊन जऊन माझा पिता डोळ्यांत आंसवें आणून विकारयुक्तपणें दौलतरावाकडे, व मजकडे कावळतवाणी, पहात असून, जसा कांहीं आपला निर्दयपणें विश्वासघातानें घात करणाऱ्या अधमाचा मीं सूड उगवावा अशी माझी विनवणीच करीत आहे असा भास होई, व त्या स्वमसृष्टींत दंग असतांच एकाएकीं नेत्रापुढें अंधेरी येई, व कांहीं वेळानें पुनरपि सावध होऊन पाहें तों माझी विचारी दीन माता—तिच्या सतीगमनासही विघ्न करून आपल्या पातकी विचारास तिनें कबूल व्हावें एतदर्थ तुझा पिता तिला त्रास देत आहे हा प्रकार दिसूं लागे! राजकन्ये! हा व असाच दुसरे प्रकार वारंवार डोळ्यांपुढें दिसूं लागून माझ्या मनाची सांप्रत काय स्थिति झाली आहे ती सांगतां सुद्धां येत नाहीं. परंतु तुला एक गोष्ट सांगतों, कीं एकंदर आतां सांगितलेले प्रकार मनांत निरंतर घोळत राहून तुझा पिता व मी या दोघांमध्यें दिवसेंदिवस वैर वृद्धिंगतच होत गेलेसें वाटून उत्तरोत्तर तुझ्या प्राप्तीची आशा दुरावतच चालली! यामुळें निराशेच्या आधीन होऊन ब्रह्मदेवानें तुला मजसाठीं व मला तुजसाठीं निर्मिलें नसावें असेच विचार माझ्या मनांत घोळूं लागले! व तेव्हांपासून ही तुझी मनोहर मूर्ति विसरून जाण्याचाच मी यत्न करीत आहें—तथापि राजकन्ये! तुला काय चमत्कार सांगूं, तुझी मूर्तिरूप लता अंतःकरणभूमिकेंतून उपटून टाकण्याचाच यत्न करीत असतां तिचीं प्रेममुळें उलटीं हृदयांत अधिक अधिक खोल जोरावत आहेत! हायहाय! राजकन्ये!—

**गज०**—हे उदार राजपुत्रा! आपला हा दुःखकारक वृत्तांत श्रवण करून माझ्या मनाची काय स्थिति झाली आहे हें मला सांगतां येत नाहीं. माझ्या बाबांच्या आचरणामुळें अनेक निरपराधी प्राण्यांस त्रास व क्लेश भोगावे लागत आहेत, तथापि विधिलिखितापुढें कोणाचा उपाय चालतो? यासाठीं आपण आपल्या परस्परांवरील प्रेमाची सफलता होण्याचा संभव वाटत नाहीं म्हणून बोललां ही गोष्ट खरी आहे, तथापि अद्यापिही परमेश्वर कृपा करील तर हीही गोष्ट घडून येणार नाहीं असें माझ्यानें निश्चयानें सांगवत नाहीं! परमेश्वर करील—तर माझ्या बाबांस आपल्या क्रूर आचरणाबद्दल पश्चात्ताप होऊन सर्व गोष्टी यथास्थित जमतील! परंतु मी त्याबद्दल कांहीं बोलत नाहीं. आपलें परस्परांवरील प्रेम निष्फळ होणार हा विचार मनांत येऊन मला अत्यंत दुःख वाटत आहे, परंतु तें मी आपल्याच शांतवृत्तीचें अनुकरण करून मुकाट्यानें सहन करण्यास झटेन!—परंतु हे उदार व शूर राजपुत्रा! ह्या प्रेमाविषयींच्या गोष्टी बोलण्याची ही वेळ नव्हे! आपण यासमयीं येथें आलां आहां ह्यामुळें

आपणाबद्दल माझ्या मनास फार धास्ती वाटत आहे! आपण यावेळीं निःशंकपणे या व्याघ्राच्या जाळींत आलां आहां, ह्यामुळे मोठाच अनर्थ ओढवेल असें माझी मनोदेवता मला सांगत आहे, ह्यासाठां मी आपल्या पायां पडतें, आपण कृपा करून या क्षणीं राजवाड्याच्या बाहेर पडावें! पर्वतेश्वराच्या रानांतील तो प्रकार झाला, त्यावेळीं मीं आपल्या मातोश्रीचें रक्षण व समाधान करावें ह्मणून आपण मला सांगितलें त्याप्रमाणें पाहिजे तर मी त्याचें समाधान करून आपण जिवंत आहां ही आनंदवार्ता त्यांस कळवीन! परंतु कृपा करून आपण मात्र या वाड्यांतून बाहेर पडण्यास क्षणमात्र विलंब लावूं नये!

यश०—हायहाय! हे उदार राजकन्ये! तुझें भाषण ऐकून माझ्या जिवास अनिवार ताप उत्पन्न होत आहे! परंतु काय करूं! माझा कांहीं इलाज चालत नाहीं! माझ्यानें हा वाडा सोडून कदापि बाहेर जाववणार नाहीं!

गज०—तें कां बरें?

यश०—राजकन्ये! तुला काय सांगूं! माझ्या मनांतील सर्व वृत्ति कशा खवळून गेल्या आहेत तें मी तुला मघां सांगितलेंच आहे! तुझ्या पित्याच्या अनन्वित आचरणामुळें माझे बाबा व आई याची जी भयंकर स्थिति झाली, ती वारंवार मनांत येऊन माझें मनच मला आवरेनासें झालें आहे! माझ्या निरपराध पित्याचा ज्या दुष्टानें विनाकारण वध केला, त्या दुष्टाचा सूड—

गज०—सूड?—काय ह्मटलें आपण? सूड?—हायहाय! हा शब्द ऐकून माझ्या अंतःकरणावर प्रत्यक्ष वज्राघातच झाल्यासारखा मला वाटत आहे! आपलें नेहमीं सुहास्य वदन असावयाचें, परंतु ह्यावेळीं आपल्या मुखचर्येकडे पाहून मला अतिशय भय वाटत आहे! आपल्या नेत्रांतील तें शांत तेज आज कोणीकडे नाहींसें होऊन आपले नेत्र कावरेबावरे झाले आहेत! तसेंच आपण येथें रात्रींचे आला आहां, व हा भयंकर वेशही धारण केला आहे, इत्यादि सर्व गोष्टींवरून माझा घात होणार असेंच मला वाटतें! हाय हाय! हे उदार राजपुत्रा! दया करा! मी आपल्या पायां पडतें! आपला हेतु माझ्या पित्याचा घात करावयाचा आहे असें मला वाटतें!—महाराज! महाराज! मी आपणास हात जोडून विनंती करितें—आपण ही मनांत आणलेली गोष्ट करणें सोडून द्या!—ह्या गोष्टीपासून माझ्या जिवास किती क्लेश होतील हें आपण जाणतच आहां!—दया करा! जर मी यावेळीं स्वस्थ राहिलें तर मीं आपणास साह्य केलेंसें होऊन पितृहत्येचें पातक माझ्या माथीं पडेल याचा विचार करा!—

यश०—(आवेशानें) राज्यकन्ये! तुझें ह्मणणें आहे तरी काय? तुझ्यानें तुझ्या पित्याचा घात झालेला पहावत नसेल, तर मी सांगतों असें कर! याक्षणीं तूं मला आपल्या पित्याकडे घेऊन चल, व त्यास मी **यशवंतराव** आहें ह्मणून सांग! व माझा घात झालेला पाहून आपले डोळे निववीव!

गज०—देवा! देवा! मज हतभागिनीसारखें कधीं कोणावर तरी संकट पडलें असेल काय?—हायहाय! हे उदार राजपुत्रा!—कसेंही असलें तरी ते माझे बाबा—त्याचा

घात झालेला माझ्यानें कसा बरें पहावेल? माझ्या पित्याच्या आचरणामुळें आपल्या मातापितरांस व आपणास अनिवार क्लेश व संकटें भोगावीं लागलीं हें सर्व खरें आहे, तथापि परमेश्वर करो आणि प्रत्यक्ष प्राणघातापेक्षां सौम्य, अशा उपायाची योजना करून आपल्या दुःखानें परिमार्जन करण्याची आपणास बुद्धि देवो! आपण जी गोष्ट करावयाचें मनांत आणिलें आहे, ती गोष्ट घडली असतां चोंहोंकडे मोठेंच अनर्थापात होतील यांत संशय नाहीं—यासाठीं, हे सौम्य व उदार राजपुत्रा! माझी आपणास एवढीच विनंती आहे कीं, कृपा करून आपण मनांत आणलेली गोष्ट करणें सोडून देऊन एकदम या राजवाड्यांतून निघून जावें.

**यश**—( गहिंवरतो. ) हरहर! राजकन्ये! एकून मी जावयाचे अगोदर आपल्या मातोश्रीचें दर्शन सुद्धां घेऊं नये असें तुझें ह्मणणें आहे! माझ्या मातोश्रीची दुःखकारक स्थिति मनांत येऊन माझ्या नेत्रांतून जे अश्रूंचे लोट येत आहेत त्याची शेवटली धारा तिच्या चरणांवर पाडून तेवढ्यानेंच आपलें समाधान करून घेऊं नये असें तुला वाटतें? हायहाय!—

**गज०**—शाबास! उदार राजपुत्रा! शाबास! आपलें एवढेंच ह्मणणें असेल तर तेवढें करण्यास आपणास मी नाहीं ह्मणत नाहीं, परंतु आपण येथें फार वेळ रहावयाचें करूं नये! अरुणोदय झाला कीं तावडतोब येथून निघून जावें! त्याप्रमाणें न होईल तर निराशेच्या आधीन होऊन माझी काय स्थिति होईल माझ्यानें सांगवत नाहीं! प्रत्यक्ष पित्यांच्या प्राणरक्षणासाठीं— देवा! देवा! ह्या गोष्टीचा माझ्यानें उच्चारही करवत नाहीं! —हे राजपुत्रा! आपण या ठिकाणीं राहिलां, तर आपणास मोठी भीति आहे, यासाठीं आपण निघून जावें हें बरें!

( निघून जाते. )

**यश०**—( आपणाशीं ) हायहाय! घात झाला! या राजकन्येचें भाषण ऐकून माझें मन अगदीं घोटाळ्यांत पडल्यासारखें झालें आहे! तर काय? मीं येथून निघून जावें? काय! भागूबाईप्रमाणें येथून पळून जाऊन माझीं मातापितरें व माझे सर्व स्नेही यांच्याशीं मीं बेइमानानें वागावें? धिक्कार असो! धिक्कार असो! ही गोष्ट माझ्या हातून कदापि होणें नाहीं! हे हृदया! स्थिर हो! तुला ही गोष्ट करावयाची विनाकारण भीति वाटत आहे! वास्तविक संकट सुईच्या अग्राप्रमाणें सूक्ष्म असतें, परंतु भीतीमुळें त्यास पर्वताचें महत्व आलेंसें वाटतें! कसेंही संकट प्राप्त झालें असतां धैर्याचेंच अवलंबन करणें शूरांस उचित आहे! असो! आतां मातोश्रीकडे जावें!—अरे! आतां प्रत्यक्ष मातोश्रीपुढें उभें राहून तिला ओळख द्यावयाची नाहीं, तेव्हां माझ्यानें पहावेल तरी कसें कांहीं समजत नाहीं! आतां एकेक पाऊल तिच्याजवळ जात चाललों आहे असें वाटून माझें हृदय जसें कांहीं आनंदसमुद्रांत उचंबळत आहे, तर ही स्थिति मी झांकूं तरी कशी?—देवा नारायणा! यावेळीं मला तूं धैर्य दे!—असो. **मालोजीनें** माझ्या मातोश्रीचा ह्मणून कोणता—तो महाल दाखविला नव्हे का? होय! तोच!

(निघून जातो.)

**प्र० २.—राजसबाईचा महाल.**

(राजसबाई सचिंत बसली आहे, व कोंपऱ्यांत कोणी कुळंबीण उभी आहे.)

**राज०**—कायग **सखू**! **मालोजी** त्या शूर पुरुषास मजकडे पाठवून देतों ह्मणून कबूल करून गेल्याला किती वेळ झाला बरें? अजून कां बरें तो पुरुष येत नाहीं?

**सखू**—येत्याल बाईसाब! इकत्यामंदीच येत्याल! (महालाचें दार उघडून बाहेर पहाते इतक्यांत यशवंतराव तिच्या दृष्टीस पडतो, त्यास पाहून) अगा बया! ह्यो पन कोन पुरुस हत येतोया? ह्येला बघूनशी माझा पन परान जसा डुगडुग करतोया! **मालुजींनं** तर नसलना ह्येला पाटिवलं?

**यश०**—(बाहेरून) रानीसाबांचा म्हाल ह्योच नव्ह का?

**सखू**—व्हय. पण तुमाला त्येशीं का करायचं हाय?

**यश०**—(बाहेरून) काय? मला व्हय?—जानू रानीसाबांस्नी सांग मी कुनी **येस्वंत-रावाचा** सोबती हायनू मस्नी **मालुजीनं** हत पाटिवलया!

**सखू**—जी. तुमी असच हत र्‍हा मी बोलिवे बाईसाबांस्नी. (राजसबाईकडे येते) बाईसाब! त्ये **मालुजींनं** पाठिवलेल गिरस्त भाइर आल्याती!

**सखू**—जी बाईसाब! (यशवंतरावाकडे येते) जा असच आंत. बाईसाब तुमास्नी व्हकारत्यती! (यशवंतराव आंत येतो व सखू दार लोटून बाहेर निघून जाते.)

**यश०**—(आपणाशीं) हायहाय! माझें हृदय कसें धडधडतें आहे व जरी प्रत्यक्ष मातृदर्शनाकरितां मी जात आहें, तरी तिच्याशीं बोलूं लागलों ह्मणजे माझी मुद्रा कदाचित् निराळी होईल, किंवा नेत्रांतून अश्रु वाहूं लागतील व तेणेंकरून ती मला ओळखील याचें मला भय वाटत आहे! देवा देवा! आतां मी प्रत्यक्ष आपल्या मातोश्रीशीं कपटभाषण करणार याबद्दल क्षमा कर! (पुढें जातो व आई दृष्टीस पडतांच किंचित् थांबल्यासारखा होऊन आपणाशीं) हर हर! कायही ह्या दुष्टानें माझ्या आईची स्थिति केली आहे! मी आतां तिच्याच समोर आहें हें पूर्वींपासूनच ठाऊक आहे, नाहींपेक्षां हिला माझ्यानें ओळखवलें नसतें खचित!—आः दुष्टा!—हर हर! माझे प्रिय जनक जिवंत असून सिंहासनावर विराजमान असतां जी केवळ गृहलक्ष्मीच आहे काय असा भास होई तिचीच ही किती भयंकर स्थिति झाली आहे? केश विखुरलेले, डोळे खोल गेलेले, गाल बसलेले, मुखचर्या निस्तेज झालेली, हर हर! नुसती हिची अशी मूर्ति पाहिल्याबरोबरच नेत्रापुढें अंधारी येऊं पहात आहे! आणि या सर्व स्थितीचें कारण एकटा हा दुष्ट!—आः दुष्टा अधमा! थांब तुझ्या नरडीचा घोट घेतों. (पुढें जाऊन राजसबाईस सलाम करितो.)

**राज०**—कोणरे बाबा तूं? **मालोजी** मला तूं माझ्या प्रिय पुत्राचा स्नेही आहेस ह्मणून सांगत होता, तो तूंच काय?

**यश०**—जी आईसाब! मला **येसबा** ह्मनत्यात!

**राज०**—**येसबा**! आज सात वर्षें झालीं. या बंदीशाळेंत मी राहून इतके दिवस काढिले, परंतु एकटा **मालोजी** व ती एक विचारी **गजरा** यांशिवाय माझ्या पुत्राचें वर्तमान

सांगून माझें समाधान करावयाला कोणी दुसरें नव्हतें. परंतु आज तूं प्रत्यक्ष माझ्या पुत्राची हकीकत सांगावयास आला आहेस. हे तुझे उपकार मी जन्मजन्मांतरींही विसरावयाची नाहीं! येसबा! प्रत्यक्ष सर्व प्राणिमात्रांचा कनवाळू जो परमेश्वर त्यानेंच मला सोडविल्यासारखें झालें आहे अशा स्थितींत तूं माझें समाधान करावयास आला आहेस हे तुझे मजवर महदुपकार झाले आहेत! असो. आतां मी विचारितें एवढें मला सांग, तूं माझा दुर्दैवी पुत्र मरतांना पाहिलास? त्यानें मरतांना माझी आठवण काढिली होती?

**यश०**—आईसाब! आपला पुत्र—( गहिंवरून नेत्रांतून अश्रु ढाळितो,व कांहीं वेळानें धैर्य धरून ) आईसाब ! माफ करा! आपली ही दशा बघूनशी दगडासबी दया यइल, मग माझी गोष्टी तर पुसूंच नका!

**राज०**—( गहिंवरून ) हे उदार पुरुषा ! तूं धन्य आहेस! आज इतक्या दिवसांत माझी ही स्थिति पाहून गहिंवरले असे प्राणी फार थोडे! तें असो. पण बोल, माझ्या पुत्राचें तूं काय ह्मणत होतास? माझा पुत्र मरतांना तूं पाहिलास ?

**यश०**—आईसाब! **दौलतराबा**कडूनशी ह्यो मी आतांच आलों, व त्येच्याच हुकमानं मी आपनाला सांगाया आलोंया, कीं ह्य डोळ खेरीज करूनशी दुसऱ्या कुनीबी त्येला मरतांना पायलं न्हाय !

**राज०**—हायहाय रे निर्दया दैवा! एकून माझ्या पुत्रानें मरतांना तरी माझ्या मांडीवर डोकें ठेवून मरावें, व तें तरी मी डोळे भरून पहावें हें देखील तुला आवडलें नाहींना ! हायहाय ! दुष्टा नशिबा! अरे, मरावयाचे वेळीं तरी मी त्याला आलिंगन दिलें असतें, व त्याचे मरणकाळींचे दुःखोद्गार हृदयांत सांठवून ठेविले असते, पण तें देखील तुला मानवलें नाहींना ?—**येसबा** ! तूं तरी बाबा आतां मला सांग, माझा पुत्र मरतांना काय बोलला ? व त्याची त्यावेळीं मुद्रा कशी झाली होती? बोल बोल! त्याचे त्या वेळचे शब्द मला यावेळीं लक्षावधि जगतांतील संपत्तीच्या पलीकडेस आहेत ! बोल! तो मरतांना कांहीं बोललाका? मरतेसमयीं त्याचें मन कशावर गुंतले होतेंका ?

**यश०**—(नम्रपणें) आईसाब ! बोलतो ह्येबा आपून राग नका मानूं ! असं समजा ! आपल्या **येसंतरावांनीं** मरतांना मसनी असं बोहिलं कीं, जा तूं माझ्या मातुसरीपायाप, आन त्येना सांग कीं तुमी आजतलक लईच दुक काढलया; पण आतां त्ये संमर्द इसरूनशी, तसंच माझं मेलल बाबा, आन् आतां परान सोडतोया त्यो मी, अशा दोगांस्नीची इसरूनशी त्येवढ्या **दौलतरा**वाच्या ह्मनन्यास हो ह्मनाच !

**राज०**—(त्वेषानें) दुष्टा ! घातक्या ! तूं खोटें बोलतोस! तूं कोणी तरी दुस्मान आहेस, व त्या चांडाळ **दौलतरावानें** तुला माझा छळ करण्याकरितां पाठविलें आहे! चल निघ काळतोंड्या इथून! मला तोंड दाखवूं नको ! माझा पुत्र असें कधीं ह्मणणार नाहीं! आणि जर ह्मणाला असेल तर सत्यानास होवो त्याचा न् तो नरकांत पडो! मला त्याबद्दल तिळमात्रही वाईट वाटावयाचें नाहीं! परंतु तो असें कधीं ह्मणावयाचा नाहीं ही माझी पक्की खातरी आहे! माझा पुत्र उदार आहे! त्याच्या मनांत असली कुकल्पना कदापि याव-

याची नाहीं!—कां दुष्टा! अजूनही तूं मज-पुढें उभा आहेस? जात नाहींस? देवा! देवा! काय माझें नशीब हें, कीं त्या दुष्ट दौलतरावाच्या गुलामांनींही मजपुढें नि-र्लज्जपणें येऊन माझ्या दुःखावर डाग द्यावे? हायहाय! देवा! देवा!—

यश०—आईसाब! आपनासनी लईच दुक झा-ल्या, पन आपन अंवळ शांत व्हा! आ-पलं दुक आजूनबी दूर व्हईल! (रडूं लागतो.)

राज०—मानभाव्या! अरे, तूं माझ्या दुःखावर डाग देऊन आतां कां रडतोस? तूं कितीही रडलास तरी तुझें ह्मणणें ह्मणून मला खरें वाटावयाचें नाहीं!

यश०—आईसाहेब! मी रडतों आहें खरा, परंतु मी इमानी आहें! मी बाहेरून दिसतों तसा आंतून नाहीं! मी निराळाच आहें!

राज०—तर मग तूं कोण आहेस?

यश०—आईसाहेब! माफ करा—माझ्यानें या वेळीं कांहीं जास्ती बोलवत नाहीं! परंतु मी आपणास एवढेंच सांगतों, कीं मी आपला व यशवंतरावाचा स्नेही आहें. मी येथें आलों तो आपल्या दुःखावर डाग देण्याक-रितां आलों नाहीं, तर उलटें आपल्या जि-वाचें समाधान करण्याकरितां आलों आहें! आईसाहेब! माझ्या भाषणानें आपलें अंतः-करण उचंबळूं देऊं नका, परंतु मला वाटतें कदाचित् आपले प्रियपुत्र अद्यापिही जिवंत असतील!

राज०—काय ह्मणतोस? माझा प्रिय पुत्र अद्या-पिही जिवंत असेल? होयना? अरेरे! पण मी हें काय वेड्यासारखें विचारितें? माझ्या मनाची पण ही अशी काय विलक्षण स्थिति झाली आहे? छे! ही सर्व भ्रांतिच असली पाहिजे! माझ्या पुत्राची राखही केव्हांच होऊन गेली, आतां तो कसचा जिवंत होतो? छे! माझा प्रिय पुत्र मेला हेंच खरें! देवा देवा!

यश०—(मनांत) माया ही कांहीं विलक्षण आहे! आतां हिच्याशीं बोलूं तरी कसें? कांहीं समजत नाहीं! मी जास्ती बोलेन तर ही मला खचित ओळखील!—हृदया! स्थिर हो!—(उघडपणें) आईसाहेब! आपणास मी सांगतों, आपले पुत्र अद्यापि जिवंत आ-हेत! कारण ते मेल्याची बातमी बाहेर पसरल्यावर देखील या कोंकणपट्टींतच मी त्यांना प्रत्यक्ष पाहिलें!

राज०—हे उदार पुरुषा! तूं आहेस तरी कोण?

यश०—आईसाहेब! मी आपला असाच कोणी तरी आहें! मला कोणी ना स्नेही, ना घर, ना दार! फक्त माझे एकटे स्नेही काय ते यशवंतराव! ते येथून सात वर्षांपूर्वीं निघू-न गेले तेव्हां त्यांचे बरोबर मीही बाहेर पड-लों! त्यांनीं अनेक प्रकारचीं दुःखें भोगिलीं व संकटांत व हालांत दिवस काढिले, त्याप्र-माणेंच मीहि त्यांच्या बरोबर राहून हालांत व संकटांत दिवस काढिले! आपण पूर्वीं ऐ-श्वर्याचा उपभोग घेत असतां त्यावेळीं आप-ली योग्यता पाहून मी आपणांस पूज्य मा-नीत होतों, व आतां आपण संकटस्थितींत असतांही आपली सद्गुणावरील भक्ति उल-टी वृद्धिंगत झालेली पाहून तर आपणास अधिकच पूज्य मानीत आहे!—

राज०—तें सर्व खरें असेल! परंतु मला अ-द्यापि तुझें ह्मणणें खरें वाटत नाहीं! तूं मा-झी दुःखावस्था पाहून खरेंच माझी थट्टा नको करूं! बोल! बोल! माझा यशवंत बाळ अद्यापि खराचका जिवंत आहे?

**यश०**—होय, आईसाहेब ! ईश्वरसाक्ष मीं आपणांस खोटें सांगितलें नाहीं !

**राज०**—देवा ! नारायणा ! धन्य आहेस ! आजपर्यंत मला स्वतःच्या दुःखाचें फार ओझें वाटत असे, परंतु माझा बाळ जर जिवंत आहे, तर मी तें दुःख खुशाल सहन करीन ! देवा ! माझा बाळ जिवंत असेल तर तुझे मजवर मोठे उपकार आहेत, त्यांची मी उतराई कशी होऊं ?—बरें, पण, माझ्या बाळास त्याच्या तीर्थरूपांच्या आणि माझ्या क्लेशांची आठवण आहेना ?

**यश०**—हें काय विचारावें आईसाहेब ! त्यांची व माझी नुकतीच इकडे यावयाचे पूर्वी गांठ पडली होती, त्यावेळीं त्यांनीं आपणास सांगण्याकरितां एक निरोपही सांगितला !

**राज०**—(घाईनें) काय ? निरोप ? बोल पाहूं कसला निरोप आहे तो ?

**यश०**—बोलतों मातोश्री !—आईसाहेब ! **यशवंतरावांचा** आपणांस असा निरोप आहे कीं, "माझ्या तीर्थरूपांना आणि आपणास जे अनन्वित हाल सोसावे लागले, ते माझ्या हृदयास वज्रासारखे खिळून गेले आहेत. ते तेथून ह्मणून जावयाचे नाहींत, व त्यांचें मला क्षणमात्रही विस्मरण होणार नाहीं. आपले पुराणिकबावा **शिशुपालवधाचें** पुराण सांगत असतां असें सांगत कीं, **श्रीकृष्णांनीं** त्याचे अपराधांची संख्या पूर्ण होई तोंपर्यंत वाट पाहिली आणि नंतर त्याचा वध करून पृथ्वीस सुखी केलें, तर मीही त्याचप्रमाणें **दौलतरावाचे** अन्याय मोजीत बसलों आहें, व त्याचा घात करण्याची संधि केव्हां येते ह्मणून वाट पहात राहिलों आहें. ती संधि येई तोंपर्यंत मात्र माझ्या अंतःकरणांतील क्रोधाग्नि रक्षेच्या आंत दडून राहिल्याप्रमाणें राहील, व शेवटीं या दुष्टाचा समूळ नाश केल्याखेरीज कदापि रहावयाचा नाहीं हें आपण पक्कें लक्षांत ठेवावें !"

**राज०**—ईश्वरा ! तूं धन्य आहेस ! व माझ्या बाळाचा पाठीराखाही तूंच आहेस.

**यश०**—आईसाहेब ! आतां आज्ञा घेतों. (तिला मुजराम करतो.)

**राज०**—हे सत्पुरुषा ! तूं इतक्यांतच मला सोडून जाऊं नको ! माझ्या बाळाच्या तोंडचे हे शब्द ऐकून माझ्या जिवास जें कांहीं होतें आहे तें कांहीं मला सांगतां येत नाहीं ! तूं माझ्या बाळाच्या संकटसमयींही नेहमीं त्याचे बरोबर रहात होतास, यावरून या वेळीं मी प्रत्यक्ष माझ्या बाळाचेंच मुख अवलोकन करीत आहे असें मला वाटतें ! यासाठीं क्षणभर तूं येथेंच रहा ! माझ्या मनांतून माझ्या बाळाशीं कितीं पण गोष्टी बोलावयाच्या होत्या ! परंतु उपाय नाहीं ! असो. त्याचें कल्याण करावें ह्मणून परमेश्वराची व आई अंबेची प्रार्थना करणें व त्याचे क्लेश मनांत येऊन शोक करीत बसणें एवढेंच कायतें मला उरलें आहे ! यासाठीं एवढी गोष्ट तूं माझ्या बाळाला कळीव ह्मणजे झालें !

**यश०**—मातोश्री! आपण त्याविषयीं कांहीं काळजी वाहूं नये ! आपली या क्लेशांतून सुटका करण्याविषयीं आपल्या **यशवंतरावांचे** प्रयत्न सतत चालू असून ते आपली सुटका केल्यावांचून कदापि रहाणार नाहींत ! त्यांनीं मला इतकें सुद्धां आपणास कळवावें ह्मणून मला सांगितलें होतें कीं, "अ-

त्यापिही आपली या क्लेशांतून मुक्तता होऊं शकेल! याविषयीं आपण चिंता वाहूं नये! परमेश्वराचे मनांतून कोणतीही गोष्ट करावयाची असली, तर ती कशी होते हें तो समजूं सुद्धां देत नाहीं! तो न्यायी असून निरपराध अनाथाचें रक्षण करण्यास अदृश्य रूपानें कोणाची तरी प्रेरणा करितोच करितो! यासाठीं तो आपलें कल्याण केल्या-खेरीज कदापि रहावयाचा नाहीं हें आपण पक्कें समजावें! तथापि परमेश्वराची जर अशीच इच्छा असली कीं आपला नाशच व्हावा, तर निदान 'मारूं किंवा मरूं!' या निश्चयानेंच पुढें सरसावून त्या दुष्टा **दौलतरावाच्या** नाशार्थ यत्न करण्यास मी कदापि रहाणार नाहीं हें आपण पक्कें मनांत वागवावें!" आईसाहेब! आपले **बाळमहाराज** इतकें बोलले, आणि आतां ज्याप्रमाणें माझ्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या आहेत त्याप्रमाणें त्यावेळीं त्यांच्याही नेत्रांतून चालल्या होत्या!

**राज०**—हे **पांडव**सहाकारी भगवंता! माझ्या कोमल बाळाचें रक्षण तूंच कर! त्यास सांप्रत जीं संकटें व जे क्लेश सोसावे लागत आहेत, त्यांतून त्याचा पाठीराखा तूं होऊन त्याची मुक्ति कर, व त्यास या ठिकाणीं परत आणून त्याच्या राज्यपदावर त्याला बसीव एवढेंच तुजपाशीं माझें मागणें आहे!

**यश०**—बरें तर मातोश्री! आतां घेतों आज्ञा!

**राज०**—हे सत्पुरुषा! आतां तूं जा, परंतु मी बोललें या गोष्टी माझ्या बाळास मात्र कळविण्यास विसरूं नको हो!

**यश०**—आज्ञा. (तिच्या महालांतून बाहेर पडतो, व आपले मागें दार लावून घेतो.)

(पडदा पडतो.)

## प्रवेश ३.—स्थळ पूर्ववत्. राजसबाईच्या महालाबाहेरील दिवाणखाना.

(यशवंतराव येतो.)

**यश०**—(आपणाशीं) हृदया! आतां तूं हवें तितकें खुशाल रुदन कर! अश्रूंनो! आतां तुमच्या संतत धारा खुशाल हव्या तितक्या वाहूं द्या! माझा अंतरात्मा ह्यावेळीं जसा कांहीं आनंदसमुद्रांत गटंगळ्याच खात आहे असें मला वाटतें! नेत्रांतून आनंदाश्रुतर खळतच नाहींत! अहाहा! मी आपल्या प्रिय मातोश्रीच्या दुःखाचें शांतवन करून तिच्या हृदयांत समाधान उत्पन्न केलें ह्यायोगानें मला जें कांहीं समाधान वाटतें आहे तें बोलूनही दाखवितां येत नाहीं! आणि तशांतून तिचे सद्गुण पूर्वीप्रमाणेंच अद्यापिही कायम आहेत हें पाहून तर मला विशेषच समाधान वाटतें! अहाहा! धन्य धन्य मी! मी इतकीं संकटें व भयें सोसून तिला भेटण्याकरितां या व्याघ्राच्या जाळींत आलों आहें त्याचें आज सार्थक झालें! सद्गुणाचा महिमा कांहीं विलक्षण आहे! सद्गुणापासून प्राप्त होणाऱ्या आनंदास तर पारावारच नाहीं! फार काय सांगावें? एकादे वेळीं दुःख प्राप्त झालें तरी तें देखील आल्हादकारक होतें! व मनुष्याचा अंतरात्मा कितीही शोकावेशांत बुडाला असला तरी एकादे वेळीं तरी त्यास ब्रह्मानंदाचा अनुभव आल्यावांचून रहात नाहीं!

( मालोजी व हिंमतराव येतात. )

**दोघे**—महाराजांचा जयजयकार असो !

**यश०**-(त्यांस पाहून) या तुह्मी ! कसें काय ? रात्र किती झाली आहे ?

**हिंम०**—महाराज ! मध्यरात्रीचा डंका पडण्याची वेळ होत आली आहे !

**मालो०**—महाराज ! आपल्या नेत्रांतून अश्रु वाहताहेत याचें काय बरें कारण !

**यश०**—**मालोजी** ! तुह्मीं समजलां नाहीं ! मी आईस भेटून तिचें समाधान करून आतांच बाहेर पडलों ! हे वीर पुरुष हो ! माझ्या नेत्रांतुन अश्रु चालले आहेत तथापि त्यांवरून माझ्या धैर्याची गाळण झाली आहे असें समजूं नका ! माझें अंत:करण मातोश्रीच्या दर्शनाचे पूर्वीं दु:खानें व्याप्त झालें होतें, तें आतां या अश्रूंच्या योगानें पुनरपि शांतिसुखाचा अनुभव घेऊं लागलें आहे इतकेंच कायतें ! मी आतां मातोश्रींचें समाधान केलें आहे, आतां प्रत्यक्ष मृत्यु जरी पुढें येऊन उभा राहिला तरी मी यत्किंचितही डगणार नाहीं! बरें तें असो? पण गांवांतली कशी काय हकीकत आहे?

**हिंम०**—महाराज! सर्व तयारी आहे! महाराज! आपले सर्व साथी नेमलेली वेळ केव्हां होते ह्मणून अगदीं वाट पहात राहिले आहेत !

**यश०**—पण तिची कांहीं खुण ठरली आहेना?

**हिंम०**—होय, महाराज ! मध्यरात्रीचा पहिला डंका पडला कीं सगळे लोक नागव्या तलवारीनिशीं उभे राहतील, व पुढें अर्ध घटकेनें दुसरा पडतो तो पडला कीं लागल्याच जिकडे तिकडे तोडातोडीस आरंभ होईल !

**यश०**—( आवेशानें )अहाहा ! मध्यरात्रीचा डंका केव्हां पडतो आणि या दुष्ट **दौलतरावास** यथायोग्य शासन होऊन त्याच्या जुलुमापासून ही विचारी प्रजा केव्हां मुक्त होते असें मला झालें आहे! **हिंमतराव** ! **मालोजी**! तुह्मां सगळ्या मंडळीच्या भरंवशावर मीं हें काम हातीं घेतलें आहे, यास्तव तें पार पाडणें, हें तुमच्याकडे आहे ! त्या दुष्ट **दौलतरावाची** कन्या **गजराबाई**, तिची माझी मवां गांठ पडली होती, तिनें मला ओळखिलें, व आपला हा बेत चालू आहे याबद्दल तिला बराच संशय आला आहेसें दिसतें !

**मालो०**—महाराज ! आपण येथें राहिल्यास कदाचित् आपणास कांहीं दगा होईल याचें मला भय वाटतें! याकरितां आपण आह्मांबरोबर परत चलावें कसें ! **गजराबाई** कदाचित् ही गोष्ट आपल्या बापास कळवील तर त्यापासून एकादेवेळीं मोठा अनर्थही होईल !

**यश०**—काय ह्मणतां ? मी आपणाबरोबर निघून जाऊं? आणि आपल्या निराश्रित मातेस येथेंच ठेवूं! छि:! ही गोष्ट कदापि होणें नाहीं! त्या दुष्टाचा आज मध्यरात्रीं तिजवर बलात्कार करण्याचा विचार आहे, यासाठीं मी तर येथेंच राहून त्याच्या पाळतीवरच असणार! मरण्याचीच वेळ आली तर मी अगोदर मरेन, परंतु माझ्या मातोश्रीच्या केसास एवढा सुद्धां धक्का लागूं देणार नाहीं! त्या दुष्टाचा या राजवाड्यांत जेथें जेथें ह्मणून संचार होईल, तेथें तेथें मी त्यास न कळत त्याच्या मागोमाग राहून त्या दुष्टाचा तो भयंकर बेत दिसूं लागला, कीं त्याच्यापुढें छाती ठोकून उभ

राहीन आणि त्याची यथेच्छ पूजा करून त्याचा नाश करीन!

हिंमत०—महाराज! धन्य धन्य! आपली ही उदार बुद्धि पाहून आपण सार्वभौम राजाच्याच पदास योग्य आहां यांत संशय नाहीं! तथापि महाराज! माझी आपणास एक प्रार्थना आहे! ती ही कीं आपण येथें राहून आपल्या जिवास धोक्यांत घालूं नये! आपण धोक्यांत रहाण्यापेक्षां माझे प्राणही द्यावयास मी सिद्ध आहें! मी मेल्यानें दुनया ओस पडणार नाहीं, परंतु आपल्यास कांहीं अपाय घडल्यास महाराज! या सर्व आपल्या दीन प्रजा निराधार होतील! यासाठीं कृपा करून आपण **मालोजी**बरोबर येथून निघून जावें! मी एकटा येथें राहून आपल्या मातोश्रींचें संरक्षण करीन!

यश०—हिंमतराव! तुह्मांस असें वाटतें काय, हा **यशवंतराव**, महाप्रतापी **प्रतापसिंह** राजाचा पुत्र, अशा आणीबाणीच्या प्रसंगीं भागूबाईप्रमाणें शेंपूट लपवून मागें राहील! छिः! असें कदापि व्हावयाचें नाहीं! तुह्मी खचित समजा, जर संकटप्रसंगीं मी मागें राहीन, तर मला ज्या राज्यासनावर बसविण्याचा तुमचा विचार आहे, त्या राज्यासनावर बसविण्याच्या उपयोगीं मी नाहीं! या सर्व राज्याचा सुखोपभोग घेण्यास जर मी पुढें, तर हरएक प्रकारच्या संकटप्रसंगींही पुढें असणें हेंच मला योग्य आहे! यासाठीं तुह्मीं या कामीं मला आग्रह बिलकूल करूं नका! मी असा येथें उभा राहीन! (बोटानें दाखवितो) आणि त्या दुष्टाचा समाचार घेईन! या कामीं जर मी पडलों समजा, तर त्याबद्दल तुह्मीं सूड मात्र घ्यावयास कमी करूं नका! बरें, मला सांगा तो दुष्ट या वेळीं काय करीत आहे!

मालो०—महाराज! राजवाड्यांत मेजवानी चालली आहे तेथें यथेच्छ दारूचे पेले झोंकीत बसला आहे!

यश०—फार चांगली गोष्ट! बरें, आपल्या फौजेची व्यवस्था कसकशी ठेवण्यांत आली आहे?

हिंम०—महाराज! राजवाड्याच्या प्रत्येक दरवाज्याजवळ गुप्तपणें कित्येक लोक ठेविले आहेत, ते दारांतील चौकीदारांचा व पहारेकऱ्याचा समाचार घेतील! तेवढा घेतला ह्मणजे मग पुढें कांहीं अडचण पडणार नाहीं! कारण वाड्यांत जे शिपाई प्यादे वगैरे आहेत ते हल्लींच्या उत्सवाच्या कारणानें अगदीं झिंगून खुशाल घोरत पडले आहेत. राजवाड्याकडे बाहेरून येण्याजाण्याच्या जेवढ्या वाटा आहेत तेवढ्या **मानाजीराव फांकडे** व त्यांचे शूर शिपाई हे रोखून आहेत, व त्यांस जर कोणी अडथळा करील तर त्याचा तेथल्या तेथें बळी पडेल! झालें—बाहेरची व्यवस्था याप्रमाणें तर झालीच, आतां रहातांपैकीं आंतली व्यवस्था सांगावयाची राहिली, तीहि थोडक्यांत सांगतों. **हिंमतराव** व **मी** आणि दुसरेही कित्येक आपल्या पक्षाचे शूर लोक ज्यांनीं मारूं किंवा मरूं असाच दृढ निश्चय केला आहे, ते सर्व आंतच राहून दुसरा डंका पडल्याबरोबर एकदम पुढें येऊन थोरला दरवाजा खुला करूं! मग काय? एकदम तोडातोडी सुरू! मग पाहीन तो दुष्ट **दौलतराव** माझ्या हातून कोठें जातो तें!

यश०—वाहवा! वाहवा! **हिंमतराव**! मध्य

रात्र होण्याचा समय जवळ जवळ येत चालला, तसे माझे बाहु पहा कसे स्फुरण पावत आहेत! परंतु माझ्या शूर मित्रांनो, माझें तुह्मांपाशीं एक मागणें आहे, तें एवढेंच कीं, त्या दुष्ट **दौलतरावाचा** घात माझ्याच हातून झाला पाहिजे, याकरितां तुह्मांपैकीं कोणीही त्याचा घात करूं नये!

**मालो०**—महाराज! बोलतों त्याची माफी असावी! माझा संशय कदाचित् खोटाही असेल, पण आपणास बोलून दाखवितों. महाराज! समजा त्या सुंदर **गजराबाईनें**—

**यश०**—**मालोजी**! तुमचे संशय व्यर्थ आहेत! तुह्मांला खचित सांगतों कीं, प्रत्यक्ष ती सुंदरी जरी माझ्या चरणांवर पडून हवी तितकी रडली, तरी त्या दुष्टाचा घात मी कधीं केल्याखेरीज रहावयाचा नाहीं! आणखी जर कदाचित् त्या दुष्टाचा घात माझ्या हातून न होतां तो दुसऱ्या कोणाचे हातून झाला, तर परमेश्वरसाक्ष सांगतों, त्या दुष्टाचा मीं पुरता सूड उगविला असें कदापि वाटावयाचें नाहीं! त्या सुंदरीवर माझें अत्यंत प्रेम आहे ही गोष्ट खरी, तथापि या कामीं मी प्रेमासही एकीकडे झुगारून देईन!

**हिंमत०**—हे शूर व उदार राजपुत्रा! हा आपला उत्साह व निश्चय पाहून आह्मांस फार समाधान वाटत आहे!

**यश०**—बरें, पण शहरांत जिकडे तिकडे सामसूम आहेना?

**हिंमत०**—आपण त्याविषयीं काळजी करू नये! शहरांत जिकडे तिकडे सामसूम झाले आहे! रस्त्यांत एवढें हूं कीं चूं किंवा कांहीं एकादी हालचाल कोठें कांहीं. जणू काय, थोडक्याच वेळांत प्रळयकाळच्या मेघगर्जना सुरू होणार, त्यांचें सर्व लोकांस एकसमयावच्छेदेंकरून अगोदरच स्वप्न पडून ते भीतीनें त्या प्रळयांतून आपण चुकावें या हेतूनें दडूनच बसले आहेत!

**मालो०**—महाराज! आजच्या रात्रीं जिकडे तिकडे कांहीं एक प्रकारची भयानक शांतता पसरली आहे. ती पाहून मला फार समाधान वाटत आहे! ह्यावेळीं यावज्जीवमान सृष्टि स्तब्ध झालीसें वाटत आहे! वारा अगदीं बंद पडला आहे—

**हिंम०**—होय! होय! नुकताच थोड्या वेळापूर्वीं मी समुद्रतीरानेंच असा इकडे आलों, त्या वेळीं समुद्राच्या लाटा देखील बंद पडल्याचा मला भास झाला! काळोख तर इतका पडला होता कीं, डोळ्यांत बोटे घातलें तरी एवढेंसुद्धां दिसत नव्हतें! तसेंच एवढा विस्तीर्ण आकाशमंडप, परंतु त्यांत एक नक्षत्र देखील कोठें दिसत नव्हतें!

**यश०**—होय होय! पण **हिंमतराव**! हें असें पूर्वेकडच्या बाजूस पहा! हा अष्टमीचा मंदप्रभ चंद्र आपल्या अर्ध्या कला झांकीत होत्साता एकाएकीं लाल रक्तासारखा दिसूं लागत आहे, व त्याचे किरण ढगां-आड जाऊन त्यांचा संहारच करण्यासाठीं जणों त्याच्याशीं झगडत आहेत!— (डंका वाजतो) **मालोजी**! हा आवाज बरें कोठून आला?

**मालोजी**—महाराज! हा मध्यरात्रीचा पहिला डंका!—

**हिंमत०**—हीच ती खूण—**मालोजी**! चला चला! आपली मंडळी बसली आहे, तेथें

आपणास गेलें पाहिजे! आतां येथें क्षणभरसुद्धां वेळ घालवितां उपयोगीं नाहीं! तर चलाच आतां येथून!

**यश०**—हे शूरहो! आतां तुह्मी जातांच तर मला एकदा शेवटची कडकडून मिठी मारा!—(सर्व एकमेकांस भेटतात.) आपला सर्वांचा उत्साह पाहून आपण आजच्या या भयंकर प्रसंगीं यशस्वी होऊन येऊं, याविषयीं बेफिकीर असा. परंतु मी सांगतों एवढी गोष्ट मात्र कोणी विसरूं नका! आतां चोहींकडे एकच प्रळय होऊन जाईल, तथापि अशा भयंकर प्रसंगींही तुह्मी क्षमाधर्माचें विस्मरण पडूं देऊं नका! आज आपण हातांत शस्त्र उचललें आहे तें कांहीं संहारच करण्याकरितां नाहीं, तर न्यायाचा झेंडा उभारण्याकरितां आहे. यासाठीं या कामीं कोणाही निरपराध प्राण्याचा घात करूं नये! आपल्या सर्व शूर शिपायांस नीट बजावून सांगा कीं, आपला हेतु धर्मयुद्धाचा आहे—यास्तव केवळ संहार करण्याच्याच पाठीस लागून विनाकारण क्रूरता कोणासही दाखवूं नका! तसेंच लहान लहान बालकें, किंवा कोणी निरपराधी मनुष्यें यांचा संहार करूं नका!

**माल्हो०**—महाराज! आपली आज्ञा आह्मांस शिरसा वंद्य आहे!

**यश०**—बरें तर या आतां!

**हिंमत०**—आज्ञा! (यशवंतरावास सलाम करून माल्होजी व हिंमतराव दोघे जातात.)

**यश०**—(खिडकींतून बाहेर पाहून) अहाहा! नगरांत तर जिकडे तिकडे सामसूम दिसतें! मात्र वाड्याबाहेर पहाऱ्यावरील लोक कायते जागे आहेत! हरहर! बिचारे उद्यां आपण अमुक गोष्ट करूं, तमुक गोष्ट करूं ह्मणून मनांत विचार करीत असतील, परंतु तोंपर्यंत ते कसचे जगतात? असो. नशीब बिचाऱ्यांचें! सामोपचारानें ते ऐकतील तर ठीक, नाहीं तर बिचारे फुकट मरतील! परंतु इलाज काय? बरें, आतां पहिला डंका तर वाजलाच, आणि दुसरा वाजावयास कायतो अर्ध्या घटकेचाच अवकाश राहिला आहे. इतक्या वेळांतच कायतो मला निश्चय केला पाहिजे! एकदा चोहींकडे तोडातोड सुरू झाली ह्मणजे मग मन कदाचित् भ्रमिष्ट होऊं लागेल तर तसें होतां उपयोगीं नाहीं! मला दृढ निश्चयानेंच वागलें पाहिजे! बिचाऱ्या निरपराध प्राण्यांची कत्तल उडविली असें न होतां ज्यांस शासन योग्य त्यांसच शासन झालें पाहिजे! असो. तर आतां येथेंच कोठें तरी लपून बसल्यासारखें राहिलें पाहिजे! हें एक शस्त्र तर माझ्या जवळ आहेच, पण ह्याशिवाय दुसरें ही कंबरेभोंवती आहेच! ठीक आहे! (खिडकींतून आकाशाकडे पाहून) हे मृगांकलोचना भगवंता! आतां मी येथें दडून रहातों आहें खरा! परंतु मी पापाचरणाकरितां दडून रहातों आहें असें नाहीं! तूं सर्वसाक्षी आहेस! तुला माझ्या मनांतील गोष्टी सर्व माहितच आहेत!—काय करावें? अरेरे! एकादें परचक्र जर मला सामिल झालें असतें, तर असा चोरट्यासारखा घाला न घालितां उघडपणें रणशिंगांच्या मेघगर्जिताप्रमाणें गंभीर ध्वनींनीं या दुष्टास जागें करून लढाईकरितां पाचारण केलें असतें, परंतु तशी गोष्ट होणें नाहींच माझ्या नशिबीं, त्याला कोणाचा इलाज? यासाठीं आतां चोरून या वाड्यांतच राहून, सुस्थित

मनुष्याच्या पायांखालून एकदम धरणीकंप होऊन ज्याप्रमाणें धरणी फांटून जावी व त्यांत सर्वांचा नाश व्हावा, त्याप्रमाणें चोर-छापा घालून या दुष्टाचा त्याच्या दुष्कर्मा-बद्दल मला सूड घेतला पाहिजे !

(निघून जातो.)

## अंक ४.

### प्र० १—राजवाड्यांत माजघराशेजारची एक खोली.

(गजराबाई येते.)

**गज०**—(दुःखावेगानें आपणाशीं) देवा ! देवा ! काय ही माझी स्थिति ! मला एकीकडे आड आणि एकीकडे विहीर असें झालें आहे ! हा प्रियजन—हा राजपुत्र **यशवंतराव**—येथें आला आहे ही गोष्ट बाबांस कळवावी तरी पंचाईत, न कळवावी तरी तिकडून प्रत्यक्ष पित्याचा प्राणनाश होण्याची भीति ! हाय हाय ! आतां मी काय करूं ? एवढा वेळ मी आपल्या महालांत ह्याबद्दल विचार करीत पडलें होतें, इतक्यांत मला एकदम भयंकर स्वप्न पडलें त्यामुळें तर माझी छाती धडाधडां उडूं लागली आहे, व सर्वांग घामानें निथळत आहे तें कांहीं केल्या थांबत नाहीं ! माझे बाबा तर उत्सवाच्या गर्दींत अगदीं दंग झाले असून एकसारखे दारूचे बाडगे झों-कण्यांत गुंतले आहेत, त्यांना इकडे बोलावण्यास मी **बहादरशिंगास** सांगितलें आहे परंतु अजून ते इकडे येत नाहींत! तर काय, मी आतां स्त्रीजातीची लाज टाकून देऊन ते मंडळींत बसले आहेत तेथें जाऊन त्यांशीं बोलूं ? काय करावें ? माझें मस्तक तर आतां फिरूं लागून आतां घेरी येईलसें वाटत आहे ! देवा ! देवा ! (पडूं लागते इतक्यांत भिंतीवर हात टेकून पुनरपि सावध होते) (इतक्यांत बहादरशिंग येतो त्यास पाहून) कायहो ! बाबा कोठें आहेत ? ते नाहींत आले ! त्यांना माझा निरोप तरी पुरता कळविलातका पण? माझ्या काळजांत कसें धस्स होऊन गेलें आहे ह्मणून तुह्मीं त्यांस सांगितलेंना ? बोला! बोला लवकर! माझ्यानें नीट उभेंसुद्धां रहावत नाहीं ! बोला ! बोला !

**बहा०**—बोलतों ताईसाहेब !—ताईसाहेब ! मी आपला निरोप महाराजांना कळविला, परंतु ते आपल्याच नादांत आहेत ! एकदा मध्यें हूं मात्र ह्मणाले ! परंतु—

**गज०**—काय नुसतें हूंच ह्मणाले ह्मणतां ? मग कां बरें अद्यापि ते इकडे येत नाहींत! अग आई ! माझें काळीज तर अगदीं भयानें फांटल्यासारखें होऊन गेलें आहे ! छे ! कोण तें भयंकर स्वप्न ! अजून माझ्या डोळ्यापुढें प्रत्यक्ष दिसतें आहे ! जा ! जा ! **बहादरशिंग** ! येथें उभे राहूं नका ! त्यांना आतांच्या आतां कसें तरी येथें घेऊन या ! जर तुह्मीं न याल तर ही **गजरा** जिवंत राहत नाहीं ह्मणूनही त्यांना सांगा ! चला चला!—

**बहादर०**—जातों ताईसाहेब !—पण—

**गज०**—काय ? पण?—हायहाय! तर काय आतां सर्व लज्जा एकीकडे ठेवून मलाच इतक्या मंडळींत गेलें पाहिजे ? हायहाय! परंतु उपाय नाहींच ! गेलेंच पाहिजे ! चला **बहादरशिंग** ! मीच तुमच्या बरोबर येतें ! चला ! (दोघे जातात.)

प्र० २.—राजवाड्यांतील माजघर.

( मेजवानी चालली आहे. दौलतराव इतर मंडळीसह दारू झोंकीत बसलेला दृष्टीस पडतो. )

दौल०—( तारवटलेला होऊन हातांत दारूनें भरलेला वाडगा घेऊन गातो. )

पद.

प्यारे तुम्हीं, दारू ही मनमोहीनी. ध्रु०.
भरुनि रुप्याचे थोर वाडगे, टाका झडकरि पिउनी. १
या षड्रुस पक्वान्नांच्या, समर्थ ही पचनीं. २.
होय इजमुळें सुख तें नाहीं, अमृताच्या सेवनीं. ३.
दुःख, शोक, संतापहि यांतें, विसरवि ठावें जनीं. ४
दुस्तर चिंतार्णवीं बुडाल्या, हिच एक संजिवनी. ५
राज्यासन ग्यां आजि मिळविलें, शंका न आणा मनीं. ६
निजशत्रूची भीतिहि ईच्या, योगें जाइ पळुनी. ७
कैलासेश्वर शंभू तोही, मग्न हिच्या प्राशनीं. ८
या शंभूची शक्ती भार्या, अमुची उपदेशिनी. ९

( गात गात सर्व मंडळीसह दारू पितो, इतक्यांत उमळून येऊन ओकतो, तथापि पुनरपि चाकराकडे पाहून ) कारे लुच्चा ! हरामखोरा ! माझ्या तोंडाकडे पहातोस ? चल ! ओत पाहूं हा वाडगा भरून दारू ! ( चाकर दारू ओततो, ती घेऊन पुनरपि वाडगा तोंडास लावून आणखी गाऊं लागणार इतक्यात गजराबाई येते. )

गज०—( आपणाशीं ) हरहर ! ह्या उत्सवाचे प्रसंगीं बाबांनीं आपली काय ही भयंकर स्थिति करून घेतली आहे ! छे ! ह्या स्थितीपेक्षां पशूची स्थितिही बरी असेल ! आणि ही स्थिति करून घ्यावयाची ती तरी कशाकरितां ? माझे प्राणप्रिय—हायहाय !—माझे प्रिय यशवंतराव—यांच्या मृत्यूची बातमी समजली आहे तिच्या आनंदप्रदर्शनार्थ !—धिक्कार असो ! बाबांची ही स्थिति पाहून मला ओकारी येऊन येथून निघूनही जावें असें वाटूं लागत आहे ! परंतु काय करूं ? मायेचा ओढा मला परत मागें ओढितो, व माझे बाबा अगदीं बिनधास्त बसले असतां त्यांस अगोदर सावध करावें ह्मणून मला जसा काय उपदेशच करितो ! हायहाय ! असो ! इलाज नाहीं ! मला जी गोष्ट बाबांस कळवावयाची आहे, ती कळविल्यावांचून गत्यंतर नाहीं !( दौलतरावाकडे पाहून आपणाशीं ) हाय हाय ! अशा स्थितींत बाबा असतां ते माझें ह्मणणें कसूचें ऐकून घेतात ! धिक्कार असो ! धिक्कार असो ! त्या स्वभामुळें माझ्या काळजांत तर कसें धस्स झालें आहे व ही बाबांची स्थिति पाहून आतां तर जास्तीच होतें आहे ! आतां मला कांहीं सुचत नाहीं ! काय करूं ? बाबांना हांक मारावी तरी ते इतक्या मंडळींत बसले असतांना तसें करणें हें योग्य नव्हे, व तशांतून त्यांना हाक मारलीच तर ती तें ऐकून घेण्याची मारामारच ! ह्याकरितां हाक मारण्याची गोष्ट व्यर्थ ! तर आतां कसें बरें करावें ?—बरें, बाबा दारू पिण्यांत अगदीं मग्न झाले आहेत त्यांच्याजवळ जाऊन त्यांना शपथ घालून त्यांना तसें उठवूं काय ? होय ! होय ! असें करणें हेंच योग्य आहे !—परंतु इतक्या मंडळींत मी जर त्यांच्या जवळ गेलें, तर लोक मला हंसणार नाहींत काय ? हंसतील ! परंतु आतांचा प्रसंगच तसा आहे ! ह्यावेळीं लोक हंसतील ह्मणून काळजी

करीत बसलें असतां मोठा अनर्थ होण्याचा संभव आहे ! याकरितां कांहीं चिंता नाहीं ! जातेंच पुढें! (पुढें जाते, व दौलतराव नवीन दारुचा वाडगा उचलून तोंडास लावणार इतक्यांत त्याचा हात धरून ) बाबा ! बाबा ! तुमच्या पायां पडतें ! आपला हा वाडगा अंमळ एका अंगास ठेवा! मला थोडें बोलावयाचें आहे, तेवढें ऐकून घ्या !

दौल०—( दारूच्या अमलांत रागानें ) आं, माझा वाडगा कोण एका अंगास ठेवा ह्मणतें ? हा मी असाच पिणार ! (गजराबाईनें हात धरला असतांही तसाच वाडगा उचलावयास लागतो. इतक्यांत त्यांतली सर्व दारू खालीं सांडते, त्याबरोबर त्वेषास चढून ) आ: ! हा माझा वाडगा कोणीं सांडला ? त्याचें मी डोकेंच आतां ठेंचून टाकितों कसा! ( इतक्यांत गजराबाईस पाहून ) ही सटवी कोण ? कायगे अवदसे ! माझा वाडगा सांडणारी तूंच काय ? थांब तुला दाखवितों याचा तमाशा कसा काय आहे तो ! वाडगा सांडतेस, नाहीं ?

गज०—बाबा ! अमळ शुद्धीवर येऊन मजकडे पहा तर खरें ! मला तुह्मीं ओळखलें नाहीं काय ? बाबा ! मी तुमची **गजरा** !

दौल०—( संतापानें ) काय कारटे ? तूंच काय ? माझी पोरगी तीच तूंच ? कारटे ! येथें इतक्या मंडळींत कशाला आलीस ? जाऊन बसावयाचें होतेंस कीं नाहीं आपल्या खोलींत तरफडत ? चल निघ येथून !

गज०—बाबा ! पण माझें ह्मणणें तरी ऐकून घ्या तेवढें ! बाबा ! मला आपणाबद्दल भय वाटतें आहे ! माझें काळीज पहा कसें धडधड उडत आहे तें !

दौल०—( शुद्धीवर येऊन ) काय ह्मणतेस कारटे ? तुझें ह्मणणें मी ऐकून घेऊं ? चल ! जा येथून निघून ! उद्यां सकाळीं ऐकेन तुझें काय ह्मणणें असेल तें ! चल ! निघ !

गज०—बाबा ? तुमच्या पायां पडतें, माझें ह्मणणें आतांचे आतां ऐका ! मला उद्यांचा भरंवसा वाटत नाहीं ! आपली मेजवानी अंमळशी बंद राहूं द्या !

दौल०—हा दुष्टे ! तूं आपल्या रडण्यानें माझ्या सर्व आनंदास विरजण घालणार काय? कारटे ! हें पहा ! हा तुझ्या मूर्खपणाचा परिणाम ! तूं येऊन माझा हात धरावयाचें अगोदर हे सर्व लोक कसे उत्सवांत व आनंदांत गढून गेले होते ! पण तूं येथें आलीस मात्र, त्यांचा सर्व उत्सव मागें पडला ! कारटे ! धिकार असो तुला ! येथें येऊन माझ्या व यांच्या आनंदाचा विरस करण्यापेक्षां मेली असतीस तरी त्याचें मला फारसें दुःख वाटलें नसतें! कारटे ! चल ! निघ ! जा आपल्या खोलींत जाऊन नीज ! जा !

गज०—बाबा ! तुह्मांला माझ्या गळ्याची शपथ आहे ! माझें एकवेळ ह्मणणें ऐकून घ्या ह्मणजे मग मी मेलें तरी त्याबद्दल मी काडीमात्र देखील खेद मानणार नाहीं.

दौल०—सत्यानास होवो तुझा ! कारटे ! तूं अजून आपलें ह्मणणें सोडीत नाहींस ? बोल बोल ! कारटे ? आटप झटपट ! तुझ्यामुळें ह्या मंडळीचें दारू पिणेंही बंद पडलें आहे! हं ! बोल !

गज०—बाबा ! मला भय वाटतें !

दौल०—काय ? तुलाच भय ?

गज०—होय ! बाबा ! माफ करा ! माझी ह्या-

वेळीं काय स्थिति झाली आहे ती एका ईश्वराखेरीज दुसऱ्यास नाहीं समजणार ! बाबा ! मी ईश्वरसाक्ष सांगतें ! भीतीनें माझें हृदय एकसारखें धडधडतें आहे !

दौल०—मूर्ख नाहीं तर ! पोरी ! तुला झालें आहे तरी काय ? तुझें डोकेंबिकें तर नाहीं नाफिरलें?

गज०—होय, कांहीं ह्मणा ! पण बाबा ! माझें ह्मणणें तेवढें ऐकून घ्या !

दौल०—फिरून आपलेंच ! बोल ! ऐकूं दे मला काय ह्मणतेस तें ?

गज०—बाबा ! कृपा करून आपण येथून उठून पलीकडल्या खोलींत चला ह्मणजे मी सर्व सांगतें !

दौल०—गजरे ! आजपर्यंत मी तुला शहाणी पोरगी समजत होतों, पण आतां तुझ्यासारखी गाढव कोणी नाहीं अशी माझी खातरी झाली आहे ! पोरी ! येथें आपलीच मंडळी बसली आहे, येथें दुसरें कोणी नाहीं! बोल तुला काय बोलावयाचें असेल तें !

गज०—नाहीं ! बाबा! तुह्मीं मजकारितां उठाच! मी कांहीं तुह्मांस फार वेळ खोळंबून धरणार नाहीं!

दौल०—पोरी ! तूं तर मला अगदीं भंडावून सोडलेंस ! बरें, चल हा आलों !

(दोघें निघून जातात व पडदा पडतो.)

प्र० ३—स्थल पूर्ववत्—राजवाड्यांतील माजघराजवळील एक खोली.

(दौलतराव व गजराबाई येतात.)

दौल०—बोल पोरी ! तुला भय कसलें वाटतें?

गज०—बाबा ! मला भय वाटतें आहे खरें, परंतु तें माझ्या स्वतःच्या बद्दलचें नाहीं! मला आपणांबद्दलचें भय वाटत आहे ! मला आजची रात्र कशी उजाडेल याची काळजी पडली आहे ! बाबा ! आज रात्रीं काय होईल व काय नाहीं, याचा मला नेम सांगतां येत नाहीं, ह्यासाठीं तुह्मीं सावधगिरीनें जपून असावें हें बरें! आपणास आज रात्रीं खचित भय आहेसें मला वाटतें, व जरी तें भय आतां प्रत्यक्ष दिसत नाहीं, तरी आणखी कांहीं वेळानें तरी तें उघड झाल्याखेरीज रहावयाचें नाहीं !

दौल०—ह्मणजे ! याचा अर्थ काय ? तूं हें काय बडबडत आहेस मला कांहीं समजत नाहीं ! तुला असें वाटत असेल कीं, एकदा खरी भयाची गोष्ट मला समजली तर मी डगेन ह्मणून, परंतु तूं असें समज कीं हा **दौलतराव** प्रत्यक्ष **यमधर्मा**पुढेंही दंड ठोकून लढाईस उभा राहण्यास डगणारा नव्हे ! बोल ! तुला काय समजलें असेल तें बोल! असें अर्धें अर्धें बोलणें उपयोगीं नाहीं!

गज०—बाबा ! कसें झालें तरी आपण माझे जनक व मी आपली कन्या, तेव्हां मीच एकादी गोष्ट आपणास सांगावयाची ह्मणजे लहान तोंडीं मोठा घांस घेतल्यासारखा होतो ! पण तसें झालें तरी तुह्मीं माझें समग्र ह्मणणें ऐकून घ्या ! आपणावर एकादें संकट गुदरलेलें माझ्यानें पहावणार नाहीं ह्मणून मी सांगतें ! बाबा ! नुकतीच सुमारें अर्धी एक घटका झाली असेल, मी आपल्या महालांत झोंप यावी ह्मणून पलंगावर पडलें होतें, व नुकता कोठें डोळ्यास डोळा लागूं लागला, इतक्यांत मला एकाएकीं एक भयंकर स्वप्न पडलें. मला वाटलें कीं, एक स्मशान आहे, व त्यांत राखेचा एक ढिगारा पडला आहे. चोंहीकडे सर्व ठिकाणीं शांतता पसरली आहे. अशा वेळीं त्या राखेंतून एकाएकीं जिवंत झालेली **यशवंत**-

रावाची मूर्ति बाहेर पडल्याचा मला भास झाला! ती मूर्ति बाहेर पडल्याबरोबर तिनें एक तरवार का कायसेंसें शस्त्र एकदम सर कन उसपल्यासारखें केलें! मग काय चमत्कार झाला पहा! ती मूर्ति तशीच आकाशमार्गांत उड्डाण करून गेली, ती एकदम या राजवाड्यावर येऊन उभी राहिली, तिनें आज्ञा केल्याबरोबर या राजवाड्याचें कौलार एकदम दुभंग होऊन त्या वाटेनें ती मूर्ति आंत शिरली! त्या वेळची त्या मूर्तीची मुद्रा अद्यापि माझ्या नेत्रांपुढें प्रत्यक्ष दिसत आहे! नेत्र लाल रक्तासारखे झालेले, व भोंवया वांकड्या असून वर चढलेल्या, अशी ती मूर्ति दांत ओंठ खात खात आपण आतां माजघरांत मेजवानीला बसला होतां तेथें गेली, आणि आपण अगदीं गैरसावध असतां तिनें आपली तरवार एकदम आपल्या उरांत भोसकल्याचा मला भास झाला!—

**दौल०**—पोरी! असल्या झाताऱ्या बायकांसारख्या भलत्यान् सलत्याच गप्पा मला सांगतांना तुला लाज नाहीं वाटत? चल, जा जाऊन निज आपल्या खोलींत!

**गज०**—पण बाबा! मी तुमच्या पायां पडतें! माझें सगळें ह्मणणें ऐकून तरी घ्यावयाचें होतें

**दौल०**—बसबस! आतां एक शब्दही ऐकावयाचा नाहीं! तूं मला उगीच त्रास देऊन माझें पित्त नको खवळवूं!

**गज०**—हे दयाघना परमेश्वरा! माझी करुणा आता तुलाच आलीच पाहिजे! देवा देवा! आतां मी काय तरी करावें ते मला तूंच सांग!

(बहादरशिंग येतो.)

**दौल०**—(त्याजकडे पाहून) कां बहादरशिंग तुह्मी पण असे घाबरल्यासारखे दिसतां याचें काय कारण? कां असे संशययुक्त मुद्रेनेंसे इकडे तिकडे पाहतां! या पोरीनें तुह्मांलाही पण भुरळ नाहींना पाडली?

**बहा०**—महाराज! मी आतांच बाहेरच्या देवडीवरून आलों, तों त्या ठिकाणीं मला आपला शूर हवालदार **गुमानसिंग** भेटला. तो आतां नुकताच शहरांत गस्त घालून धांपा टाकीतच आला, व त्याच्या सांगण्यांत **यशवंतराव** जिवंत असल्याची गांवांत दाट बातमी आहे!

**दौल०**—ज्या दुष्टानें ही खोटी बातमी मूळ बाहेर काढिली असेल, त्याची जिव्हा झडो! छे—ही अगदींच गप्प आहे! असें कदापि व्हावयाचें नाहीं! बरें, पण तो आणखी—काय बोलला?

**बहा०**—आणखी कांहीं बोलला नाहीं. पण तो एवढें मात्र ह्मणाला खरा, कीं ही बातमी गांवांत पसरल्यामुळे लोकांत बंडावा उठेल असा रंग आहे!

**गज०**—बाबा! दया करा!—

**दौल०**—पोरी! गप्प बस! मला या बातमींतलें एकसुद्धां अक्षर खरें वाटत नाहीं!—परंतु पोरी! तूं भित्र्यासारखी उगीच घाबरली आहेस त्याच्या योगानें मलाही कसेंसेंच होऊं लागलें आहे!—काय? मी बायकांसारखा भिऊं लागलों काय? छत्! हें असें उपयोगीं नाहीं! ही बातमीच मुद्दल खोटी हेंच खरें!

**बहा०**—सरकार! आपलें ह्मणणें कदाचित् खरें असेल, परंतु गांवांत दाट बातमी पसरली आहे, ह्या गोष्टीचा अवश्य विचार केला पाहिजे!

**दौल०**—ही बातमी मूळ काढिली कोणीं? त्या गुलामाचा अगोदर चांगला समाचार घेतला पाहिजे! थांब गुलामा! हा **दौलतराव** तुझा बाप होऊन लागला आहे! तुझीं मुळेंपाळें खणून काढल्याशिवाय कधींही राहणार नाहीं!—तें असो! पण **बहादरशिंग**! जा अगोदर आणि पहाऱ्यावर दुप्पट असामी उभे असूं द्या! तसेंच तो **अमरशिंगाचा** चाकर **येसबा**—तो कोठें असेल त्याचा शोध करून त्याला मजकडे घेऊन या! त्यानें पठाणाचा वेश घेतला आहे ( बहादरशिंग जाऊं लागतो. )

**गज०**—**बहादरशिंग**! तुम्ही जाऊं नका!—बाबा! मी तुमच्या पायां पडतें! तुम्हांला माझ्या गळ्याची शपथ आहे! जर तुम्हांला आपल्या जिवाची परवा वाटत असेल तर तुम्ही माझें ऐका! आपल्या खोलींत जाऊन आपल्यासभोंवतीचा पहारा हलवूं नका! तसेंच त्या **येसबाला** आपल्या पुढें आणूं नका!

**दौल०**—काय? त्याला पुढें आणूं नको?—मी त्याला आणणारच! जर तो खोटें बोलला असें सिद्ध होईल. व **यशवंतराव** अद्यापि मेला नसून जिवंतच असेल, तर त्याची चांगली खोड जिरविली पाहिजे, कीं कधीं देखिली होती कीं नव्हती!

**गज०**—बाबा! दया करा! दया करा!

**दौल०**—काय? दया करा! कोणावर दया?

**गज०**—मजवर!—आपणावर! त्याजवर!—सर्वांवर दया करा! तुम्हांस वाटतें आहे कीं, मला वेड लागलें आहे व मी पाहिजे तसें बडबडतें आहे! परंतु माझें स्वप्न अगदीं खरें आहे, त्यांत काडीभरही असत्य नाहीं!

**दौल०**—**गजरे**! तुला खचितच वेड लागलें आहे असें मला वाटतें! चल निघ! जा आपल्या खोलींत जाऊन **स्वस्थ** निज! खबरदार आतां आणखी जास्ती बोलून माझें पित्त खवळविशील तर! जा त्या **येसबाला** इकडे पाठवून दे! तो असाच कोठें तरी असेल! चल! कां जातेस कीं नाहीं?

**गज०**—बाबा! मी तुमच्या पायां पडतें! हवें तर तुम्हांपुढें नाकही घासतें, परंतु तुम्ही **येसबास** भेटावयाचें करूं नका! **यशवंतराव** मेला हेंच खचित, आणि तो जिवंत आहे ही उगीच गप्प आहे! आणि आपणास आसपास भ्यावयाचें तो कांहीं कारण नाहीं! किंवा कदाचित् जर कांहीं असलेंच, तर त्याचा **येसबा**कडे कांहीं दोष नाहीं! तो निरपराध आहे!

**दौल०**—मूर्ख नाहीं तर! कारटे! तूं अजूनही जात नाहींस? त्या गचाळ स्वप्नानें तुझें माथें फिरून गेलें आहे! चल जा जाऊन आपल्या खोलींत निज, आणि सकाळीं हा सगळा दंगा जिकडे तिकडे शांत झाल्यावर मजकडे ये!—हं! चल! आतां आणीक बोलशील तर संभाळ!

**गज०**—तें खरें! पण बाबा! मी कांहीं तुमच्या वाइटाची गोष्ट तुम्हांस सांगत नाहीं! तुमच्या—( दौलतराव तिजवर हात उगारतो त्यामुळें थांबून) देवा! देवा! माझें नशीबच फुटकें! देवा! हें मीं काय केलें? देवा! माझ्या बाबांचें संरक्षण कर! निरपराध प्राण्याचें संरक्षण करणाराही तूंच आहेस! हाय हाय! **गजरे**! कांहीं जरी गोष्ट झाली, तरी तुझें नशीब फुटकें तें फुटकेंच! हाय हाय! ( रडत रडत निघून जाते.)

**दौल०**—या पोरीच्या ह्मणण्याचा मला बरोबर

अर्थच समजत नाहीं! बहादरशिंग ! चला अगोदर जान् त्या येसबाला मजकडे पाठवून द्या ! मी आपल्या थोरल्या महालांत आहे ! आणखी तावडतोब पहारा मात्र दुप्पट करा !

( दोघे निघून जातात. )

## प्र० ४—राजसबाईच्या महालाबाहेरील दिवाणखाना.

( अंधारांत यशवंतराव एकटाच उभा आहे. )

**यश०**—( आपणाशीं ) अरे ! इतका वेळ वाड्यांत खालीं उत्सवाची गर्दी ऐकूं येत होती ती इतक्यांत एकाएकीं बंद कशानें पडल्यासारखी झाली ? अद्यापि मध्यरात्रींचा दुसरा डंकाही पडला नाहीं, असें असतांही उत्सव बंद पडल्यासारखा झाला आहे ह्याचा काय बरें अर्थ ? कांहीं समजत नाहीं ! असो. समजेल काय असेल तें ! परंतु ह्या वेळीं माझ्या चित्तास अस्वस्थता वाटूं लागली आहे! हें लक्षण कांहीं नीट दिसत नाहीं! (इतक्यांत जिन्यांत पाउलें वाजलेलीं ऐकूं येतात. तीं ऐकून आपणाशीं ) अरे! ह्या अंधारांत कोणी लोक येताहेतसें वाटतें ! पण हे शत्रु कीं मित्र कांहीं कळत नाहीं! असो, कोणीही असोत ! शत्रूचे लोक असले तर मी इतक्या अपरात्रीचे वेळीं येथें अंधारांत राहिलेला त्यांच्या दृष्टीस पडलों असतां त्यांस एकादेवेळीं भलताच संशय वाटणार आहे! याकरितां येथेंच खालीं भुईवर पडून झोंप लागल्याचें सोंग घ्यावें हें बरें ! तसेंच ही सुरी व तरवार हींही झांकून घ्यावींत ! ( तीं झांकून घेऊन भुईवर निजतो व मोठ्यानें घोरूं लागतो. )

( बहादरशिंग व दोन पहारेकरी येतात. )

**बहा०**—कायरे सठवाजी ! वाड्यांत तुला येसबाचा कोठेंही शोध लागला नाहीं ?

**सठवा०**—न्हाय ! ये पाऱ्यावरच सदुभाऊ येसबाला म्हाराजांनीं राजसबाईकड पाटिवलं म्हणून म्हंगाल व्हत, तवां तकडच जाऊनशीं सोध करावा ह्ये बरं !

**बहा०**—असें खरें ! ( दुसऱ्या पहारेकऱ्यास ) महादजी ! दिवाणखान्यांत तर अगदीं अंधार पडला आहे. ह्यासाठीं तुम्हीं आपल्या कंदिलांतला दिवा अमळ मोठा करा!

( पहारेकरी तसें करितो. )

**यश०**—( तें ऐकून आपणाशीं ) हे शत्रूचेच लोक आहेत ह्यांत संशय नाहीं. ह्यांच्या दृष्टीस मी पडलों तर ते मला उठविल्याशिवाय रहाणार नाहींत! ह्यांच्या हातांत दिवा आहे, तो माझ्या डोळ्यापुढें धरला तर डोळे दिपतील तें उपयोगीं नाहीं. ह्यासाठीं कुशीवर वळून डोळ्यांवर हात ठेवून निजावें हें बरें!

( तसें करितो व फिरून घोरूं लागतो. )

**बहा०**—( समोर पाहून ) अरे ! राजसबाईच्या महालाचें दार तर बंद केलेलें दिसतें !

( इकडे तिकडे पहातो,इतक्यांत यशवंतराव निजलेला त्याच्या दृष्टीस पडतो.) अरे हा रे कोण? त्याच्या जवळ दिवा नेऊन ) अरे ! हाच तो पठाणाचा वेश घेतलेला येसबा ! महादजी ! पहातां काय, ह्याला करा जागा !

(महादजी त्यास हालवितो. यशवंतरावाचें घोरणें चालूच आहे. )

**महा०**—( सठवाजीस ) काय व नाईक ! ह्येला तर सवास्त झ्वाप लागलीया ! जनु जसा कुंबकरन !

**सठवा०**—व्हय! असं खरं ! पन ह्यो आज लई दूरशी आलाया म्हनून दमला भागला असलसं मला वाटतया ! पन स्ये राव कायबी

असू ! त्येला उटवाच ! ( महादजी त्याला हालवितो. कांहीं वेळानें यशवंतराव कांहींसा जागा झाल्यासारखा होऊन डोळे चोळूं लागतो. )

महा०–अर ये भल्या गिरस्ता ! ऊटऊट ! तुला तकड ह्मारान बलावयाती !

यश०–( अर्धा जागा झाल्याप्रमाणें ) आं–कोन–ह्मा–! ( पुनरपि घोरूं लागतो. )

बहा०–अरे हें असें उपयोगी नाहीं ! ह्याला नीट उठवून बसवा ह्मणजे हा जागा होईल! ( दोघे तसें करितात, यशवंतराव हळूहळू जागा झाल्यासारखें करून डोळे उघडतो. )

यश०–आं ! आन् तुमीर कोन ! मला वाइच निजूं द्या कीं ! ( फिरून निजूं लागतो. )

बहा०–होय! अंमळशानें मग खुशाल निज! ऊठ अगोदर महाराजांनीं तुला बोलाविलें आहे!

यश०–( गडबडीनें ) काय? जी, ह्मा–ह्माराजांनीं (डोळे चोळीत चोळीत उठतो.) जी! माफ करा! आज लईच कंबर दुक करतीया ह्मणून जरा झोंपलों व्हतों! पन जी चला ह्मराजाप!

बहा०–( पहारेकऱ्यांस ) हं चलारे याला थोरल्या महालांत घेऊन चला ! मी इतक्यांत देवडीवर जाऊन येतों ! ( सर्व जातात. )

## प्र० ६–दौलतरावाचा थोरला दिवाणखाना.

( दौलतराव एकटा सचिंत बसला आहे. )

दौल०–( आपणाशीं ) काय करावें ! ह्या वेळीं माझ्या मनाची काय स्थिति झाली आहे ती एका चित्रगुप्तावांचून दुसऱ्या कोणास कळावयाची नाहीं ! माझें अंतःकरण क्रोध व शंका यांहीं कसें क्षुब्ध होऊन गेलें आहे ! कांहीं सुचत नाहीं ! म्यां दुष्टानें पाप केलें आहे तें ह्यावेळीं माझ्या दृष्टीपुढें मूर्तिमंत उभें राहिल्यासारखें होऊन माझ्या अंतरात्म्यास चोंहीकडून विंचू लागल्यासारखें मला झालें आहे ! हर ! हर ! आतां माझ्या दुष्कर्माचा मला पश्चात्ताप वाटतो! पण त्याचा आतां काय उपयोग? तेव्हांच पश्चात्ताप झाला असता तर सर्व कांहीं नीट झालें असतें! देवा! देवा! मी किती दुष्ट ! प्रत्यक्ष आपल्या मातापितरांचा घात करून बंधुद्वेष संपादिला, व त्याच्या राज्यांत माझें कांहीं चालेना तेव्हां ह्या महात्म्या प्रतापसिंह राजास शरण आलों, व यानें उदारपणानें माझें रक्षण केलें असतांही म्यां कृतघ्नानें त्याच्याशीं विश्वासघात करून त्याचा घात केला ! व अनेकदां त्याच्या सद्गुणी पत्नीच्या पातिव्रत्याचा नाश करून आपली पापवासना तृप्त करून घेण्याचे प्रयत्न केले व अद्यापिही करीत आहे ! एवढ्यानेंच माझीं दुष्कर्में संपलीं नाहींत तर म्यां पापानें तिच्या निरपराध प्रिय पुत्राचा छळ करून त्याच्या प्राणनाशाविषयीं शेंकडों प्रयत्न करून सरतेशेवटीं याचा घात केला! हाय हाय!–परंतु आतां या गोष्टीबद्दल विचार करून कांहीं फळ नाहीं! त्यांबद्दल यमधर्मानें मला नरकाच्या खाईंत लोटिलें तरी चिंता नाहीं. जी गोष्ट केली ती केलीच! ती कांहीं आतां परत येत नाहीं!–अरेरे ! पण काय करूं ? या वेळीं ह्या सर्व देहास पण कसा कंप सुटलासें मला वाटत आहे !

( यशवंतराव व पहारेकरी येतात.)

दौल०–( यशवंतरावास पाहून ) चल! ये गुलामा! असा पुढें ये! रहा पाहूं माझ्यापुढें उभा! माझें ह्मणणें नीट ऐकून घेऊन बोल! खबरदार खोटें बोलशील तर! माझ्याशीं गांठ आहे संभाळ ! खरें बोल ! तूं कोण आहेस ?

यश०—( आश्चर्यानें ) आं ? काय ?—

दौल०—कां ? असा थांबतोससा?—अरे हा गोंधळला आहे खचित! कां रे लुच्चा! तुला आश्चर्य कसचें वाटतें ? माझें ह्मणणें तुला समजलें कीं नाहीं !

यश०—जी ! म्हाराज ! मी सरकारच्या पायाचाच नोकरनू आपनास माजा संशे आला ह्मनूनशी मला आचार्य वाटतं इत्तंच!

दौल०—ठीक आहे! माझें ह्मणणें नीट ऐकून घे आणि मला सांग कीं, तूं दिसतोस तसाच आहेस कां दुसरा कोणी आहेस ? खोटें बोलशील तर पहा आपला विचार कर, येथल्या येथेंच तुला देहांत शिक्षा देईन ! कधीं सोडणार नाहीं ! तूं येथें आलास आणि यशवंतरावास आपल्या हातानें ठार मारलें ह्मणून मला खबर सांगितलीस, परंतु आतां खरें सांग, तो यशवंतराव अद्यापि जिवंत नाहीं काय ?

यश०—(आश्चर्यानें ) येस्वंतराव जिता हाये ह्मंगतां ह्मजी ह्येचा काय अर्थ? येस्वंतराव जिता हाये ह्मंगतां ?

दौल०—गुलामा! माझेंच ह्मणणें फिरून बोलून दाखवितोस? बोलतोस कीं नाहीं खरें, कां आतांच्या आतां करूं ठार!(तरवार उपसतो).

यश०—(धैर्यानें) जी ह्माराज! ह्यो बंदा गुलाम हजर हाये ! ह्येला खुशाल मारा ! माजं ह्मननं आपनाला खोटं वाटतया ह्मनून आपुन ह्मंगतां ह्येनंच माज्या काळजाला ननुं घराच पडलाया! काय सांगावं ह्माराज! माजी तरवार ह्ये येस्वंतरावाच्या बरगडांमंदी इत्ती शिरली व्हती नू ह्येनं परान सोडला! इतक्याउपर सरकारासनीं माजं ह्मननं खोटें वाटत असल, तर ही माझी छती मी उगडी करतोनू ह्येमंदी आपली तरवार खुशाल भोकसा ! ह्मनत्येत न्हाईं खऱ्याला कसचं मरन ?

दौल०—हें असलें भागुबाईसारखें मारणें मी कदापि करणार नाहीं! ( तरवार परत म्यानांत घालितो. ) तुझ्या बोलण्याचा निकाल आतां इतक्यांतच व्हावयाचा नाहीं ! रखवालदार! माझें ह्मणणें नीट ऐकून घ्या ! हा जिकडे जाईल तिकडे तुह्मीं ह्याच्या मागोमागच असा व जर हा तुमची नजर चुकवून तुमच्या हातून निसटून जाऊं लागेल तर तेथल्या तेथेंच याचे तुकडे करा! सोडूं नका!

यश०—जी ! माजं तुमाला व्हावं असल तसं करा, मी ह्येला न्हाईं ह्मनत न्हाईं ! पन माजा आपनास येक अरज हाये, ह्यो इत्ताच कीं, जर कदीकाळीं तुमाला यस्वंतराव जिता हाये ह्मणून समजलं, किंवा ह्ये सतरूचं त्वांड आपुन पायलं तर तुमी माजा परान घेन्याला मागंफुडं नका करूं ! मी ह्येला कबूल हाये !

दौल०—ठीक आहे !—हं चला आतां ह्याला बाहेर घेऊन जा ! परंतु संभाळा ! येथेंच असे बाहेरल्या अंगाला असा ! मला कदाचित् तुह्मांला हाकबीक मारावी लागेल !

पहा०—जी ! ( यशवंतरावासहित निघून जातात. )

दौल०—तिकडे कोण आहे ? बहादुरशिंग!

( बहादुरशिंग येतो. )

बहा०—जी सरकार !

दौल०—बहादुरशिंग ! पहाऱ्याची व्यवस्था बरोबर ठेवली ?

बहा०—सरकार ! आज्ञेप्रमाणें सर्व बंदोबस्त यथास्थित ठेवला आहे !

दौल०—फार! उत्तम! बरें बहादुरशिंग! आतां च्या आतां तुह्मी राजसबाईकडे जा, आणि

तिला मजकडे घेऊन या ! (बहादरशिंग जातो)

दौल०—(आपणाशीं) काय? माझा शत्रु तो दुष्ट **यशवंतराव** अद्यापि जिवंत असेल काय? छे! ह्या गुलामा **येसवाच्या** भाषणावरून तो प्रामाणिक असावा असें मला वाटतें. तथापि माझ्या मनास स्वस्थता वाटत नाहींशी झाली आहे! याचें काय कारण असेल तें असो! जर हा **येसवा** लबाड ठरून **यशवंतराव** अद्यापिही जिवंत असेल, तर मग काय? माझ्या फजितीस तर अंतच नाहीं! एवढा वेळपर्यंत माझ्यासारखा सुखी कोणी नाहीं असें मी मानीत होतों, परंतु जर **यशवंतराव** जिवंत असेल तर माझ्यासारखा दुःखी प्राणी ह्या त्रिभुवनांतही दुसरा कोणी नाहीं असेंच ह्मणणें प्राप्त आहे! माझें आज एवढें ऐश्वर्य आहे, परंतु तें काय पाण्याच्या बुडबुड्यासारखें आहे असेंच ह्मणावें लागेल! तो बुडबुडा केव्हां फुटेल याचा कांहीं नेम नाहीं! इतका वेळपर्यंत मी आपणास सार्वभौमराजा असेंच मानीत होतों, परंतु हा माझा शत्रु अद्यापिहि जिवंत असेल तर हें राज्य मला कसचें पचतें? हाय हाय! काय करावें? आज माझा जीव माझ्यावर नाहीं!—ही मूर्ख **राजसबाई** जर मला वश होती, व तिच्याशीं माझा विवाह होता तर मग मला ह्या **यशवंतरावा**पासून कांहीं भिण्याचें कारण न राहतें! परंतु काय करूं! ही मूर्ख—हिच्या मनांत अद्यापि मी सांगितलेली गोष्ट नाहीं भरत, त्यामुळे माझा कांहीं इलाज चालत नाहीं!—असो! कांहीं चिंता नाहीं! जी गोष्ट युक्तीनें व मनमिळवणीच्या योगानें साध्य होत नाहीं, ती गोष्ट बळजोरीनेंच साधून घेणें भाग आहे!—आजच दोन प्रहरीं मी तिच्यावर बळजोरी करण्याच्या विचारांत होतों, परंतु त्यावेळीं तिचा तो आवेश व तें वीराप्रमाणें वर्तन हीं पाहून माझा जीव दबल्यासारखाच झाला होता, परंतु आतां तसें होऊं देतां उपयोगीं नाहीं! मोक्ष कीं मोक्ष तो एकदम कळलेला बरा! मी **बहादरशिंगास राजसबाई**कडे पाठविलें आहे त्याप्रमाणें ती आली तर ठीकच आहे. नच येईल तर स्वतः तिच्या मंदिरांत जाऊन तिच्या पातिव्रत्याचा भंगच केला पाहिजे, त्याशिवाय इलाज नाहीं! (पडद्याकडे पाहून) कोण आहेरे तेथें? (एक शिपाई आंत येतो त्याजकडे पाहून) मागील चौकांत आपले उपाध्येबोवा कोठें असतील त्यांना आतांचे आतां घेऊन ये! (शिपाई सलाम करून जातो व उपाध्ये बोवास घेऊन येतो.)

दौल०—(उपाध्यास) कां भटजी! तुह्मांला कशाकरितां बोलाविलें समजलांत?

उपा०—सरकार! आपण सांगितल्याशिवाय आह्मांला कशानें कळणार? आह्मीं सर्वज्ञ थोडेच आहोंत!

दौल०—गप्प बसा! फार बडबड करूं नका! मी तुह्मांस बोलाविलें आहे एवढ्याचकरितां, मी करणार आहें **राजसबाई**शीं विवाह—

उपा०—(आश्चर्य पावून) काय ह्मटलें महाराज **राजसबाई**शीं विवाह!

दौल०—गप्प बस भटुरड्या! फार बोलूं नको! तुला सांगतों तेवढें मुकाट्यानें ऐकून घे! माझ्या बोलण्यांत मध्यें हूं कीं चूं करितां उपयोगीं नाहीं!

उपा०—(कांपत कांपत हात जोडून) जसें महाराजांच्या मनांत असेल तसें! (खालीं मान

चालून बसतो. )

दौल०—हं ! आतां ठीक बोललेत ! भटजी बोवा ! माझ्या मनांत राजसबाईशीं आतांच्या आता विवाह करावयाचा आहे !

उपा०—( अधिक आश्चर्यानें ) कसें ह्मटलें महाराज? आपण आतांच्या आतां विवाह लावणार? हें होईल तरी कसें? आज विवाहाचा मुहूर्त मुळींच नाहीं ! पाहिजे असेल तर मी आपणास पंचांग आणून दाखवीन !

दौल०—बस बस! तुमचीं पंचांगें नेऊन घाला चुलींत ! त्यांची मला जरूर नाहीं ! मी करणार आहें प्रीतिविवाह, त्या वेळीं तुह्मी साक्षी असा ह्मणजे झालें ! मला तुमच्या मंत्रांत्रिंत्रांची कांहीं जरूर नाहीं ! मी तिच्याशीं आतांचे आतां विवाह करणार !

उपा०—आपण ह्मणतां तें सर्व खरें, पण आज कुयोग आहे, व हा कुयोग मृत्यु देणारा आहे, ह्यासाठीं आपण ही गोष्ट करावयाचें मनांत देखील आणूं नये !

दौल०—गुलामा ! थेरड्या ! तुला एकदा बजावूनना सांगितलें, मी कुयोग वगैरे कांहीं जाणत नाहीं ह्मणून ! मग उगीच बडबड फारशी लावतोस? आणखी काय ह्मणतोस? हा कुयोग मृत्यु देणारा आहे ह्मणून? लुच्चा थेरड्या ! हा कुयोग या—या—दौलतरावाला मृत्यु देणार काय? हरामखोरा ! माझें अन्न खाऊन माझ्याच विरुद्ध भाषण करितोस, ह्यास्तव हा कुयोग तुला मृत्यु देईल एवढें मात्र खरें ! समजलास ! फिरून असले शब्द बोलशील तर खबरदार ! संभाळ ! गांठ माझ्याशीं आहे ! फार बोललास तर येथल्या येथेंच लोळवीन!

उपा०—( मनांतल्या मनांत चरफडत ) हा दुष्टा ! आज तूं या महासाध्वी राजसबाईची विटंबना करावयास सिद्ध झाला आहेस, व तशांतून मजसारख्या ब्राह्मणाची अवहेलना ही करावयास चुकला नाहींस, तर हा कुयोग तुला बाधणार हें खचित!—मघां मी सहज समुद्राकडे पहात बसलों होतों, त्यावेळीं मला कांहीं दुश्चिन्हें जाणवलीं, तीं कांहीं खोटीं नाहींत ! ( अंमळ शांत होऊन ) असो. त्याशीं आपणास काय करावयाचें आहे ? ज्याचें कर्म तो भोगील ! आपला धर्म त्यास समजुतीच्या दोन गोष्टी सांगावयाचा तो आपण केला ! आतां कांहीं झालें तरी त्याचा आपणाकडे दोष नाहीं !

दौल०—कां भटुरड्या ! मीं ह्मटलें तें नीट समजलास ?

उपा०—( हात जोडून ) महाराज ! आपलें ह्मणणें बरोबर समजलों ! आपला एकदम झालेला निश्चय पाहून आश्चर्याच्या भरांत माझ्या मतीस भ्रंश झाला यांत संशय नाहीं ! मी आपल्या मनांत फिरून गणित करून पाहिलें त्यावरून मला वाटतें कीं, आतांचा हा योग फारच चांगला आहे, व ह्यावेळीं आपण जी गोष्ट करावयाचें मनांत आणिलें आहे, ती गोष्ट आपण अवश्य करावी, ह्मणजे तिच्या योगानें आपण शांत[1] व स्वस्थ[2] व्हाल यांत संशय नाहीं !

दौल०—हां ! आतां ठीक बोललास ! आतां कसा ताळ्यावर आलास !

( राजसबाई येते. )

---

१. 'शांत' शब्द श्लेषात्मक आहे व त्याचे अर्थ 'समाधानयुक्त,' पक्षीं 'मृत.' २. 'स्वस्थ' हाही शब्द श्लिष्ट आहे. ह्याचा एक तर अर्थ स्पष्ट आहे. दुसरा अर्थ 'स्वर्गस्थ.'

राज०—( आपणाशीं ) काय चमत्कार असेल तो असो! माझ्या ह्या दुःखावस्थेंत मला काय सुखप्राप्ति होणार असेल ती असो! परंतु मघांपासून माझा डावा डोळा एकसारखा लवत आहे! कांहीं केल्या रहात नाहीं! देवा! म्यां ह्यातारीनें आतां सुखप्राप्तीची आशा करणें व्यर्थ नव्हे काय? देवा! या ह्मातारीचे प्राणपति यमसदनास गेले, माझ्या सतीगमनास ह्या दुष्टानें विघ्न केलें, तेव्हांच माझ्या या जगांतील सर्व सुखांचा अंत झाला नाहीं काय? देवाधिदेवा! तेव्हांपासून हा कालपर्यंत मी मंदभागिनी एकसारखी दुःखांचाच अनुभव घेत नाहीं काय? देवा! माझा प्राणाप्रमाणें प्रिय असा पुत्र तोही त्या दुष्ट दौलतरावानें मारेकऱ्यां करून मारविला तेव्हां आतां माझ्या जिवास समाधान उत्पन्न होऊन मला यत्किंचित् तरी सुख होणार तें कोठून?-(अंमळ थांबून आपणाशीं) बरें, पण मघांशीं त्या येसबानें अद्यापि माझा पुत्र जिवंत आहे ह्मणून नाहीं का सांगितलें?—होय! होय! हे दीनवत्सला वैकुंठाधिपते! मीच चुकून भलतेंच बोललें ह्याची क्षमा कर! मला या जगांत आतां सुखप्राप्तीची आशा राहिली नाहीं ह्मणून मीं ह्मटलें खरें, परंतु देवा! जर येसबानें सांगितल्याप्रमाणें माझा पुत्र खराच जिवंत असून मला येऊन भेटणार असला, तर मात्र अशा स्थितीतही अखंडानंदाचा अनुभव मला घडेल असेंच मला वाटतें!—तर काय? आज हे मला शुभ शकुन वाटत आहेत, ह्यांवरून मला माझा प्रियपुत्र भेटणार काय? असो. काय प्रकार होणार तो समजत नाहीं. परंतु आज माझ्या जिवास जो कांहीं उल्हास वाटत आहे त्याचें मला वर्णनही करितां येत नाहीं! आज मला ह्या दुष्ट दौलतरावानें बोलावणें पाठविलें आहे, व वास्तविक ह्मटलें ह्मणजे मी दुष्टाचें तोंडही कदापि पहावयाची नाहीं, असें असतां माझें हृदयच माझ्या जड देहास जणो पुढें लोटीत आहे! काय असेल तें असो! **नारायणा!** माझी काळजी तूंच वहा ह्मणजे झालें! (पुढें येते.)

दौल०—( राजसबाईस पाहून आपणाशीं ) अहाहा! ही सुंदरी आज सात वर्षेपर्यंत एकसारखी क्लेशच अनुभवित आहे तथापि तिची मूर्ति माझ्या नेत्रांस किती आनंद देत आहे कांहीं सांगतां येत नाहीं! काय करावें? ही मूर्ख **राजसबाई**—हिचीं आजपर्यंत इतकीं आर्जवें केलीं, परंतु ही मला अद्यापि वश होत नाहीं! हायहाय! हिनें तर मला अगदीं वेडच लावून सोडलें आहे. मी ह्या सर्व **कोंकण**पट्टीचा सार्वभौम राजा, मला वाटलें तर ह्या सर्व देशांतील **रंभा, मेनका, तिलोत्तमा** इत्यादिकांसही मागें टाकणाऱ्या अशा सर्व अद्भुतरूपसुंदरी स्त्रिया मी आपल्या इच्छेच्या दासीही करून ठेवण्यास समर्थ आहें, परंतु काय सांगावें, तशा सर्व अद्भुतरूपसुंदरी स्त्रियाही मला या **राजसबाई**पुढें कशा अगदीं तुच्छ वाटतात! आणि ही तर माझ्या वाऱ्यासही उभी रहात नाहीं! मी आज सात वर्षेपर्यंत हिच्या पायधरण्या करीत आहें, परंतु हिनें अद्यापि माझी डाळ ह्मणून शिजूं दिली नाहीं! काय करूं? ही बऱ्या बोलानें वश होत नाहीं, तर हिच्यावर एकदम बलात्कार करावा ह्मणून वारंवार मनांत येतें, परंतु

हिच्या नुसते मुखाकडे पाहिले कीं, धैर्यस्तंभास एकदम धक्का बसल्यासारखा होऊन माझें पाऊल माझ्या इच्छेविरुद्धच आपोआप मागें जातें! हा चमत्कार नव्हे काय? अरे, नुकतेंच मीं **बहादरशिंगास** हिला मजकडे बोलावून आणण्यास सांगितलें त्यावेळीं माझी खवळलेल्या सिंहाप्रमाणें जी उद्दाम वृत्ति झाली होती, ती हिच्या दर्शनमात्रेंकरून एका क्षणांत कोणीकडच्या कोणीकडे नाहींशी होऊन तिच्या चरणावर पुनरपि श्वानाप्रमाणें पडून आणीक एक वेळ हिचीं आर्जवें करण्यास माझें मन धांव घेतें आहे! कांहीं इलाज नाहीं!—असो. कांहीं चिंता नाहीं. आणखी एकवेळ तिची पायधरणी करून पहातों तेवढ्यानें काम झालें तर ठीकच, नाहीं तर आतां ही शेवटली वेळ, मी तिजवर बलात्कार केल्याशिवाय कदापि रहावयाचा नाहीं हाच निश्चय आहे! (आसनावरून उठून राजसबाईकडे येतो, व तिच्या चरणावर मस्तक ठेऊन) हे सुंदरी! अशी क्रूर होऊं नको! एकवेळ या—या—दीनदासावर करच कृपा! अहाहा! प्राणप्रिये! ह्यावेळीं तुझ्याविषयीं मला काय वाटतें आहे तें मला बोलूनही दाखवितां येत नाहीं!

**राज०**—(रागानें पलीकडे सरून दुसरीकडे तोंड करून उभी राहते.)

**दौल०**—(खालीं पडल्या पडल्याच)

पद.

सुंदरी. सुखकर तुझें ध्यान. ध्रु०
अमित कष्ट हे पावलीस जरि, रम्यचि तूं तरीनाण. १
स्मरणें तुझिया प्रफुल्ल होतें, माझें चित्त म्लान. २
दर्शनमात्रें तटतटती मम, अंगें न राही भान. ३
येउनि सत्वरि आलिंगुनि मज, दे अधरामृतपान. ४
तव रतिसौख्यापुढें तुच्छची, स्वर्गसुखाचा मान. ५
तत्पांतःकरणातें माझ्या, तूंचि एक शांतिनिधान. ६
अंकावरती आरोहूनी, शोभा त्यातें आण. ७
मत्सह राज्योपभोग घेईं, न मला इच्छा आन. ८
प्रेमरसीं तव मग्न करीं मज, देइं तुं हें मजदान. ९
तूं रति, मी स्मर, योग्य परस्पर. ये! न धरीं अभिमान. १०
तव सौख्याविण राज्यहि हें मज, वाटतसे सखि रान. ११

सुंदरी! अद्यापि तूं आपला अभिमान सोडीत नाहींस अं! सुंदरी! बोल! बोल! हा पहा या सार्वभौम राजाची विनवणी ऐकण्याचा शेवटचा प्रसंग आहे, तर ह्यावेळीं तूं माझा अपमान करूं नको! मी कांहीं तुझ्या वाइटाची तुला गोष्ट सांगत नाहीं चांगल्याचीच सांगतों. यासाठीं तूं यावेळीं हा आपला अभिमान सोडच! तूं मनांत समजत असशील कीं मी तुझी थट्टाच करितों आहें, वस्तुतः मासें तुझ्यावर प्रेम नाहीं तर तूं असें समजूं नको! प्राणप्रिये! तूं जर मला प्रेमालिंगन देण्यास कबूल होशील, तर मी आपणास अत्यंत भाग्यवान् समजेन, व जोंपर्यंत ह्मणून माझें जीवमान आहे तोंपर्यंत तुझ्या प्रेमांत लवमात्रही अंतर पडूं देणार नाहीं! ही गोष्ट—हा दीपांतील **अग्निनारायण** व हा परम पवित्र ब्राह्मण—यांच्या साक्षीनें तुजला निवेदन करितों आहें!

**उपा०**—(मनांत) दुष्टा! असली पापाची गोष्ट करावयास प्रवृत्त होऊन मजसारख्या ब्राह्मणाला साक्षी करितोस काय? धिक्कार असो तुला! तूं चांडाळ आहेस!

राज०—( शांतपणें ) दौलतराव ! मला फिरून फिरून तेंच तेंच चावटपणाचें भाषण बोलतां येत नाहीं! माझा कृतनिश्चय काय आहे तो मीं तुला एकवार कळविलाच आहे, त्यांत ह्मणून फरक बिलकुल व्हावयाचा नाहीं !

दौल०—राजसबाई ! तूं कुध्यां होऊन आपल्या पायांवर धोंडा पाडून घेते आहेस, तुला वेड तर नाहीं लागलें ?

राज०—होय ! मला वेड लागलें आहे! आणि ह्मणूनच माझ्या निश्चयांत अंतर व्हावयाचें नाहीं !

दौल०—( रागानें ) दुष्टे! तूं मला विनाकारण चिथावूं नको! माझें यावेळीं कोपावेशानें मस्तक कसें अगदीं फिरून गेलें आहे, ह्या, साठीं मुकाट्यानें बऱ्या बोलानें तूं मला वश हो, नाहीं तर पहा ह्याचा फार वाईट परिणाम होईल !

राज०—होईल तर होवो बिचारा ! माझा ह्मणून निश्चय ढळावयाचा नाहीं ! दौलतराव ! तुला असें वाटतें काय कीं ज्या दुष्ट अधमानें माझ्या प्राणप्रिय पतीचा घात केला, त्या दुष्ट अधमाशीं विवाह करण्यास मी कबूल होइन ?

दौल०—राजसबाई ! अजून तरी वेड टाकून दे, आणि अशी मूर्खासारखी वागूं नको ! मला तुझ्या मनांतला अखेर निकाल काय तो एकदा कळूं दे !

राज०—असें आहे तर सांगतें ऐक ! हे गोब्राह्मणप्रतिपालका वैकुंठाधिपते नारायणा ! तसेंच अहा माझे छायारूपानें वास करणारे प्राणपती ! मी आपला कृतनिश्चय ह्या दुष्टास बोलून दाखवितें इकडे अवधान असावें !—या दुष्ट, अधम, विश्वासघाती, पातक्याबरोबर विवाह करण्यास मी कदापि राजी व्हावयाची नाहीं, परंतु जर झालेंच तर तुह्मीं त्या विवाहमंडपांतून आपलीं पवित्र अधिष्ठानें काढून टाकून त्या ठिकाणीं यमाच्या भयंकर दूतांची योजना करा, व त्यांजकडून या दुष्ट अधम पातक्यास व मज अधम नीच पातकिनीस बांधवून नरकाच्या खाईंत लोटून द्या! आह्मां उभयतांच्या अंगास विंचू लावून आह्मांस तप्त तेलाच्या कढईंत उभे करून विषानें माखलेल्या व तीक्ष्णखड्गांनीं खचित अशा चाबकांनीं एकसारखा मार द्या ! तसेंच ह्या दुष्ट अशुभ लग्नाच्या सोहळ्यास आरंभ झाला कीं, लागलीच प्रचंड विद्युत्पातानें आमच्या सर्व रंगाची बेरंग करून टाका, किंवा गृध्र, काक इत्यादि पक्ष्यांच्या चोंचींनीं आमचे नेत्र फोडून आह्मांस अंधकारांत पाडून आह्मांस अक्षय नरकवासांतच राहूं द्या ! ! !

दौल०—( त्वेषानें ) हे असलें ढोंग मजपुढें कांहीं चालावयाचें नाहीं!—कोण आहेत रे तिकडे चाकर ?—

( चाकर आंत येतात. )

चाक०—काय आज्ञा आहे महाराज ?

दौल०—अरे पहातां काय, ओढा हिला आणि माझ्या पुढें उभी करून धरा अंतरपाट न् काय ?

( चाकर तिला धरावयास येतात. )

राज०—अरे बाबांनो ! मी तुमच्या पायां पडतें, माझ्या अंगास हात लावूं नका ! देवा ! नारायणा ! अरे, या संकटसमयीं तरी माझी लज्जा रक्षण कर ! देवा ! देवा ! ह्यावेळीं जर माझा प्रियपुत्र ह्या ठिकाणीं असता तर तो खचित माझें रक्षण करिता!

हायहाय !—देवा ! घात झाला ! देवा ! देवा ! आतां मी काय करूं ?

( यशवंतराव महादजी व सठवाजीसहित येतो. )

यश०—सरकारांनीं मला बोहिलं ? मला येस बाला बोहिलं व्हय सरकार ? सरकार ! बंद्या चाकराला का होकम हाये ?

दौल०—गुलामा! तुला पुढें पुढें करायाला कुणीं सांगितलें ? चल निघ येथून? मी तुला नाहीं बोलाविलें !

राज०—हे दयाळू उदार गृहस्था ! कृपा करून मला या संकटांतून मुक्त कर ! देव तुझें कल्याण करील !

यश०—अव ह्यापरतापी सरकार ! हिला लईच दुक झालया, हुनशीं हिंप दया करा!—

दौल०—हरामखोरा! तुला मध्यें तोंड घालावयास कोणीं सांगितलें? खबरदार अधिक बोलशील तर ! चल येथून एकदम निघून !

यश०—सरकार ! पायां पडतों ! आपनाला ह्य बगूनशी जनुं भडभडतया ! ( गुडघे टेकून त्याच्या पायां पडतो. )

दौल०गुलामा ! आग लागो तुझ्या तोंडाला ! कां जातोस कीं नाहीं येथून निघून ?

यश०—जातों सरकार! पन हिला माफ करा ! ह्माराज! यवढं आपुन म्हाईं म्वाईं नका ह्मनूं! ( दौलतरावाचा शेला धरतो. )

दौल०—चल निघून येथून दुष्टा ! ( त्याला मुष्टिप्रहार करितो. )

यश०—हं हं ! तर मरच दुष्टा ! ( उठून तरवार उपसून दौलतरावास मारण्याच्या इराद्यानें हुगारतो, इतक्यात दौलतराव त्याच्या हातांतून ती हिसकून घेतो. )

दौल०—असं काय ? कायरे विश्वासघातक्या ! आतां सापडलास कीं नाहीं माझ्या तावडींत? ( चाकर यशवंतरावास मारण्याकरितां तरवारी उपसतात, त्यास )हां ! खबरदार ! त्याला इतक्यांतच मारावयाचें नाहीं ! माझा सूड एवढ्यानेंच शांतावयाचा नाहीं, मी याचा याहूनही अधिक सूड घेईन ! कायरे विश्वासघातक्या हरामखोरा ! बोल, तूं खरोखरी कोण आहेस ? जारे, हा अशानें कबूल व्हावयाचा नाहीं, जा, मिरच्यांचा तोबरा करून आणून ह्याच्या नाकास लावा, व तो लोखंडाचा चिमटा आणून त्यांत याचें अंग चिमटून धरा ह्मणजे हा आतां कबूल होईल !

यश०—अरे जारे ! दुष्टा! वृथा वल्गना कशास करितोस ? मी तुझ्या हातांत सांपडलों आहें त्या अर्थीं तूं माझे हाल हाल करून माझा जीव घेशील हें मी पक्कें ओळखून आहें, परंतु अशानें मी कदापि बधावयाचा नाहीं हें पक्कें लक्षांत ठेव ! मी तर मरणारच, परंतु मरावयाचे अगोदर तुला एक गोष्ट सांगतों ती ऐकावयाची छाती असेल तर ऐक ! दुष्टा ! मी कोण आहें तूं ओळखलें नाहींस ?—हे नीच वेषा ! मी तुला असा झुगारून देतों ! ( वेष झुगारून देतो ) दुष्टा ! कृतघ्ना ! मी कोण आहें तुला सांगतों ऐक ! ज्यानें तुज दुष्टास मारण्याकरितां आपली तरवार उसपली, व जो यावेळीं मेघगर्जनेपेक्षांही प्रचंडतर वाणीनें तुझ्या अंतरात्म्याचें विदारण करीत आहे, तो हा तुझा बाप होऊन लागलेला **यशवंतराव** आहे समज !

राज०—धन्य आहेस ! धन्य आहेस ! देवा ! नारायणा ! तूं धन्य आहेस! माझा बाळच येथें आला काय ?

यश०—आई ! हा मी तुझाच बाळ, तुला संक-

टांतून सोडविण्याकरितांच येथें आलों आहे! ( उभयतां मायलेंकरें धांवून एकमेकांस कडकडून मिठी मारितात. )

दौल०—( चाकरांस ) अरे ! पहातां काय ? यांना अगोदर निराळीं करा !

( चाकर दोघांस निराळीं करितात. )

यश०—( दांत ओंठ खातच ) आः दुष्टांनों ! क्रूरांनो !—

दौल०—अरे, पाहतां काय ह्याला पकडा अगोदर ! ( चाकर त्यास पकडूं पहातात. )

यश०—खबरदार गुलामांनो ! माझ्या अंगास हात लावाल तर ! गुलामांनों ! तुह्मीं कुणाच्या अंगाला हात लावितां ? मी तुमचा राजा आहें ! चला व्हा पाठीमागें, नाहीं तर तुमची येथल्या येथें दुर्दशा करून टाकलीच समजा ! तो गुलाम—हरामखोर—विश्वासघातो—निर्दय—दुष्ट बसला आहे त्याला पकडा आणि आपल्या देशास या कुलाधमाच्या जुलमापासून मुक्त करा !

दौल०—अहारे भित्र्यांनो ! तुह्मीं ह्याच्या शब्दमात्रानें असे भागूबाईसारखे होतां काय?—पकडा ! पहातां काय—ह्याला पकडा अगोदर, नाहीं तर पहा ह्याच तरवारीनें तुह्मांस येथल्या येथेंच यमपुरी दाखवितों !

( चाकर यशवंतरावास धरितात. )

यश०—आई ! अशी घाबरी होऊं नको ! तूं या वेळीं माझ्या जिवास धीर दे !

राज०—देवा ! एकून मी खराच आपला बाळ प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनीं पहातें आहें काय? देवा ! मी धन्य आहें !—परंतु देवा ! मी आपल्या बाळास अशा स्थितींत पहावें काय? ( रडूं लागते. )

यश०—निर्दया ! क्रूरा! माझ्या दीन मातोश्रीची अशी स्थिति पाहून तुझ्या हृदयास एवढा सुद्धां दयेचा पाझर सुटत नाहीं ? दुष्टा ! तूं नष्ट आहेस !

दौल०—( हर्षानें ) अहाहा! एकून मी खरा भाग्यवान् तो आतां आहें ! आत्तां राजसबाई माझ्या तडाक्यांतून कशी सुटते ती पहातों ! चलारे जा हिला आंत ओढून न्या !—का आतां मीं झालों कीं नाहीं विजयी ?

यश०—दौलतराव ! ह्या वेळीं तूं विजयी झाला आहेस ह्यांत संशय नाहीं ! हा हतभाग्य राजपुत्र—तुझा शत्रु—पहा तुझ्या पायां पडतो आहे ! दौलतराव ! माझें पायां पडून तुजपाशीं एक मागणें आहे तेवढें देण्यास तूं नाहीं ह्मणूं नको ! हा पहा मी तुझ्यापुढें दंडवत घालितों ! परंतु मी आपला प्राण वांचवावा ह्मणून तुजपाशीं मागत नाहीं! हा पहा मी येथें असाच निश्चेष्ट पडून रहातों! पाहिजे तर नौसक आतांचे आतां तरवार आणि मला ठार मार ! पाहिजे असेल तर माझे तिळातिळाएवढाले तुकडे करून काकादिकांस माझा बळि दे ! परंतु एक—ह्या माझ्या मातोश्रीवर—ह्या निष्कलंक साध्वीवर दया करून तिच्या पातिव्रत्याचा भंग करूं नको !

दौल०—असें काय ? कां आतां जिरली कीं नाहीं पुरती खाज ?—आतां तुझा डौल गेला का सगळा कोणीकडे निघून ?—फार चांगलें ! वाहवा ! वाहवा ! आज मी केवढा भाग्यवान् ?—माझें भाग्य इतकें मोठें होईल हें माझ्या स्वप्नींही नव्हतें !—ठीक आहे! हरामखोरा ! रहा तूं असाच पडून, आणि तुझ्या आईवर मी बलात्कार करूं लागलों असतां ती ओरडली ह्मणजे मग उठून उभा रहा !

यश०—अहारे ! भागूबाई ! अधमा ! हेंच का

तुझें मोठेपण ? मूर्खा ! धिक्कार असो ! धिक्कार असो तुला ! तूं माझी ही दुःखदायक स्थिति पाहून माझा उपहास करितोस काय ?—धिक्कार असो मला ! अरेरे! मी व्यर्थ या दुष्टाच्या पायां पडून आपला अपमान करून घेतला! (उठून उभा राहतो.) धिक्कार असो मला ! दुष्टा ! आजपर्यंत मी तुझ्या सामर्थ्याचा नुसता धिक्कार करीत होतों, परंतु आतां त्याची मी यत्किंचितूही पर्वा बाळगीत नाहीं !

**दौल०**—असें काय ? अजून तुझी गुरमी पुरतेशी जिरली नाहीं ? पहातों आणखी किती वेळ ती टिकते ती ?—जारे, जा मिर्च्यांची धुरी घेऊन या !

**राज०**—**दौलतराव** ! माझ्या पुत्राचे अपराध तूं पोटांत घालून त्याला क्षमा कर! मातृवात्सल्यामुळें त्याच्या हातून जें आचरण झालें त्याबद्दल तूं त्यावर कोप करूं नको ?—**दौलतराव** ! मी तुला शरण आहें ! माझ्या पुत्राचे प्राण वांचविशील, तर मी तुला वश होईन !—काय ?—मीं काय ह्मटलें !—मी तुझ्याशीं लग्नही लावावयास तयार होईन—पाहिजे असेल तर आत्तां ह्या घटकेलाही लग्नाला मी उभी राहीन—परंतु कृपाकरून माझ्या प्रियपुत्राचे प्राण मात्र वांचीव !

**यश०**—काय ह्मणतेस आई ? तूं या दुष्टाशीं-ज्या अधमानें तुझ्या प्राणप्रिय पतीचा विश्वासघातानें नाश केला त्याच्याशीं—विवाह लावणार काय ? आई ! आई ! आणि असें करून तूं आजपर्यंतच्या आपल्या कीर्तीस डाग लावणार काय ?—धिक्कार असो तुला ! आई ! तूं मनांत पक्की गांठ घालून ठेव, कीं तूं ह्या दुष्टा अधमाशीं विवाह कर कीं त्याच क्षणीं हा **यशवंतराव** प्राणत्याग करील, कधीं चुकावयाचा नाहीं!

**दौल०**—हं ! **राजसबाई** ! होतेस कीं नाहीं मला वश? कां घेऊं आतांच्या आतां याचा जीव ! बोल !

**राज०**—तें कांहीं नाहीं ! ती वेळ गेली ! मघां उगीच आपले वेडेपणामुळें मला तसें वाटलें ! आतां त्यांतलें कांहीं उरलें नाहीं ! **दौलतराव** ! तुला एकच गोष्ट सांगतें कीं, आजपर्यंत आह्मीं उभयतां ज्या निश्चयानें दिवस काढिले, तोच आमचा निश्चय निरंतर चालेल!

(यशवंतराव व राजसबाई एकमेकांस आलिंगन देतात.)

**यश०**—दुष्टा ! घातक्या ! आतां तुला ह्या देहाचें काय करून घेणें असेल तें घे करून, दुष्टा ! मोठीं मोठीं संकटें कोसळलीं तरी अखेरीस सत्याचा व सद्गुणाचाच जय कसा होतो तो पहा !

**दौल०**—(चाकरांस) अरे पहातां काय ! चला या दोघांनाही बाहेर ओढून न्या ! हिला माझ्या बिछान्यावर, व ह्याला वधस्थानाकडे!

(चाकर यशवंतरावाची व राजसबाईची मिठी सोडवूं पहातात, तीं मिठी सोडीत नाहींत.)

**राज०**—बाळा! आणखी एक क्षणभर मजजवळ रहा ! बाळा ! कायरे तुझी आतां दशा होणार ?—हायहाय ! बाळा ! बाळा !—

**यश०**—आई ! आई !

(पडदा पडतो.)

# अंक ५.

**प्र० १—दौलतराव चाकरांसह वर्तमान बसला आहे इतक्यांत बहादरशिंग येतो.**

**दौल०**—पहारा दुप्पट केलाना ? तसेंच दरवाज्यांचा कडेकोट बंदोबस्त ठेविला आहेना?

**बहा०**—हाय सरकार! आपल्या आज्ञेप्रमाणें सर्व बंदोबस्त यथास्थित ठेविला आहे! शत्रु आपले दरवाजे विश्वासघातानें किंवा हल्ला करून घेऊं ह्मणतील तर त्यांचें कांहीं चालावयाचें नाहीं.!

**दौल०**—फार उत्तम! **बहादरशिंग**! ही बंडाची व दंग्याची मला तर भुमकाच वाटते, तींत कांहीं जीव दिसत नाहीं! मीं बाहेर हेर पाठविले होते ते आतांच परत आले, त्यांच्या सांगण्यांत शहरांत जिकडे तिकडे सामसूम झालें आहे!

**बहा०**—तें खरें आहे! परंतु सरकार! हा **यशवंतराव** जोंपर्यंत जिवंत आहे, तोंपर्यंत या राजवाड्यांतच काय होईल न् काय काय नाहीं याचा नेम सांगतां येत नाहीं!

**दौल०**—असें खरें! पण त्याबद्दल काळजी करणें नको! त्याचा मृत्युकाळ समीप आला आहे असें समजा! बरें पण रात्र कितीशी झाली आहे?

**बहा०**—दुसरा डंका पडण्याचा अंमल आहे सरकार!

**दौल०**—फार उत्तम! हा डंका वाजला ना वाजला कीं, हा दुष्ट विश्वासघाती **यशवंतराव** मरावयाचें ठरलें आहे, व त्याप्रमाणें मांगांस मीं सांगूनही ठेविलें आहे! त्याला ह्यापुढें जगूं देतां उपयोगी नाहीं, कारण तो जगल्यापासून पुढेमागें अपाय होण्याचा संभव आहे! असो. हें होईल, परंतु, अगोदर त्याचे हाल हाल करून त्याच्या मनांतील सर्व गोष्टी एकूनएक काढून घेतल्या पाहिजेत! बरें, पण तुह्मीं एक गोष्ट करा, अगोदर जाऊन **मालोजी** कोठें असेल त्याला एवढेंच सांगा कीं, **राजसबाई** जर मला तावडतींत वश नाहीं झाली, तर **यशवंतराव** जिवंत रहाण्याची कांहीं आशा नाहीं! (बहादरशिंग जातो.) या कारस्थानाचें काळीज मांगाप्रमाणें आहे यांत संशय नाहीं! तो जर त्यावेळीं मध्यें पडला नसता, तर **राजसबाई** केव्हांच माझी झाली असती! परंतु आतां काय? सर्व व्यर्थ! ह्याकरितां हा मेला पाहिजे हीच गोष्ट खरी! आतां दुसरा इलाज राहिला नाहीं!

(गजराबाई येते.)

**गज०**—आजची रात्र कांहीं नीटपणें उजाडेलसें वाटत नाहीं! देवा! आतां तुलाच करुणा आली पाहिजे! बाबा! तुमच्या पायां पडतें! जर तुह्मांला तुमच्या **गजरे**च्या जिवाला कांहीं सुख ह्मणून व्हावें असें वाटत असेल, तर मी बोलतें एवढें कृपा करून ऐकाच!

**दौल०**—कारटे! आलीस का फिरून इकडे तोंड दाखवायला? तुला सांगितलें होतें ना उजाडेपर्यंत माझ्याकडे इकडे येऊं नको ह्मणून? मग कशाला हिकडे जीव द्यायला आलीस? कारटे! चल निघ येथून! ह्या ठिकाणीं आतां मृत्यूचा थोडक्याच वेळांत संचार होईल!

**गज०**—बाबा! तुमचें बोलणें ऐकून मला कसेंसेंच होऊं लागलें आहे! बाबा! तुह्मांला तुमच्या आईबापांची—

**दौल०**—(दांत ओंठ खातच) आं—कारटे! काय ह्मणतेस? माझ्या आईबापांचें मजपुढें नांव काढितेस! कारटे! थांब तुलाही त्यांच्याच पंक्तींत नेऊन बसविलें पाहिजे!

(आवेशानें तरवार उपसतो.)

**गज०**—बाबा! तुह्मीं माझा जीवही घ्या, मी त्याची नाहीं परवा करीत! परंतु तुह्मांला

माझ्या गळ्याची शपथ आहे—माझी आई जी हल्लीं स्वर्गलोकांत नांदत आहे तिच्याही गळ्याची तुम्हांला शपथ आहे—तुम्ही आपला तेवढा हुकूम परत मागें घ्या !

**दौल०**—काय ह्मणतेस ? कारटे ! तूं कोणाबद्दल माझ्याशीं बोलत आहेस ?

**गज०**—बाबा ! दुसऱ्या कोणाबद्दल बोलत नाहीं ! आपण त्या शूर उदार भाग्यहीन राजपुत्रास मृत्यूची शिक्षा केली आहे, तेवढी आपण करूं नये एवढेंच माझें तुम्हांपाशीं मागणें आहे ! !

**दौल०**—पोरी ! तो तर वांचण्याची आशाच नको ! तो मरतो आहे तो न्यायानेंच मरतो आहे ! मघांशी कारटे ! तुला स्वप्न पडलें होतें, तें बहुतेक अर्धें खरें देखील ठरलें! कारण तुझ्या सांगण्याप्रमाणें त्यानें प्रकट होऊन माझ्या काळजांत शस्त्र भोसकण्याचाही प्रयत्न केला !

**गज०**—बाबा ! समजा ! तुम्हांवर कांहीं संकट येऊन गुदरलें असतां त्या ठिकाणीं धैर्य धरून मी आपणाबद्दल आपले प्राण द्यावयास कबूल झालें, तर ती गोष्ट तुम्हांस आवडणार नाहीं काय ? बाबा ! तुम्ही ह्या गोष्टीचा विचार करा !जे उदार मनाचे लोक आहेत ते अमुक मनुष्य आपला शत्रु आहे एवढ्याचसाठीं त्याचा द्वेष कदापि करीत नाहींत ! बाबा ! **यशवंतरावाचा** हेतु आपला जीव घ्यावयाचा नसून आपल्या दीन मातोश्रीचा बचाव करावा एवढाच होता !

**दौल०**—कारटे! तूं खोटें बोलतेस ! तो माझ्या वेताआड आला ह्याबद्दल त्यास देहांतशिक्षाच योग्य आहे ! कारटे, तूं निर्लज्ज कोडगी आहेस ! तुला लाज नाहीं वाटत? अगे ! प्रत्यक्ष ज्या दुष्टानें तुझ्या पित्याचे प्राण घेण्यासाठीं शस्त्र हुगारलें त्याचा बचाव करावयास पहातेस तेव्हां तुझ्या मनांत मीच मरावें असेंच आहे नाहीं कारटे? कारटे! चल नीघ! फिरून मला तोंड नको दाखवूं!

(तिला लाथ मारून पलीकडे पाडतो.)

**गज०**—बाबा ! मला तुम्ही लाथा मारा किंवा पाहिजे तें करा, परंतु माझ्या प्राणप्रिय **यशवंतरावास** क्षमा केली असें तुमच्या तोंडून वचन घेतल्याशिवाय मी ह्मणून येथून जावयाची नाहीं !

**दौल०**—काय ? काय ह्मणतेस कारटे ? तुझा प्राणप्रिय **यशवंतराव** ? कारटे! हें तूं काय बोललीस ?

**गज०**—बाबा मी कांहीं खोटें नाहीं बोललें ! त्याचे मजवर तसेच अगणित उपकार आहेत ! बाबा ! बाबा ! तुम्हींच विचार करा, जर त्या उदार राजपुत्रानें मध्यें पडून त्या चोरट्यांच्या हातून माझी सुटका केली नसती तर आज या तुमच्या कन्येची काय स्थिति झाली असती! बाबा! तुमच्या पायां पडतें ! कसेंही करा ! पण तुम्ही त्या उदार राजपुत्राचे प्राण वांचवा! बाबा! त्यानें माझ्या प्राणापेक्षांही प्रिय अशा पातिव्रत्याचें रक्षण केलें ह्या गोष्टीची आठवण असूं द्या !

**दौल०**—कारटे ! तुझ्या तोंडाला किडे पडोत! कारटे ! तूं किती जरी बडबडलीस, आणि माझ्या पुढें बसून रडलीस आरडलीस, तरी एकवेळ दगडाला दया येईल, परंतु ह्या **दौलतरावाला** ह्मणून दया यावयाची नाहीं, हें पक्कें समज ! कारटे ! मी त्याचा आ-

त्यांच्या आतां जीव घेतों, ह्मणजे स्वायोगानें तुलाही तुझ्या पापांबद्दल शिक्षा केलीसें होईल ! चल निघ !

**गज०**—हाय हायरे उदार राजपुत्रा! हायहाय! प्राणनाथ ! मी केवढी चांडाळीण, कीं आपणाबद्दल विनाकारण भीति मनांत बाळगून मी आपण होऊन आपल्या नाशास कारण झालें ! हायहाय !—हे पित्या ! तूं किती निर्दय आहेस? तुला माझी आणि त्या उदार राजपुत्राची अशी स्थिति पाहून लवमात्रही दया येत नाहींना ?—हायहाय ! धिक्कार असो! हायहायरे उदार राजपुत्रा ! आतां तुझी काय स्थिति झाली असेल ? मला वाटतें त्या दुष्टांनीं तुला तापलेल्या तेलाच्या कढईत उभें केलें असून त्या वेदनेमुळें तूं आपले प्राणच टाकीत आहेस ! हायहाय! देवा! देवा! आतां माझ्या प्राणप्रियाचे प्राण वांचविण्यास काय उपाय करूं? हरहर! सर्व गोष्टी व्यर्थ ! असो. देवा! तुझी मर्जी! जें होणार असेल तें होवो! मी तर आतां मरतेंच! ह्मणजे मेल्यावर तरी आह्मां उभतांची गांठ पडेल !

(रडत रडत निघून जाते.)

**दौल०**—अरेरेरे—या वेळेस देहास कसे विंचू लागलेसें मला झालें आहे ! अरे ! मी एवढा सार्वभौम राजा, माझ्यापुढें शत्रु थरत कांपतात, त्या माझ्यापेक्षां, अतिशय हलकीं सलकीं कामें करून निरंतर क्लेशांतच दिवस घालविणारा असा एकादा हुजऱ्याही अधिक सुखी असेल ! काय करूं ? अरे! ही प्रत्यक्ष माझ्या पोटची पोरगी—हिची आई लहानपणीं वारली तेव्हांपासून मीच तिला आईचे ठिकाणी झालों, असें असतां तीच या वेळीं माझ्या जिवास क्लेश देणारी झाली काय ? धिक्कार असो ! धिक्कार असो ! हरहर ! मी व्यर्थ या राजसुखाला भुललों ! आज सर्व राज्यांत माझा दरारा ! सर्व लोक जसे कांहीं माझ्या आज्ञेत! असें असतां आज ह्या वेळीं माझ्या जिवास शांति व समाधान देणारा एकही प्राणी नाहीं अं !—हायहाय !

( बहादरशिंग येतो. )

**दौल०**—कां बहादरशिंग, तुह्मांला **मालोजी** भेटला? कां तोही फिरला ? माझें दैवच आज फिरलेंसें मला वाटत आहे ! काय करूं ?—

**बहा०**—महाराज ! **मालोजी** घरांत कोठेंही नाहीं ! महाराज ! तो पळून गेला !

**दौल०**—( आश्चर्यानें ) काय ? **मालोजी** पळून गेला? एकून माझी मनोदेवता कांहीं खोटी नाहीं !

**बहा०**—होय महाराज! मला आज कांहीं तरी दगा होईल असें खचित वाटतें ! कारण नुकता एक घटकेच्या पूर्वीं **मालोजी** बाजूच्या दरवाज्यानें बाहेर पडला, व त्या वेळीं त्याच्याबरोबर कोणी एक अनोळखी मनुष्य होता, आणि दोघे वाड्यांतून बाहेर पडले त्या वेळीं **मालोजी**ला ' दुष्टा ! निर्दया ! हीच तुझी आमची शेवटली भेट ! असें हळूच बोलतांना एका पहारेकऱ्यानें ऐकिलें !

**दौल०**—( रागानें ) गुलामा ! लुच्चा ! तूं खोटें बोलतोस !

**बहा०**—(हात जोडून ) हा बंदा गुलाम सरकार!—

**दौल०**—( त्वेषानें ) काय बडबडतोस रे गुलामा? हारामखोरा! सरकार गुलाम कायरे ?

**बहा०**—सरकार! शांत व्हावें, मी आपला बंदा गुलाम आहें ! मी चरणापाशीं खोटी

विनंती नाहीं करीत! सरकार! वाटेल असल तर त्या पहारेकऱ्याला आणून विचारावें! मालोजी खरोखरीच बोलला " दुष्टा! निर्दया! हीच तुझी—"

**दौल०**—मूर्खा! त्या दुष्टाचे शब्द फिरून उच्चारून माझ्या जिवास दुःख देतोस? कांहीं तुला लाज नाहीं वाटत?—हायहाय!—**बहादुरशिंग**! काय करूं? जीव कसा अगदीं तळमळतो आहे! खचित! आज कांहीं तरी दगा होणार हें खचित! काय करूं हो? कांहीं सुचत नाहीं!

**बहा०**—सरकार! हा दगा न होऊं देण्याचा उपाय आपल्या हातांतच आहे!

**दौल०**—खरें बोललास! याच क्षणीं **यशवंतरावास** ठार मारावे हाच या वेळीं उपाय आहे!—ठीक आहे! बरें! त्याला मिरच्यांची धुरी दिली?—हो! पण अगोदर त्याला खांबाशीं चांगलें आंवळून बांधलें आहेना!

**बहा०**—महाराज! ती सर्व तयारी यथास्थित आहे! त्याला धुरी दिली परंतु तो मी **यशवंतराव** आहे यापेक्षां अधिक कांहीं एक बोलत नाहीं! महाराज! **यशवंतरावास** चांगलें बंदोबस्तानें बांधलें आहे, व त्याचा वध करण्याविषयीं मांग आपण सांगितल्याप्रमाणें दुसरा डंका पडण्याची वाट पहात आहेत!

**दौल०**—ठीक आहे!—**बहादुरशिंग**! चला मला एकवार त्या दुष्टाकडे घेऊन! तो दुष्ट अद्यापि माझा धिक्कार करितो आहे, यासाठीं एकवेळ त्याचें नाक कापून त्याच्या हातांत द्यावे असें मनांत आहे!—काय करूं हो! या **राजसबाईनें** मला तर अगदीं वेडच लाविलें आहे! यासाठीं मला वाटतें एकवेळ त्याच्याकडे जाऊन त्याला दोन समजुतीच्या गोष्टी सांगून मला **राजसबाई** वश होईल तर पहावें, नाहीं तर आतां त्याचा मृत्यु हा टळत नाहींच!

( दोघे निघून जातात. )

## प्रवेश २.—वाड्यांतील बंदीखाना.

( यशवंतराव उघडा बोडका खांबाशीं बांधलेला असून दोन अंगास दोन मांग नागव्या तरवारीनिशीं उभे आहेत. )

**यश०**—बरें मित्रहो! मग तेवढी तरी गोष्ट कराच! माझें तुह्मांपाशीं दुसरें कांहीं मागणें नाहीं! मी मेल्यावर माझ्या देहाची हाल अपेष्टा न करितां माझें नीटपणें दहन करा ह्मणजे झालें!

**मांग**—( खुणेनें होय ह्मणून सुचवितात. )

**यश०**—बरें, रात्र किती झाली आहे?

**१ मांग**—आतां कशापाईं इच्यारतां? तुमचं आलया आतां भरत? बिसऱ्या डंक्याचा अंवल हाय?

**यश०**—फार उत्तम! मी तयार आहें!

( दौलतराव येतो. )

**दौल०**—हां, याला करा नीट असा माझ्यासमोर उभा! (मांग त्याला नीट उभा करितात.) अरे विश्वासघातक्या! विश्वासघात व कपट केल्याचा कसा दारुण परिणाम होतो तो पहा!—कार्यरे तूंच ना कबूल केलें होतेंस माझ्या शत्रूचें तोंड माझ्या दृष्टीस पडलें कीं मीं तुझा वध करावा ह्मणून?

**यश०**—होय दुष्टा! मग वाट कशाकरितां पहातोस? हा मी तयार आहें, कर माझा वध!

**दौल०**—असा उतावेळ होऊं नको! मी विचारितों याचा मला बरोबर जबाब दे! तूं चना माझ्या उरांत भोसकण्याकरितां तरवार उसपली होतीस?

यश०—हो! मींच उसपली होती! आणखी मला अंमळ खुला तर कर ह्मणजे फिरून उसपीन! कधीं सोडणार नाहीं!

दौल०—तूं अद्यापि बच्चा आहेस! तुला यांतलें कांहीं कळत नाहीं! तूंच पहा! मला मारण्याकरितां तूं तरवार उपसलीस, परंतु त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं हें ब्रह्मदेवानेंच लिहून ठेविलें होतें!

यश०—दुष्टा! मला तुझें तें ब्रह्मज्ञान नको! एकाद्या गोष्टीविषयीं उमेद बाळगावी, साहस करावें, एवढेंच आपणा मानवांचे हातीं आहे! पुढें सिद्धि देणें न देणें ही गोष्ट परमेश्वराधीन आहे? यासाठीं अमुक गोष्ट साधली न साधली यांत मोठेंसें महत्व नाहीं! खरें महत्व ह्मटलें ह्मणजे साहस करण्यांतच आहे!

दौल०—यशवंतराव! तूं हा आपला हट्ट सोडून दे! असा वेडा होऊं नको! तूं अद्यापि लहान बच्चा आहेस! तूं हल्लीं आहेस कोठें याचा नीट विचार कर! अद्यापि तुझें वय राज्यसुख भोगण्याचें आहे इकडे नीट लक्ष पुरीव! उगीच आपला प्राण धोक्यांत घालूं नको!

यश०—दुष्टा! अधमा! तुला असें वाटत आहे काय कीं मीं मृत्यूस यत्किंचितूही भिईन! जा! दुष्टा! मी असा तुझ्या लाघवी बोलण्यानें फसावयाचा नाहीं! माझा प्राण तूं खुशाल घे! मी एवढें सुद्धां हूं कीं चूं करणार नाहीं! तूं मनांत पक्कें समज, तूं दुष्टानें ज्या महाप्रतापी प्रतापसिंह राजाचा कपटानें वध केलास त्याचाच मी बच्चा आहें!

दौल०—यशवंतराव! मला तसल्या गोष्टी ऐकावयास नकोत! तुझी मला दया येते ह्मणून मी बोलतों! पहा! तूं माझें ह्मणणें मुकाट्यानें मान्य कर आणि तूं ह्या क्लेशांत दिवस काढित आहेस त्यांची समाप्ति होऊं दे! पहा! तूं जर माझें ह्मणणें कबूल करणार नाहींस तर तुझ्या मृत्यूचा सूचक डंका आणखी दहापांच पळांतच वाजेल!

यश०—अरे जा! अशा डंक्याला मी मोजितों! मूर्खा! मृत्यूचें भय कोणाला? तुजसारख्या पापी लोकांना! प्रत्यक्ष रुद्रमूर्ति सर्व जगताचा संहार करावयास जरी पुढें येऊन उभी राहिली तरी हा यशवंतराव कदापि डगणार नाहीं हें तूं पक्कें समज! मूर्खा! माझा मृत्यूकाळ समीप आला आहे, ह्यासाठीं आतां तूं आपलें तोंड काळें कर जा!

दौल०—मूर्खा! भिकेची हांडी शिंक्यास कधीं चढावयाची नाहीं ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं! नशीब तुझें! (दुसरा डंका वाजतो.) हं पहा ही तुझ्या मृत्यूची निशाणी! इतका वेळपर्यंत तुझ्याविषयीं मला दया वाटत होती, परंतु आतां कांहीं झालें तरी तुझा ह्मणून मी मुला । करणार नाहीं! प्रत्यक्ष तुझी आई माझ्यापुढें येऊन जरी व्हावी तितकी रडली, ओरडली, किंवा तुला मीं सोडावें ह्मणून माझी व्हावी तितकी स्तुति केली तरी तुझी ह्मणून सुटका व्हावयाची नाहीं! (मांगांकडे पाहून) हं पहातां काय? लोळवा हिला येथल्या येथेंच!—हो पण अगोदर ह्याला नीट बांधून चांगला मशाली लावून भाजा, आणि याच्या मनांतील गुह्य गोष्टी अगोदर एकून एक झाडून समजून घ्या—आणि नंतर तुकडे! (जातो.)

यश०—अरे वाट कशाची पहातां! आटपा झटझट! तुह्मांला हुकूम झाला आहे त्याप्रमाणें

विनंती नाहीं करीत ! सरकार ! पाहिजे असल तर त्या पहारेकऱ्याला आणून विचारावें ! मालोजी खरोखरीच बोलला " दुष्टा! निर्दया! हीच तुझी—"

दौल०—मूर्खा! त्या दुष्टाचे शब्द फिरून उच्चारून माझ्या जिवास दुःख देतोस? कांहीं तुला लाज नाहीं वाटत!—हायहाय!—बहादरशिंग! काय करूं? जीव कसा अगदीं तळमळतो आहे! खचित! आज कांहीं तरी दगा होणार हें खचित! काय करूं हो ? कांहीं सुचत नाहीं!

बहा०—सरकार! हा दगा न होऊं देण्याचा उपाय आपल्या हातांतच आहे !

दौल०—खरें बोललास! याच क्षणीं यशवंतरावास ठार मारावें हाच या वेळीं उपाय आहे!—ठीक आहे! बरें! त्याला मिर्च्यांची धुरी दिली?—हो! पण अगोदर त्याला खांबाशीं चांगलें आंवळून बांधलें आहेना !

बहा०—महाराज! ती सर्व तयारी यथास्थित आहे! त्याला धुरी दिली परंतु तो मी यशवंतराव आहें यापेक्षां अधिक कांहीं एक बोलत नाहीं! महाराज! यशवंतरावास चांगलें बंदोबस्तानें बांधलें आहे, व त्याचा वध करण्याविषयीं मांग आपण सांगितल्याप्रमाणें दुसरा डंका पडण्याची वाट पहात आहेत !

दौल०—ठीक आहे!—बहादरशिंग! चल मला एकवार त्या दुष्टाकडे घेऊन! तो दुष्ट अद्यापि माझा धिक्कार करितो आहे. यासाठीं एकवेळ त्याचें नाक कापून त्याच्या हातांत द्यावें असें मनांत आहे !—काय करूं हो? या राजसबाईनें मला तर अगदीं वेडच लाविलें आहे ! यासाठीं मला वाटतें एकवेळ त्याच्याकडे जाऊन त्याला दोन समजुतीच्या गोष्टी सांगून मला राजसबाई वश होईल तर पहावें, नाहीं तर आतां त्याचा मृत्यु हा टळत नाहींच !

( दोघे निघून जातात. )

## प्रवेश २.—वाड्यांतील बंदीखाना.

( यशवंतराव उघडा बोडका खांबाशीं बांधिलेला असून दोन अंगास दोन मांग नागव्या तरवारीनिशीं उभे आहेत. )

यश०—बरें मित्रहो ! मग तेवढी तरी गोष्ट कराच ! माझें तुह्मांपाशीं दुसरें कांहीं मागणें नाहीं ! मी मेल्यावर माझ्या देहाची हाल अपेष्टा न करितां माझें नीटपणें दहन करा ह्मणजे झालें !

मांग—( खुणेनें होय ह्मणून सुचवितात. )

यश०—बरें, रात्र किती झाली आहे ?

१मांग—आतां कशापाईं इच्यारतां ? तुमचं आलया आतां भरत ? तिसऱ्या डंक्याचा अंवल हाय ?

यश०—फार उत्तम ! मी तयार आहें !

( दौलतराव येतो. )

दौल०—हां, याला करा नीट असा माझ्यासमोर उभा! (मांग त्याला नीट उभा करितात.) अरे विश्वासघातक्या! विश्वासघात व कपट केल्याचा कसा दारुण परिणाम होतो तो पहा !—कायरे तूंच ना कबूल केलें होतेंस माझ्या शत्रूचें तोंड माझ्या दृष्टीस पडलें कीं मीं तुझा वध करावा ह्मणून ?

यश०—होय दुष्टा ! मग वाट कशाकरितां पहातोस ? हा मी तयार आहें, कर माझा वध!

दौल०—असा उतावेळ होऊं नको ! मी विचारितों याचा मला बरोबर जबाब दे ! तूंच ना माझ्या उरांत भोसकण्याकरितां तरवार उपसली होतीस ?

**यश०**—हो! मींच उसपली होती! आणखी मला अंमळ खुला तर कर ह्मणजे फिरून उसपीन! कधीं सोडणार नाहीं!

**दौल०**—तूं अद्यापि बच्चा आहेस! तुला यांतलें कांहीं कळत नाहीं! तूंच पहा! मला मारण्याकरितां तूं तरवार उपसलीस, परंतु त्याचा कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं हें **ब्रह्मदेवा**नेंच लिहून ठेविलें होतें!

**यश०**—दुष्टा! मला तुझें तें ब्रह्मज्ञान नको! एकाद्या गोष्टीविषयीं उमेद बाळगावी, साहस करावें, एवढेंच आपणा मानवांचे हातीं आहे! पुढें सिद्धि देणें न देणें ही गोष्ट परमेश्वराधीन आहे? यासाठीं अमुक गोष्ट साधली न साधली यांत मोठेंसें महत्व नाहीं! खरें महत्व ह्मटलें ह्मणजे साहस करण्यांतच आहे!

**दौल०**—**यशवंतराव**! तूं हा आपला हट्ट सोडून दे! असा वेडा होऊं नको! तूं अद्यापि लहान बच्चा आहेस! तूं हल्लीं आहेस कोठें याचा नीट विचार कर! अद्यापि तुझें वय राज्यसुख भोगण्याचें आहे इकडे नीट लक्ष पुरीव! उगीच आपला प्राण धोक्यांत घालूं नको!

**यश०**—दुष्टा! अधमा! तुला असें वाटत आहे काय कीं मीं मृत्यूस यत्किंचितही भिईन! जा! दुष्टा! मी असा तुझ्या लाघवी बोलण्यानें फसावयाचा नाहीं! माझा प्राण तूं खुशाल घे! मी एवढें सुद्धां हूं कीं चूं करणार नाहीं! तूं मनांत पक्कें समज, तूं दुष्टानें ज्या महाप्रतापी **प्रतापसिंह** राजाचा कपटानें वध केलास त्याचाच मी बच्चा आहें!

**दौल०**—**यशवंतराव**! मला तसल्या गोष्टी ऐकावयास नकोत! तुझी मला दया येते ह्मणून मी बोलतों! पहा! तूं माझें ह्मणणें मुकाट्यानें मान्य कर आणि तूं ह्या क्लेशांत दिवस काढित आहेस त्यांची समाप्ति होऊं दे! पहा! तूं जर माझें ह्मणणें कबूल करणार नाहींस तर तुझ्या मृत्यूचा सूचक डंका आणखी दहापांच पळांतच वाजेल!

**यश०**—अरे जा! अशा डंक्याला मी मोजितों! मूर्खा! मृत्यूचें भय कोणाला? तुजसारख्या पापी लोकांना! प्रत्यक्ष **रुद्र**मूर्ति सर्व जगताचा संहार करावयास जरी पुढें येऊन उभी राहिली तरी हा **यशवंतराव** कदापि डगणार नाहीं हें तूं पक्कें समज! मूर्खा! माझा मृत्यूकाळ समीप आला आहे, ह्यासाठीं आतां तूं आपलें तोंड काळें कर जा!

**दौल०**—मूर्खा! भिकेची हांडी शिंक्यास कधीं चढावयाची नाहीं ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं! नशीब तुझें! (दुसरा डंका वाजतो.) हं पहा ही तुझ्या मृत्यूची निशाणी! इतका वेळपर्यंत तुझ्याविषयीं मला दया वाटत होती, परंतु आतां कांहीं झालें तरी तुझा ह्मणून मी मुलाजा करणार नाहीं! प्रत्यक्ष तुझी आई माझ्यापुढें येऊन जरी व्हावी तितकी रडली, ओरडली, किंवा तुला मीं सोडावें ह्मणून माझी व्हावी तितकी स्तुति केली तरी तुझी ह्मणून सुटका व्हावयाची नाहीं! (मांगांकडे पाहून) हं पहातां काय? लोळवा हिला येथल्या येथेंच!—हो पण अगोदर ह्याला नीट बांधून चांगला मशाली लावून भाजा, आणि याच्या मनांतील गुह्य गोष्टी अगोदर एकून एक झाडून समजून घ्या—आणि नंतर तुकडे! (जातो.)

**यश०**—अरे वाट कशाची पहातां! आटपा झटझट! तुम्हांला हुकूम झाला आहे त्याप्रमाणें

वागा! मांगत्यास जोरानें आवळून बांधूं लागतात.) हायहाय ! मूर्खांनो ! मला मारावयास इतकी तयारी ती कशास पाहिजे ! आणखी तुह्मीं माझी हाल अपेष्टा करणार आहां, माझें सर्व अंग भाजणार आहां हें मी पक्कें ओळखतों ! परंतु त्यापासून तुह्मांस मी अमुक आहें यापलीकडे एवढीसुद्धां बातमी कळणार नाहीं! तुह्मांला पाहिजे असेल तर हा मी येथें असा ताठ उभा रहातों, चाला घाव नू करा तुकडे! पण अशी माझी बे अब्रू नका करूं!—हायहाय! मित्रांनो! कोण ही माझी दुर्दशा! धिक्कार असो! हायहाय!—मित्रहो ! या ठिकाणीं माझी विटंबना होत आहे, ह्माबदलचा सूड तुह्मीं केव्हां घ्याल तेव्हां खरें

( मांग त्यास करकरून बांधितात. )

( गजराबाई येते. )

**गज०**—दुष्टांनो ! हात आटोपा ! हात आटोपा ! तुह्मांला काय बांधायसवरायचें असेल किंवा धुन्या वगैरे द्यावयाच्या असतील त्या सर्व माझ्याकडे येऊं द्या ! हायहाय ! हे उदार राजपुत्रा ! हायहाय ! आतां आपणापुढें मी कोणच्या तोंडानें येऊं?-(मांगांकडे पाहून) अंमळ बाहेरल्या बाजूस उभे रहा! तुमच्या धन्याची कन्या मी, ती मी तुह्मांस आज्ञा करितें आहें!—चला! मग पाहिजे तर आत या !

**मांग०**—(आपआपसांत) व्हय झेला मशालीशीं भाजन्याचा होकम झालाया ! चलचल! बिगिद्यान् मशाली प्येटवूनशी आनुं चल! ही दोग न्हाइनात का हत? कुट जात्यात? आपुन भाइरच हाऊ ! (बाहेर जातात.)

**गज०**—हायहाय ! प्राणनाथ ! मी आतां हें मुख आपणास कसें दाखवूं!

**यश०**—राजकन्ये ! ह्यांत तुझ्याकडे काय दोष आहे? माझे सांप्रत जे हाल होत आहेत, व ज्या वेदना काढाव्या लागत आहेत, त्यांचें कारण तुझा पिता होय ! त्याबद्दल तूं आपल्या मनास उगीच वाईट वाटूं देऊं नको! तूं निरपराध आहेस! प्राणप्रिये! तुझ्या पित्यानें किती जरी माझा छळ केला तरी त्याचा दोषी तो ! तुजकडे त्यांतलें कांहीं नाहीं ! प्राणप्रिये ! तुजवरील माझ्या प्रीतींत अंतर ह्मणून बिलकूल पडलें नाहीं, व पडावयाचेंही नाहीं! प्रिये! ये! माझ्यानें पुढें हात करवत नाहीं, तथापि एकवार हा आतां शेवटलाच प्रसंग आहे, यासाठीं मला तूंच प्रेमालिंगन दे ह्मणजे त्या योगानें मी आपणास धन्य समजेन !

**गज०**—हायहाय! हे उदार राजपुत्रा ! ही आपली शेवटली भेट आहे यास्तव आतां मी आपणास प्राणनाथच ह्मणतें याची क्षमा करा ! प्राणनाथ ! आपण या दासीला जो इतका मान देत आहां त्या मानास ही दासी योग्य नाहीं ! या वेळीं आपली जी हालअपेष्टा होते आहे तिचें कारण मीच आहें. !

**यश०**—(आश्चर्यानें) काय ? काय ह्मटलेंस ?

**गज०**—होय ! प्राणनाथ ! मी खोटें बोलत नाहीं ! आपल्या हालअपेष्टेचें कारण मीच आहें ! आपण येथें आल्यामुळें मी अगदीं भयाभीत होऊन गेलें व त्याच्या भरांत आपण येथें आहां ही गोष्ट माझ्या हातून फुटली ! प्राणनाथ ! या पातकाच्या क्षालनार्थ मी तर आतां प्राणच देण्याचा निश्चय केला आहे, परंतु माझी आपणास सरतेशेवटीं एक विनंती आहे, ती ही कीं!

मी मरावयाचे अगोदर माझ्या अपराधांची आपण क्षमा करावी !

यश०—असें काय ? निर्लज्जे ! चल निघ येथून आपल्या बापाकडे ! मला इतःपर तोंडसुद्धां दाखवूं नको !

गज०—(त्याच्या पायां पडून) प्राणनाथ ! आपण सांगतां ही गोष्ट माझ्या हातून कदापि घडणार नाहीं ! प्राणनाथ ! मीं आपल्या पायांस मिठी घातली आहे ती कदापि सोडणार नाहीं ! आपणास वाटेल तर आपण मला लत्ताप्रहार करा, मला चिरडून टाकून माझा जीवही घ्या, मी त्याबद्दल एक ब्रसुद्धां तोंडांतून काढणार नाहीं ! मी जरी मेलें तरी मरतां मरतां आपलें कल्याण चिंतूनच मरेल !

यश०—(गहिंवरून) हायहाय ! प्राणप्रिये ! हे उदार राजकन्ये ! मी किती दुष्ट, किती पापी आहें, कीं रागाच्या आवेशांत सांपडून तुला संकटांत पाडलें एवढेंच नव्हे, तर तुला दुरुत्तरानें ताडनही केलें ! हायहाय!

गज०—(आनंदानें उठून) अहाहा ! प्राणप्रिया! मी धन्य आहें, धन्य आहें !—एकून माझे सर्व अपराध आपण पोटांत घालून मला क्षमा केलीना ?

यश०—केली ! केली ! प्रिये ! त्या गोष्टीचा इतःपर उच्चारही करूं नको !

गज०—प्राणनाथ ! आपण मला क्षमा केली यामुळें मी आपणास अत्यंत धन्य समजतें! प्राणनाथ ! माझ्या मूर्खपणामुळें आपला प्राणनाशच व्हावयाची वेळ आली आहे, असें असतांही आपण उदारपणानें माझे सर्व अपराध गिळून जाऊन मला क्षमा केली त्या क्षमेस मी पात्र खचित नव्हतें ! असो! प्राणप्रिया ! ती गोष्ट एकवेळ होऊन चुकली ! आतां ती परत येणें नाहीं ! परंतु प्राणनाथ! काय सांगूं ? आपली ही स्थिति पाहून मला फार दुःख होतें आहे, आणि त्यांतून आपण असे सद्गुणी असून मज अभागिनीस त्या तसल्या भयंकर प्रसंगांतून सोडविलें, असें असतांही मी दुष्ट कृतघ्न आपल्याच प्राणनाशास कारण झालें, हें स्मरून मला जें कांहीं होतें आहे तें कांहीं मला बोलून दाखवितां येत नाहीं ! हायहाय ! प्राणनाथ ! आतां याउपर माझ्यानें प्राणधारण करवणार नाहीं, यास्तव मज दीन अभाग्येची दया येऊन आपणच मला मारून टाका ह्मणजे मी आपणास धन्य समजेन !

यश०—(गहिंवरून) प्राणसखे ! नकोगे अशी दीनवाणी बोलूं ! आपणावर ईश्वरच कोपला त्यापुढें आपणा मानवांचा उपाय काय? उगी प्रिये ! उगी !—प्रिये ! आतां हें सर्व दुःख टाकून दे ! अशी प्राणांवर उदार होऊं नको ! तूं मजकरितां जिवंत राहून त्या माझ्या बिचाऱ्या निराश्रित निराधार मातोश्रीचें संरक्षण कर एवढें माझें तुजपाशीं मागणें आहे !

गज०—प्राणनाथ ! जशी आपली आज्ञा! आपण सांगितल्याप्रमाणें आपल्या मातोश्रीचें मी रक्षण करीन ! त्या कामीं माझे प्राण गेले तरी चिंता नाहीं ! हायहाय ! प्राणपती ! इतःपर ह्मणून मला या जगांत काडीमात्र सुख व्हावयाचें नाहीं, परंतु आपल्या परमपूज्य मातोश्रीचें रक्षण करावयाचें आहे, एवढ्यानेंच कायतें आतां मला समाधान वाटेल !

यश०—हायहाय ! प्राणप्रिय ! धिक्कार असो मला ! तू अशा सद्गुणी असून तुजवर मी व्यर्थ रागावलों ! माझा राग मलाच आवरेनासा झाला ! हरहर ! प्राणसखे ! मी खचित पापी आहें, मी तुला दुरुत्तरानें ताडन केलें, व त्यासाठीं मीच तुझी क्षमा मागतों ! (हात बांधल्या बांधल्याच तिच्या पायांवर धाडकन पडतो. ती त्यास प्रेमालिंगन देऊन उठविते.)

यश०—(आनंदानें नेत्र मिटून) अहाहा ! प्राणप्रिये ! मी धन्य खरा, कारण कीं अशा मृतावस्थेंत असतां तुझें आलिंगनरूपी अमृतसेचन माझ्या देहांत पुनरपि जीवनकळाच जणों घालीत आहे !

(मांग मशाली पेटविलेल्या घेऊन आंत येतात.)

मांग—ताईसाहेब ! आपुन ह्ये का मांडलया ! ह्ये गुन्हेगाराची येळ भरलीया ! ह्येला सोडा कीं ! कार ये दळप्या ! आन् त्यो चिमटा—आन् आन् त्योका आन् !

गज०—दुष्टांनो ! खबरदार तुम्ही पुढें याल तर ! माझ्या प्राणप्रियास मी अशीच मिठी मारून राहीन ! ती प्रत्यक्ष देवदैत्यांच्या हातूनही सुटावयाची नाहीं ! (यशवंतरावास घट्ट मिठी घालिते.) (उभयतांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालतात.)

(इतक्यांत पडद्यांत गलबला होऊन तरवारीची चमक झडल्याचे आवाज ऐकूं येतात.)

१ मांग—(मोठ्यानें) अरे ! कोन हायरे तकड ? का ? का झाले का ? दळप्या ! पघ तर खरा ह्यो करचा गलबला हाय त्यो !

२ मांग—(घाबरून) त्ये नगरबा आपनाला ! तूंच पघनास ?

मांग—(यशवंतरावास पकडण्याकरितां त्याच्या अंगावर धावून जातात.)

यश०—खबरदार दुष्टांनो ! आतां या तर खरे पुढें, जरी या वेळीं मी असा परस्वाधीन झालों आहें, तरी तुमच्या मस्तकावर अशी लाथ मारून तुम्हांला ठेंचूनच टाकीन ! कधीं चुकणार नाहीं !

(बहादरशिंग आंत येतो.)

बहा०—(घाबऱ्यां घाबऱ्यां) कायरे ए ! ए—अरे आपले महाराज कोठें आहेत ? व ह्यांत तर शत्रूचे लोक चोंहीकडून भरत चालले आहेत !

दोघे मांग—अस काय ? चला व चला अगुदर ! आपल्या म्हाराजाचा स्याध लावून त्येचं रक्षण करूं ! चला चला !

(बहादरशिंग व दोघे मांग मशाली टाकून निघून जातात.)

गज०—(आनंदानें) प्राणनाथ ! ते मांग ह्या जळत्या मशाली येथेंच टाकून गेले हें फार चांगलें झालें ! प्राणनाथ ! आपणाला दुष्टांनीं दोरांनीं बळकट बांधिलें आहे, परंतु मशाली लावून दोर तोडून आपणास मुक्त करितें ! कांहीं काळजी करूं नये !

(तसें करूं लागते.)

यश०—(आवेशानें दांत ओंठ खाऊन) आःदुष्टा ! मेलास ! आतां तुझी भरली !

गज०—(घाबऱ्या घाबऱ्या पुढें होऊन) आपण कोणाविषयीं बो—बोललां ? माझ्या बाबां—?

यश०—(आवेशानें) होय होय ! त्याच्याचविषयीं ! ज्या दुष्टानें प्रत्यक्ष माझ्या पित्याचा घात केला त्याच्याच—!

गज०—देवा ! देवा ! एकून माझ्या बाबांना म्हणून क्षमा नाहींच ना व्हायची ? हायहाय ! तर काय एकून माझे बाबा आतां मरणारच ना ? —(इतक्यांत पडद्यांत दौलतरावाचा 'मेलों ! मेलों !' असा शब्द ऐकूं येतो तो ऐकून) हायहाय ! प्राणनाथ ! क्षमा करा ! मला जाऊन बाबा मरावयाचे अगोदर त्यांस

एकदा डोळेभरून तरी पाहूं द्या ! (तरवारीची चमक झडल्याचा पुनरपि आवाज ऐकूं येतो.) अग बाई! हें काय? तरवारी घेऊन तिकडे रणच मांडलें आहे !—हायहाय परमेश्वरा ! तूं तरी माझ्या प्रियाचें संरक्षण कर! हायहाय! हे निर्दय प्राणप्रिया! हायहाय (निघून जाते.)

यश०—(अगदीं जखडला असतां दांत ओंठ खात आपणाशीं) आं ! काय करूं रे ? या दोरीनें माझे हात जखडले आहेत! कांहीं चालत नाहीं ! अंगांत सामर्थ्य असतांही मी या वेळीं कसा अगदीं हतवीर्य झालों आहें !

मालो०—(बाहेरून) कायरे? आमचे बाळमहाराज कोठें आहेत तुला ठाउक आहे कारे?

यश०—(मोठ्यानें ओरडून) मालोजी! मालोजी! इकडे या इकडे! हें पहा कसें दुष्टांनीं मला अगदीं जखडून टाकिलें आहे तें. (दोरी तोडण्याकरितां ओढाताण करितो. दोरी तुटत नाहीं, इतक्यांत मालोजी इतर कांहीं लोकांसहवर्तमान येतो.)

मालो०— सरकार परमेश्वरकृपेनें आपले सर्व मनोरथ पूर्ण होत आहेत!—परंतु हरहर! महाराज! आपली दुष्टांनीं काय अवस्था केली आहे ही!— अरे पहातां काय? तोडा तरवारीनें दोरी! (लोक यशवंतरावास खुला करितात.)

यश०—मालोजी! या वेळीं तुह्मीं मला प्रत्यक्ष जीवदान दिलें असेंच मी समजतों ! या ! अगोदर मला कडकडून मिठी मारा! (दोघे एकमेकांस मिठी मारितात.)

मालो०—(गहिंवरून) महाराज! आतां अधिक बोलावयास अवकाश नाहीं ! परंतु आज आपल्या महाप्रतापी प्रतापसिंह महाराजांच्या ऐश्वर्याचे आपण धनी होणार हें निश्चित पाहून माझ्या जिवास अत्यंत उल्हास वाटत आहे! असो. महाराज! आतां घेतों आज्ञा !—(बरोबरच्या लोकांकडे पाहून) अरे ! तूं—तूं, हे तुह्मी पांचजण—सगळे बाळमहाराजांबरोबर असून यांचें रक्षण नीट करा समजलांत ? महाराजही ! आपल्या हातांत तरवार असूं द्या ! हिचा सदुपयोग काय करावा हें आपणास सांगणें नलगेच!— चलरे चला ! तो दुष्ट कोठें दडून बसला आहे त्याला अगोदर शोधून काढलें पाहिजे ! चला असे या वाटेनें माझ्याबरोबर ! महाराज ! आपण या बाहेरच्या दालनांतच असावें ! आह्मीं इतक्यांत आपणाकडे येतोंच!

यश०—आः दुष्टा ! दौलतराव! आतां पहातों तूं माझ्या क्रोधरूपी कल्पांतानलांत कसा दग्ध होत नाहींस तो ! (सर्व निरनिराळ्या वाटांनीं जातात.)

## प्र० ३. स्थळ—राजवाड्यांतील एक दिवाणखाना.

(हिंमतराव, रणधीरसिंग. मानाजीराव फांकडे आपल्या अनुयायांसहवर्तमान, बहादरसिंग व इतर शत्रूचा पाठलाग करित येतात.)

हिंमत०—अरे काणरे आहे, चलहो अगोदर ती वाट आडवून धरा! या लंडीचा मी असा या अंगानें समाचार घेतों!—चला! चला! (अनुयायी त्याप्रमाणें वागतात.)

बहा०—अरे बाबा ! मी तुमच्या पायां पडतों! कृपा करून मला जीवदान द्या !

रण०—तुम कोन हो ?

बहा०—अं—अं—मी अलाच—इ—इथला—

रण०—(त्याची गचांडी धरून) क्यौं ? बोलता है क्या नहीं ! अच्छा ! बोल ! क्या है तेरा नाम? तूं इधर क्या करता है ! बोल !

**बहा०**—(घाबरून) —मी—मी— मला **बहादूर-शिंग** म्ह—म्हणतात !

**रण०**—(उाहाल्लानें त्याची पाठ थोपटून व पीळ घातलेल्या लांब मिशा हातानें ओढून ) ओहोरे बहादर ! बहोत बहोत अच्छा तुम बहादर हो ! **बहादर**! तुम तो अमकू मोठा जानवर वैसा दीखता है. अच्छा ! तुमकु सींग नहीं है, इसवास्ते तुम भीते हो?

**बहा०**—महाराज ! तुमच्या पायां पडतों ! मी बहादर नव्हे ! ही मि—मिशीही उतरून देतों—पण—पण म—मला मारूं नका !

**रण०**—क्यौं बेलंडी तूं कोन है ? **रजपूत** है या कोन ? जो तूं **रजपूत** है तो ऐसी औरतके माफक जानकी किसवास्ते परवा करता है ? जान जान क्या चीज है !

**बहा०**—( त्यांच्या पायां पडून ) अरे बाबा ! नाहीं रे नाहीं ! मी मुळींच **रजपूत** नव्हे ! मी आपला साधा **मालवणी** गडी आहे ! लहानपणीं मी रडण्याच्या कामांत बहादर होतों, म्हणून थट्टेनें आईबापांनीं माझें **बहादरशिंग** नांव पाडलें ! दुसरें कांहीं नाहीं !

**हिंम०**—बोल अगोदर ! तूं येथें काय करीत असतोस ?

**बहा०**—मी **दौलतराव** महाराजांचा—

**रण०**—(दरडावून ) क्या बोलता है ?महाराज महाराज किस्कू कहता है ?

**बहा०**—नाहीं नाहीं ! चुकलें ! मी सांगाल तर आपले कानही उपटतों ! पण तुम्हीं असे मला दरडावूं नका ! ( थरथर कांपूं लागतो. )

**रण०**—( त्याची मानगोटी धरून ) क्या बोलताय? तूं किसके कान उखाडता है? हमारे? क्या?

**बहा०**—नाहीं महाराज मी माझे कान उपटतों! अरेरे ! माझा नकारे कोणी जीव घेऊ ! मी तुमच्या मुलालेंकरासारखा आहे !

**रण०**—अच्छा ! बहोत बात तुम मत् करो !

**हिंम०**—कायरे आमचे **बाळमहाराज** कोठें आहेत?

**बहा०**—ख—खरें पुसाल तर—म—मला ठा—ठा—ठाऊक नाहीं !

**रण०**—ओहो ! तुम बोलतेहो के मैं ओ हरामखोर **दौलतराव**का नोकर हूं, और तुमकु **जसवंतराव**का मकान किधर है मालुम नहीं पडता?—बडे ताज्जूबकी बात! बोलो बोलो !—क्यौं बोलता नहीं क्यौं ?—बोलो, नहीं तो अब्बी काट देता हूं !—

**बहा०**—**यशवंतराव** तु—तुरुं—

**हिंम०**—काय ? म्हणतोस ? बोल नीट ! असा घाबरूं नको !

**बहा०**—मला तुम्ही मारणार नाहीं तर सांगतों! **यशवंतराव** तुरुंगांत आहे !

**हिंम०**—काय! **बाळमहाराज** तुरुंगात आहेत?

**बहा०**—होय! आणि त्यांचा तत्क्षणीं वध करावा म्हणून म्-म् मींच **दौलतरावास** सल्ला दिली! त्याप्रमाणें ते यावेळीं मेलेही असतील! आतां—आतां—तुमच्या पायां पडतों! मला श—श—!

**हिंम०**—(दांत ओठ खाऊन) काय म्हणतोस ? त्यांचा वध करावयाची सल्ला कोणीं तूं दिलीस? आणखी काय? ते मेलेही असतील म्हणतोस?—हूं ! आटपा ! पहातां काय? याला येथल्या येथेंच देहांतशासन द्या!

**बहा०**—होय: माफ करा! ( रडूं लागतो. ) अग आई!—अरे बाबांनो! माफ करा ! फिरून नाहीं मी अशी सल्ला देणार!

**रण०**—अच्छा अच्छा ! तुम अबी तो मर-

जाव! पीछे वैसी सल्ला तुम मत् देओ! अच्छा अच्छा!

( त्यास ठार मारितात—पडदा पडतो. )

**प्र० ४. स्थल—राजसबाईच्या महालाबाहेरील दिवाणखाना.**

( दौलतराव तोंड झांकलेला धांवत धांवत येतो. )

**दौल०**—काय करूं रे!—माझें राज्य तर सर्व गेलें! आतां थोडक्याच वेळांत हे माझे प्राणही निघून जातील! हायहाय! असो. कांहीं चिंता नाहीं! या दुष्टा यशवंतरावानें माझा सर्वस्वीं घात केला! तो दुष्ट तुरुंगांतून पळून गेला म्हणून मी आतांच ऐकिलें! हें कसें झालें असेल तें असो!—कांहीं चिंता नाहीं! आतां आपण तर मरणारच, परंतु एक आतां अखेरचा सूड—( इतक्यांत बाहेर पावलें वाजलेलीं ऐकूं येतात तीं ऐकून ) अरे देवा! आतां कोठें लपून बसेन म्हटलें तरी जागा नाहीं! या दुष्टांनीं बहुतेक वाडा तर घेरून टाकला आहे! हायहाय! ( लपण्याकरितां जागा पहातो, इतक्यांत पावलें वाजावयाचीं राहतात. ) अरे! मी केवढा भित्रा! हायहाय! अरे! मी आपणास आजपर्यंत मोठा प्रबळ समजत होतों. परंतु आज माझें सर्व धैर्य कोणीकडे निघून गेलें कांहीं समजत नाहीं! बरें, असें तर नसेलना? मी आतां जी कांहीं गोष्ट करणार आहें ती परमेश्वरास न साहून त्यानें तर माझी शक्ति नसेलना हरण करून नेली?—कांहीं असो! हा दौलतराव या वेळीं शत्रूचा घात करावयास जरी असमर्थ झाला आहे, तरी त्याच्या अंगीं अबलेचा घात करण्याचें अद्यापि सामर्थ्य आहेच! तें तर कोठें गेलें नाहीं! ठीक आहे! पाहून घेतों! मनांत आहे तेवढा सूड घेऊन मरावें हें बरें!

( निघून जातो. )

**प्र० ५. स्थल—राजसबाईचा महाल.**

( राजसबाई बसली आहे. )

**राज०**—हायहाय! देवा! काय हा अनर्थ? आज वाड्यांत काय गडबड चालली आहे कांहीं समजत नाहीं! जिकडे कान द्यावा तिकडे कोणी तरी मनुष्य मरत असल्याच्या किंकाळ्या ऐकूं येत आहेत! हायहाय! देवा! ह्या किंकाळ्या माझ्या प्रिय पुत्राच्या तर नाहींतना?

( घाईघाईनें मालोजी आंत येतो. )

**मालो०**—आईसाहेब! आपले पुत्र जिवंत आहेत, त्यांच्याविषयीं आपण कांहीं काळजी करूं नये! आज वाड्यांत शत्रूची कत्तल चालली आहे! पण आपण अशा घाबरूं नका! आपण महालाचीं दारें बंद करून आंत खुशाल बसा!—आणखी कदाचित् तो दुष्ट दौलतराव आंत येऊं लागेल तर न डगतां मी देतों ही सुरी त्याच्या उरांत खुपसा! ( सुरी देतो ) जातों! आपले बाळमहाराज खुशाल आहेत! शत्रूचा नाश करून ते आतां आपल्या दर्शनास येतील!

( निघून जातो. )

**राज०**—देवा! मी आज स्वप्नांत तर नाहीं ना? हा काय प्रकार चालला आहे कांहींच उमज पडत नाहीं! असो! देवा नारायणा! माझ्या पुत्रास सुरक्षित राख म्हणजे झालें! दुसरें कांहीं माझें मागणें नाहीं! ( दारें लावूं लागते. इतक्यांत दौलतराव आंत घुसतो. )

**राज०**—कोण रे तूं? कोण आहेस?

**दौल०**—( स्वर बदलून ) बाईसाहेब! मी—मी तो! माझें रक्षण करा!

राज०—पण तूं आहेस कोण ?

दौल०—मी असाच या वाड्यांत असतों ! मी आपल्या पायां पडतों, व आपण माझें रक्षण करावयाचें वचन द्याल तर मी कोण आहें तें सांगतों !

राज०—( दया येऊन ) अरे ! रक्षण करण्याचें मजपाकडे काय आहे ? बोल ! तूं ह्मणतो आहेस तरी काय !

दौल०—बाईसाहेब ? तें कांहीं नाहीं ! वचन द्याल तर सांगतों !

राज०—बरें, हें वचन दिलें !

दौल०—( तोंडावरील झाकण काढून ;) दुष्टे! तूं मला ओळखिलें नाहींस काय ? तूं माझ्याप्राणांचें रक्षण करण्याचें वचन दिलें आहेस, यास्तव तुला सांगतों,हा तुझ्या मिथ्या पातिव्रत्याचा भंग करावयास आलेला दौलतराव आहे !

राज०—काय दुष्टा ! तूं तो अधम—पातकी—दुष्ट दौलतराव तोच ? माझ्या प्राणप्रियाचा विश्वासघातानें वध करणारा महापातकी तो तूंच ?

दौल०—होय ! होय ! तुला पाहिजे तें बडबड! मी त्याची मुळींच पर्वा करीत नाहीं ! तुझ्या दुष्ट कारस्थानें माझें सर्व राज्य हरण करून घेतलें, त्याचा सूड घेण्याकरितां मी यावेळीं तुझा जबरीनें उपभोग घेणार !तुझ्या महालाच्या सर्व वाटा बंद आहेत, तूं आतां माझ्या कचाटींतून कशी सुटतेस ती पहातों! ( तिला धरावयाकरितां पुढें जातो. )

राज०—( मागें सरून ) दुष्टा! दूर उभा रहा ! तुझ्या अपवित्र स्पर्शानें माझा देह विटाळवूं नको ! ( दौलतराव धरावयास जातो. राजसबाई किंकाळ्या टाकूं लागते. )

दौल०—तूं आणखी जरी ओरडलीस, तरी मी हा तुला अशीच येथें लोळविणार! कां रहातेस कीं नाहीं गप्प? चल ! आतांच्या आतां मी तुझा उपभोग घेणार ! बोल ! होतेस कीं नाहीं कबूल ?—बोल !

राज०—दुष्टा! तुला मी एक वेळ सांगितलेंच आहे कीं, जोंपर्यंत ह्मणून ह्या देहांत प्राण आहे, तोंपर्यंत तुझ्या अपवित्र देहाचा या शरीरास विटाळ होऊं देणार नाहीं ! दुष्टा! दूर उभा रहा ! नाहीं तर पहा हीच सुरी आपल्या उरांत खुपसून तुझ्यापुढें प्राण देईन !

दौल०—( उपहासानें ) मूर्खे ! आजपर्यंत तुझ्या असल्या वल्गना मीं पुष्कळ ऐकिल्या, व कदाचित् तूं आतां वळशील, अंमळशानें वळशील, असें समजून मीं तुझी उपेक्षाही केली, परंतु त्या सगळ्या गोष्टी आतां विसरून एकदम मला कबूल हो ! नाहीं तर पहा नांवाचा दौलतराव आहें, ह्मणेल तें करावयास कधीं चुकावयाचा नाहीं ! हं—कां होतेस कीं नाहीं कबूल ?—बोल बोल झटझट !

राज०—दुष्टा ! माझा निश्चय काय आहे तो तुला ठाऊक आहेच, त्यांत ह्मणून फरक व्हावयाचा नाहीं !

दौल०—असें काय? तर दुष्टे ! ही पहा तुला लोळविलीच ! ( तिला धरावयास जातो, इतक्यांत राजसबाई आपणाला सुरी मारून घेऊन भूमीवर पडते. )

दौल०—( दांत ओंठ खाऊन ) अरेरे ! सर्वस्वीं घात झाला ! या दुष्टेनें माझा मनोरथ ह्मणून जिवंतपणीं पूर्ण नाहींच होऊन दिला! असो. काय चिंता आहे ? ही मेली ह्मणून काय झालें ! ही नुकतीच मेली आहे, व

आतां मलाहा या जगांत फार वळ रहा-याची आशा नाहीं, यासाठीं मरावयाचे अगोदर हिचा उपभोग घ्यावाच ! काय होईल तें हवें ! उपभोग घेतल्यावर पु माझें कांहाहा होवो ! ( इतक्यांत यशवंतराव त्याला न कळत आंत येऊन याला धा मारून खालीं पाडतो. दौलतराव मूर्छित होतो.

यश०—( आई मेलेली पाहून शोकानें ) हायहाय. गे जननी ! या दुष्टाच्या पायीं तुझी सरतेशेवटीं अशी अवस्था व्हावीना ? आई ! तूं मेल्यावर मला या जगांत जिवंत राहून तरी काय करावयाचें आहे ? आईग ! ह्या दुष्टानें तुला जे क्लेश दिले त्यांची समाप्ति करून तुझ्या जिवास शांति द्यावी ह्मणून मी अनेक संकटें भोगून तुजकडे आलों, तो तुझी हीच स्थिति या नेत्रांनीं पहावी एवढ्याच करितां काय ? आईग! ह्या दुष्टाचा नाश करण्याची आशा मनांत धरून या ठिकाणीं आलों, तिचा परिणाम असा व्हावा काय ? हायहाय ! धिक्कार असो ! धिक्कार असो ! आईग ! आईग ! आतां तुजवांचून मी या जगांत वांचून काय करूं ? आईग ! हा बघ मी तुजपुढें दीन बाळा उभा आहे. तर मजशीं एकतरी शब्द बोल ! आई ! तूं मेल्यावर आतां मला माझा बाळ असें कोण बरें ह्मणणार आहे ? आईग ! एकवेळ तूं उठून मला प्रेमालिंगन दे, प्रेमानें माझें चुंबन घेऊन एकवेळ माझ्या मस्तकाचें आघ्राण कर, आणि एकवेळ 'बाळा! यशवंता ! ! ' असे अमृततुल्य शब्द माझ्या कानीं पडूं दे ! ह्मणजे आई, मी आपणास कृतार्थ समजेन ! आणि लागलीच या तुझ्या चरणापाशीं आपल्या प्राणांचा नाश करीन ! आईग ! आईग ! तुला तुझ्या बाळाची कांहींच करुणा येत नाहीं अं ! हायहाय ! गे आई ! आईग ! आईग ! ( तिच्या पायांवर मूर्छित पडतो. )

दौल०—( सावध होऊन खालीं पडल्यापडल्याच ) हा कोणरे दुष्ट माझ्या बेताआड आला ?—अं— काय हा दुष्ट यशवंत्या—माझा शत्रु—तोच येथें आला काय ?—अरेरेरे ! काय करूं? हा दुष्ट ह्या अखेरच्या वेळीं देखील माझ्या बेताआड आला अं! आः दुष्टा! थांब तुला यमसदनास पाठवितों ! हा दुष्टा ! हा पहा मेलास ! ( खडबडून उठतो. ) अरे हा दुष्ट तर आपल्या आईच्या पायांवर मूर्छित होऊन पडला आहे ! कांहीं चिंता ! याची येथल्या येथेंच समाप्ति करावी !—आः मूर्खा माझा सर्वस्वी घात करणाऱ्या अधमा ! हा पहा मेलास ! ( त्यास मारण्याच्या हेतूनें त्याच्या अंगावर धावून जातो-इतक्यांत यशवंतराव सावध होउन खडबडून उठतो. )

यश०—आईग ! आतां नाहींचना तूं माझ्याशीं एक शब्दही बोलत ? आई ! माझा इतक्यांतच कंटाळा आला ? आई!—

दौल०—( मोठ्यानें ओरडून ) दुष्टा! असा विनाकारण आपणाशींच शोक करीत बसला आहेस, त्यापेक्षां एकदम आपला गळाच कापून घेऊन या शोकांतून कां नाहीं मुक्त होत ?

यश०—( तें ऐकून ) आः दुष्टा ! माझा उपहास करितोस काय ? तर मूर्खा ! अगोदर तुलाच तुझ्या पातकाचें प्रायश्चित्त देतों हें घे ! ( तरवार उपसून त्यास मारण्यास जातो. उभयतांचें युद्ध चालू होतें. )

(इतक्यांत गजराबाई येते.)

गज०—( घाई घाईनें ) अहो बाबा ! बाबा !— अहो यशवंतराव ! तुह्मीं मांडलें आहे

तरी काय ? बाबा! दया करा !दया करा ! प्राणनाथ ! हात आटोपा ! हात आटोपा !

(यशवंतराव व दौलतराव एकमेकांशीं लढत असतां मध्यें घुसून दोघास लोटूं लागते.)

दौल०—(तोंपानें) काय ! काय ! कारटे! मध्यें आलीस कां फिरून!थांब तुला न् तुझ्या प्राणनाथाला एकदमच यमसदनास पोचवितों !

गज०—(दौलतरावाच्या कंबरेस मिठी घालून) बाबा ! तुह्मीं पाहिजे तर मला ठार मारा ! परंतु या राजपुत्राशीं लढूं नका !

(दौलतराव तिला लोटून देण्यास यत्न करितो. ती अधिक बळकट आंवळून धरते.)

दौल०—कारटे ! सोडतेस कीं नाहीं ! बोल ! कां घेऊं तुझाच अगोदर जीव !

गज०—तुह्मांस वाटेल तसें करा ! परंतु या राजपुत्राशीं लढूं नका !

दौल०—कारटे ! तुला वाटतें मीच मात्र मरावें, आणि या तुझ्या यारानें मात्र जिवंत रहावें ! कारटे ! मरच तर (तिच्या उरात तरवार भोंकसतो. ती खालीं पडते.)

गज०—हायहाय ! हे पिया हे प्राण— !

(मूर्छित होते.)

यश०—(त्वेषानें) आः दुष्टा ! महापातक्या ! अधमा ! प्रत्यक्ष आपलीं मातापितरें, व आपला सख्खा बंधु, यांचा वध करून तेव ढ्यानेंच तुझी तृप्ति झाली नाहीं ह्मणून दुष्टा ! कन्यावधाचेंही पातक आपल्या माथ्यावर चढवून घेतलेंस ! दुष्टा! तूं नष्ट आहेस! तुझा प्राण घेण्यास मी निमित्त मात्र वसत आहे !तूं आपल्या कर्मानेंच नष्ट झालास इतक्यात राजसबाई किंचित सावध होऊन बघूं लागते.

दौल०—) मागें वळून ) काय ही अद्यापि जिवंत आहे ! अरे रे ! दुष्टा ! तूं व्यर्थ मध्यें आलास, नाहीं तर केव्हांच ह्या जारिणीचा उपभोग घेऊन मी स्वस्थ बसलों असतों !

यश०—(अतिशय त्वेषानें) दुष्टा ! जारिणी कोणास ह्मणतोस ? मूर्खा ! वृथा वल्गना पुरे कर ! चल कांहीं सामर्थ्य असेल तर लढ माझ्याशीं, आणि वीराप्रमाणें तुला धारातीर्थी मरण येऊं दे ! (दोघे लढतात, व दोघेही लढतां लढतां घायाळ होऊन पडतात.)

राज०—(कण्हत कण्हत) अं—अं—दुष्ट दौल दौल—अं—अं—माझा प्रिय पुत्र—अं—अं—अं—

यश०—(पडल्या पडल्याच) आः दुष्टा ! काय ही माझ्या निष्कलंक मातेची दशा करून सोडिली आहेस !—आई ! तूं अद्यापि जिवंत आहेस? आई ! मला एकदा शेवटची मिठी मारूंदे ! (उठूं लागतो तों धाडकन भुईवर पडतो. तथापि तसाच लोटत लोटत जाऊन आईच्या गळयास मिठी मारितो.)आई ! आई ! बोल ! बोल !"आईग ! तुझे अमृततुल्य बोल मला एकवार ऐकूंदे ! आई ! आई ! आईग ! हा पहा दुष्ट दौलतराव तुझा शत्रु तुजपुढें मरून पडला आहे ! आईग ! पहा तर खरी ! आईग !—

राज०—(वर हात करून) कोण? अं—अं—माझा अं—बाळ—देवा ! नारा—अं—धन्य !—अं—अं—बाळा ! अं—ग!—अं—अं—गजरा !अं—

गज०—(सावध होऊन कण्हत कण्हत) आईसाहेब !—अं—मी—मी जवळच !—(मोठ्या प्रयत्नानें उठून राजसबाईच्या पायांशीं जाऊन धाडकन पडते.)आईसा—!आ—अं—अं—!

राज०—(खोल आवाजानें)बाळा !—अं—अं—या गजरेला—अं—अं—सं—अं—संभाळ!अं—अं—बाळा !—एकदा—अं—अं—मला घट्ट—मिठी मारूंदे ! अं—(दोघें घट्ट मिठी मारितात.)

गज०—(कष्टानें राजसबाईच्या व यशवंतरावाच्या पायांस मिठी घालिते.)अं—अं—

**दौल०**—आः—दुष्टा ! अं—अं—मेलास ! ( उठूं लागतो, पण उठवत नाहीं.) आंः—काय करूं अरेरेरे-!—घात—घात झाला!—आंः—आंः- (दांतखिळ वांजूं लागते. ) अरे—गेलों—गेलों—नरककुंडांत गेलों !--थांबा— यमदूतहो ! थांबा! मला अशा अघोर या—या—यातना—न—नका देऊं ! तुमच्या पायां पडतों ! अरे रे ! तुह्मी माझें कांहींच ऐकत नाहीं ! आणि मला निर्दयपणानें खालीं—खालीं नरकाचे खाईंत लोटितांना ? अरेरे !—लोटा ! लोटा ! मला अक्षय नरकयातना होऊंद्या!—आं—देवा ! देवा ! ती तप्ततेलाची कढई ! —तो लोहशूळ—तो—तो—( किंकाळी ठोकतो. ) देवा ! नको नको हा त्रास ! देवा ! क्षमा कर ! देवा ! देवा ! तुला माझी कांहींच दया येत नाहींना ! हायहाय ! हे साध्वी **राजसबाई** ! मातृवत्सला **यशवंतरावा** ! तुह्मीं तरी मला क्षमा करा ! माझी तुह्मांला तरी दया येऊं द्या ! —हाय गे माझे लाडके **गजरे** ! **गजरे** ! तूं या वेळीं कोठेंगे आहेस ? **गजरे** ! **गजरे** !

**गज०**—(तें ऐकून धडपडून उठूं लागते, पण उठवत नाहीं.) बाबा ! बाबा ! ही तुमची पातकी **गजरा** ! मी—ये—येथेंच आहें!—बाबा—अं—अं—हालवत देखील नाहीं ! बाबा ! बाबा !

**दौल०**—कोण ? **गजरे** ! तूं येथें आहेस काय ? हायहाय ! आणि तुझी अशी स्थिति होण्यास मीच कारण झालोंना ! हायहाय ! धिक्कार असो ! बाळे ! बाळे ! **गजरे** ! हायहाय ! रहा तूं तेथेंच पडून रहा ! मी पातकी—अघोर पातकी—मी दुष्ट—मी चांडाल आहें !—मला शिवून आपल्या पवित्र देहास विटाळ होऊं देऊं नको !—अरेरे ! मी केवढा चांडाळ ! केवढा पातकी ! **गजरे** ! **गजरे** ! या वेळीं मीं तुझें ह्मणणें ऐकिलें असतें तर फार चांगली गोष्ट होती! असो; आतां बोलून शोक करून काय उपयोग! आतां मला केलेल्या कर्मांचा पश्चात्ताप वाटतो, पण काय? व्यर्थ!—**यशवंतराव** ! हे महासाध्वी **राजसबाई** ! तुह्मीं तरी माझ्या अपराधांची क्षमा केली असें ह्मणा ह्मणजे मी सुखानें देह ठेवीन !

**यश० व राज०**—दौलतराव ! क्षमा—क्षमा—केली ! जा !

**दौल०**—( आनंदानें )काय तुह्मीं उदारपणें माझ्या अपराधांची क्षमा करितां ? वाहवा ! वाहवा! मी धन्य आहें ! **यशवंतराव** ! मीं तुझा अनन्वित छळ केला, मी मोठीं अघोर पातकें केलीं, ह्याबद्दलचें प्रायश्चित मीं काय घेऊं ? **यशवंतराव** ! एकवार माझ्या प्रियकन्येला तूं आपली ह्मण ! हे महासाध्वी **राजसबाई** ! हिला तूं सून ह्मणून तिच्या तोंडावरून हात फिरीव, ह्मणजे माझा प्राण सुखानें जाईल ! ( यशवंतराव, राजसबाई, व गजराबाई, बळकट एकमेकांस आलिंगन देतात. )

**यश०**—हायहायगे प्रिये ! मी—मी—तुला अशा स्थितींत पहावेना? आई ! आई ! ही आपली सून आपल्या पदरांत घे !

**राज०**—**गजरा**बाई ! येग बाई अंमळ पुढें आणि मिठी घाल ! ( मिठ्या मारून सर्वजण धाडकन निश्चेष्ट होऊन पडतात. )

**दौल०**—धन्य ! धन्य ! ( प्राण सोडितो. )

( इतक्यांत मालोजी आंत येतो.)

**मालो०**—( पाहून घाबरून) अरे ! काय हा अनर्थ ? महाराज ! महाराज ! **आईसाहेब** ! हायहाय !—महाराज ! महाराज ! मी

आपला दीनसेवक आपणापुढें उभा आहे, मजकडे एकवार अवलोकन करून मजशीं सुखाचे दोन शब्द तरी बोला ! ह्या दुष्टानें आजपर्यंत आपणास व आपल्या मातोश्रींस अनिवार क्लेशांत ठेविलें, परंतु आज त्या क्लेशांचा अंत होऊन आपण आह्मां दीन प्रजांचे प्रभु व्हाल ह्मणून आह्मांस मोठी आशा होती, तिचा आतांच निराशा कारितां हें आपणास गोड वाटतें काय ? महाराज ! महाराज ! महाराज ! आईसाहेब ! आपण तरी आह्मांकडे कृपाकटाक्षानें अवलोकन करून आमचें शांतवन करा ! मातोश्री ! आपण इतके क्लेश सोसून शेवटपर्यंत निष्कलंक राहिला, तेणेंकरून आह्मीं सर्वजण आपणास धन्य समजत होतों. व ह्या दुष्ट अधम **दौलतरावाचा** उच्छेद करून आपणास सुख द्यावें ह्मणून आह्मीं ह्यासाठींच कंबर बांधिली, परंतु आज तें सर्व व्यर्थ झालेंना ?—हायहाय ! महाराज ! महाराज ! आईसाहेब ! मातोश्री ! आपण जर आह्मां दीन लेंकरांच्या विनंतीकडे दुर्लक्ष करून आह्मांशीं भाषण न करितांच जाल, तर आह्मांस तरी इतःपर जगून काय कर्तव्य आहे? महाराज ! आह्मीं सर्व येथल्या येथेंच आपल्या चरणापाशीं आपल्या प्राणांचा अंत करूं ! हरहर ! महाराज! मातोश्री ! काय ही आपली स्थिति झाली आहे ? आपणास ह्या जखमा झाल्या आहेत त्यांतून केवढे हे रक्ताचे पाट चालले आहेत ?—आणि हा सर्व अनर्थ त्या एकट्या दुष्टामुळेंच झालाना ? हायहाय ! महाराज ! एक वेळ आह्मांकडे डोळे उघडून पहा आणि तो दुष्ट कोठें दडून बसला आहे तें आपणास ठाऊक असेल तर सांगा, ह्मणजे त्याचा गळा आतां चिरून टाकून त्याचा सूड घेतों !—अरेरे ! महाराज आह्मांकडे मुळींच पहात नाहींत, आमच्या मातोश्रींसही आमची एवढी सुद्धां कींव येत नाहीं, तर आतां त्यांच्याच चरणांपाशीं आपलें शिरकमळ अर्पण करून मरावें हें बरें ! (अंमळ पुढें येतो.) अरे ! पण हा काय प्रकार आहे ? इकडे अंधारांत आणखीही कोणी मरून पडलेलें दिसत आहे ? (दिवा पुढें करून ) अरे काय ? ही ह्या दुष्टाची सद्गुणी कन्या **गजराबाई** ! तिचें ही ह्या दुष्टानें अशी अवस्था करून टाकिली काय ?—धिक्कार असो ! धिक्कार असो!—अहाहा ! राजकन्ये ! आपण केवढ्या अभाग्य, कीं जिवंत असेपर्यंत आपण ज्यांच्यावर इतकें प्रेम राखलें त्यांचा व आपला जिवंतपणीं नाहींच समागम झाला ! परंतु आपलें एक भाग्य मोठें कीं आपल्या हृदयवल्लभांचा व आपला मृत्युसमयीं तरी समागम झाला ! परंतु आह्मां पाप्यांच्या कपाळीं तेवढेंसुद्धां **ब्रह्मदेवा**नें लिहिलें नाहीं! असो. नशीब आमचें !—आजपर्यंत ज्यांच्यावर आशा ठेवून ह्या दुष्टाची मीं कपटसेवा पत्करिली, तेच मज अभाग्याला सोडून गेले आतां वांचून तरी मला काय कर्तव्य आहे? आतां ह्या प्राणांचा अंत केल्याशिवाय परिणाम नाहीं ! (इतक्यांत हिंमतराव व इतर मंडळी आंत येतात, त्यांस पाहून ) **हिंमतराव! मानाजीराव** ! गेलें हो गेलें ! सर्वांचा घात झाला ! ह्या दुष्टानें पहा आपले **बाळमहाराज**, मातोश्री **राजसबाई** व ह्या **गजराबाई** यांची काय अवस्था केली आहे ती!

अरेरे ! हिजकडे पहावत देखील नाहीं !
( सर्व शोक करूं लागतात. )

**हिंम० व माना०**—( कांहीं वेळानें ) असो ! परमेश्वराची इच्छा! **मालोजी** ! आतां झालेल्या गोष्टीबद्दल शोक करून काय कर्तव्य आहे? बोला ! बोला ! तो दुष्ट अधम या वेळीं कोठें लपून बसला आहे बोला ! त्याचा—

**मालो०**—मलाही तीच पंचाईत पडली आहे! तो दुष्ट माझ्या हातीं लागावा ह्मणून मी सर्व राजवाडाभर फिरलों, परंतु त्याचा कोठेंच थांग लागला नाहीं ! ( इतक्यांत चरायल्यासारखा होऊन )अरे ! पण तें पलीकडे अंधारांत आणखी कोणी पडलेलें दिसतें आहे! तो दुष्ट तर नसेलना?( पुढें होऊन दौलतरावास ओळखितो) आः दुष्टा ! भला सांपडलास ! आतां—( दांत ओंठ खाऊन त्यास मारण्याकरितां तरवार उगारतो. ) ( इतक्यांत यशवंतराव कण्हूं लागतो. त्याबरोबर परत मागें वळून आनंदानें ) महाराज ! आतां कण्हले ते आपणच ?—वाहवा!वाहवा! **हिंमतराव** ! **मानाजीराव**! महाराज सावध होताहेतसें वाटतें ! अंमळ असा अंधार सोडा पाहूं!( सर्व एका अंगास जवळ येतात. )

**हिंम०**—( आनंदानें )**मालोजीराव** ! आपणास परमेश्वरानें अद्यापि सोडलें नाहीं ! आपले **महाराज** जिवंत आहेत खचित ! (सर्वजण त्यास वारा घालूं लागतात .)

**माना०**—अरे ! येथें कोठें पाणी मिळेल तर बरें होईल! ( इकडे तिकडे पाहूं लागतो. )

**यश०**—(अंमळ सावध होऊन कण्हत)कोण तें?**मालोजी**!—माझ्या नेत्रांपुढें अंधारी येऊन मला नीट ओळखतां येत नाहीं ? अंमळ असे खालीं वांका पाहूं! ( मालोजी वाकतो. ) अं—आणखी ते कोण कोण दिसताहेत ?

**मालो०**—हे—**हिंमतराव** ! हे—**मानाजीराव** ! हे सर्व आपले शूर सरदार !

**यश०**—(आनंद झालासें दाखवितो व कण्हत कण्हत) हे सर्व शूर सरदारहो ! आतां मी तर मरतोंच, परंतु माझें शेवटचें ह्मणणें लक्षपूर्वक ऐका ! तुह्मां सर्वांच्या जिवावर मी आजपर्यंत दिवस काढिले, माझ्या प्रियजनांनींही अतोनात हाल सोशिले, त्या सर्वांचें चीज होऊन या हतभाग्य देशांत या डोळ्यांदेखत सर्व लोक पूर्वीप्रमाणें आनंदानें राहतील ह्मणून मोठी अशा होती, परंतु ती सफल होण्याचें माझ्या नशिबीं नाहीं ! परमेश्वराची इच्छा ! ही माझी प्रिय जननी, व ही माझी प्राणप्रिया—ह्या तुमच्या स्वामिणी होऊन त्यांचे आशीर्वाद तुह्मांस मिळावेत, परंतु ते देवाच्या इच्छेनें नाहीं मिळाले !असो, ( राजसबाईचें व गजराबाईचें कण्हणें ऐकूं येतें, यशवंतराव उभयतांस प्रेमानें आलिंगन देऊन अश्रु ढाळितो. सर्वांच्या नेत्रांतून अश्रु चालतात. ) वाहवा ! वाहवा ! मित्र हो ! या दोघींचे व माझे आपणा सर्वांस निरंतर आशीर्वाद आहेत ! **दौलतरावानें** आपणा सर्वांस दुःख दिलें, परंतु त्याबद्दल त्यास पश्चात्ताप होऊन मीं त्यास त्याच्या सर्व अपराधांची क्षमा केली आहे, त्याच्यावर तुमचा राग नसावा ! त्याला आतां मी आपला मित्र समजतों ! पहा बरें, तो जिवंत आहे कीं काय तें ! ( सर्व त्याप्रमाणें करितात. )

**सर्व**—( डोळ्यातून अश्रु आणून ) काय महाराजांचें औदार्य हें ! महाराज आपला शत्रु जिवंत नाहीं !

**यश०**—( कण्हत कण्हत ) बाबांनो ! आतां असे नका बोलूं ! मीचना तो माझा मित्र आहे ह्मणून ह्मटलें ? असो ! **मालोजी** ! **हिंमतराव**! **मानाजीराव** !**दौलतरावाला** पुढें आणून असा त्याच्या कन्येपाशीं ठेवा !

( सर्व त्याप्रमाणें करितात. ) आतां आह्मी सर्व मरतों आहों, ह्यासाठीं आमचा उत्तर विधि नीटपणें उरकून आह्मां सर्वांच्या अस्थि काशीस भागीरथीजलांत टाकण्यास चुकूं! नका! मित्रहो ! तुह्मां सर्वांच्या दयेनें मी इतके दिवस जिवंत राहिलों, व आज माझ्या मातोश्रीचा आणि या प्रियेचा माझा समागम घडला, यास्तव आतां हें सर्व राज्य तुमच्या स्वाधीन करितों ! त्याची यथास्थित व्यवस्था करा ! मालोजी ! तुह्मीं राज्यपद घ्या ! मानाजीराव ! आपण दिवाणगिरी पत्करा ! व हिंमतराव ! तुह्मी सेनापति व्हा आणि सर्व राज्याचा बंदोबस्त करा!— आतां माझ्यानें जास्ती बोलवत नाहीं ! हीं पहा माझीं बोटें गार पडूं लागलीं आहेत. मित्र हो ! आतां दया लोभ ठेवा ! माझा शब्द आंत ओढूं लागला!—राम ! राम !—

**यश०, राज०** व **गज०**—( शेवटीं मोठ्यानें ) राम !

( पडदा पडतो. )

समाप्त.

**कैलासवासी**
**नारायण निळकंठ पटवर्धन**
**यांचे स्मरणार्थ,**
**मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें,**
**या संस्थेस नजर.**
ग. म. पटवर्धन
८-१०-२१.